सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, १९ जानेवारी २०२६ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४२ वे अंक ५४ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प




धर्म ही दृश्य-स्पृश्य वस्तू नाही. धर्म दिसत नाही व धर्माला स्पर्शही करता येत नाही. ते एक तत्त्व आहे. सर्व तत्त्वांसारखे ते निराकार आहे. प्राणवान माध्यमाद्वारेच ते साकार होऊ शकते. धर्माला यशस्वी व क्षमतावान बनवणारे जे गुण आहेत त्यांचा धनी मानव आहे. मानवाला त्या गुणांनी संस्कारित करण्याची भूमिका मुख्यत्वेकरून परिवार, शिक्षण संस्था व पंथ-संप्रदायांची आहे. साहित्य, कला, इतिहास व प्रशासनाची देखील आहे.

**- रंगा हरी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

## महत्त्वाचे

### रविवारी १ फेब्रुवारीला सुरू राहणार शेअर बाजार

**मुंबई** : दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १ फेब्रुवारी रोजी देशाचा अर्थसंकल्प सादर केला जाईल. यावर्षी १ फेब्रुवारीला रविवार असला तरी, शेअर बाजारात सामान्य दिवसांप्रमाणेच कामकाज होईल. बॉम्बे स्टॉक एक्सचेंज (बीएसई) आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज(एनएसई)ने परिपत्रक जारी करून ही माहिती दिली आहे. एक्सचेंजच्या मते, अर्थसंकल्पाच्या दिवशी गुंतवणूकदार आणि ट्रेडर्स बाजाराची प्रतिक्रिया पाहू शकतील, यासाठी रविवारी विशेष ट्रेडिंग सत्र ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बाजाराची वेळ कामकाजाच्या दिवसांसारखीच राहील.




# आता युद्ध अधिक गुंतागुंतीचे

### • राजनाथसिंह यांचे प्रतिपादन • आर्मेनियासाठी पिनाका रॉकेटच्या तुकडीला हिरवा झेंडा

**नागपूर, १८ जानेवारी**

युद्धे खूपच गुंतागुंतीची झाली आहेत आणि ती केवळ सीमांपुरती मर्यादित राहिलेली नाहीत, तर ऊर्जा, व्यापार, शुल्क, पुरवठा साखळी, तंत्रज्ञान आणि माहिती हे देखील आता त्याच्या नवीन आयामांचा भाग बनले आहेत, असे संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी रविवारी येथे सांगितले.



असा एक काळ होता की जेव्हा संरक्षण उत्पादन केवळ सार्वजनिक क्षेत्रापुरते मर्यादित होते. त्यावेळी खाजगी क्षेत्राच्या सहभागाचा कुणीही विचार केला नव्हता, असे राजनाथसिंह यांनी 'सोलर डिफेन्स अॅण्ड एरोस्पेस लिमिटेड'मध्ये मध्यम क्षमतेच्या दारुगोळा निर्मिती सुविधेच्या उद्घाटन समारंभात एका सभेला संबोधित करताना सांगितले.

यावेळी राजनाथसिंह यांनी सोलर समूहाने उत्पादित केलेल्या दिशादर्शक पिनाका रॉकेटच्या पहिल्या तुकडीला आर्मेनियाच्या निर्यातीसाठी हिरवा झेंडा दाखवला. खाजगी क्षेत्रात क्षमता आणि सामर्थ्य होते. पण, त्यांचा सहभाग ज्या प्रमाणात असायला हवा होता, त्या प्रमाणात नव्हता, असे ते म्हणाले.

देश आत्मनिर्भरतेच्या दिशेने पावले टाकत असताना खाजगी क्षेत्रातील संरक्षण उत्पादनाबाबत आव्हाने आणि शंका होत्या. परंतु, सध्याच्या सरकारने त्यांच्या क्षमतेवर पूर्ण विश्वास ठेवून धोरणांमध्ये बदल करून आणि प्रक्रिया सुलभ करून हे क्षेत्र खुले केले, असे सिंह यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

### ठळक मुद्दे

- २०१४ मध्ये ४६ हजार कोटी रुपये असलेले देशांतर्गत उत्पादन आता १.५० लाख कोटींपेक्षा जास्त. त्यात खाजगी क्षेत्राचे योगदान ३० हजार कोटींचे
- १० वर्षांपूर्वी संरक्षण निर्यात केवळ हजार कोटी रुपयांची. आता २५ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढली. २०२९-३० पर्यंत ५० हजार कोटीं रुपयांचे लक्ष्य.

### सोलर समूहाचे कौतुक

भारत एक प्रमुख शस्त्र निर्यातदार देश बनण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत आहे. दारुगोळ्याच्या पुरवठ्यात कमतरता जाणवली होती. परंतु, सरकारने या क्षेत्रात आत्मनिर्भरता आणली आहे. पिनाका क्षेपणास्त्रे आणि नागास्त्र ड्रोनसारख्या विविध संरक्षण उत्पादनांनी 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये बजावलेल्या कामगिरीसाठी सोलर समूहाचे राजनाथसिंह यांनी कौतुक केले.

### खाजगी क्षेत्र सार्वजनिक क्षेत्राच्या पुढे

खासगी क्षेत्र चांगली कामगिरी करीत असल्याने चांगल्या दर्जाची उत्पादने, वेळेवर काम पूर्ण होणे तसेच उत्पादकता आणि वितरणात सुधारणा होत आहे. आपल्या संरक्षण परिसंस्थेत खूप सुधारणा झाली आहे. खाजगी संरक्षण क्षेत्रात वैज्ञानिक दृष्टिकोन आणि तंत्रज्ञान आधारित दृष्टिकोन, ज्या प्रकारे विकसित झाला, तो अत्यंत प्रशंसनीय आहे. संशोधन आणि विकासाच्या बाबतीत आता खाजगी क्षेत्र सार्वजनिक क्षेत्राच्या पुढे आहे, असे राजनाथसिंह यांनी निदर्शनास आणून दिले.

## लोणार रामसर साईट येथे आशियाई पाणपक्षी गणना उत्साहात

**बुलढाणा, १८ जानेवारी -**

वेटलँड इंटरनॅशनल साऊथ एशिया, मी लोणारकर टीम, निसर्ग मल्टिपर्पज फाऊंडेशन व लोणार/अकोला वन्यजीव विभागातर्फे १० ते १८ जानेवारी रोजी लोणार रामसर साईट तसेच अभयारण्यालगत आशियाई पाणपक्षी गणना करण्यात आली. खारे पाणी असलेले जंगल म्हणून प्रसिद्ध असलेले लोणार अभयारण्याची पाणथळ जागा पाणपक्ष्यांसाठी नंदनवन ठरत आहेत. येथे येणाऱ्या स्थलांतरित व स्थानिक पाणपक्ष्यांच्या नोंदी जगाच्या नकाशावर येण्यासाठी या आशियाई पाणपक्षी गणनेचे आयोजन प्रधान मुख्य वनसंरक्षक एम. एस रेड्डी, अकोला वन्यजीव विभागाचे विभागीय वन अधिकारी यशवंत नागुलवार व आशियाई पाणपक्षी गणनेचे राज्य समन्वयक डॉ. राजू कसंबे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले.

# दर्शनाच्या ओढीत निघाले, पण वाटेतच काळाने गाठले

### सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावर ५ जणांचा दुर्दैवी अंत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ जानेवारी-**

सोलापूर-पुणे महामार्गावर देवदर्शनासाठी निघालेल्या भाविकांच्या कारचा भीषण अपघात झाला. मोहोळजवळील देवडी पाटीजवळ शनिवारी रात्री ही घटना घडली. या अपघातात पाच भाविकांचा मृत्यू झाला असून एक महिला गंभीररित्या जखमी झाली आहे.

याबाबतचे वृत्त असे की, पनवेल येथून अक्कलकोटला देवदर्शनासाठी निघालेल्या भाविकांची कार रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर जोरात आदळली. कारचालकाचा ताबा सुटल्याने कार झाडाला धडकली. कारचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. कारमध्ये तीन पुरुष आणि तीन



महिला असे एकूण सहा प्रवासी होते.

या अपघाताची माहिती मिळताच, स्थानिक नागरिक आणि मोहोळ पोलिस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. मात्र, तोपर्यंत कारमधील पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. एक महिला गंभीररित्या जखमी होती. संबंधित महिलेला तातडीने मोहोळ येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिच्यावर उपचार सुरु आहेत. या अपघातातील मृत व्यक्तींची ओळख पटवण्याचे काम मोहोळ पोलिस करत आहेत. दरम्यान, या अपघातामुळे राष्ट्रीय महामार्गावरील वेग आणि सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.






CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### गुजरातमध्ये ३५,००० कोटींची गुंतवणूक करणार मारुती

**गांधीनगर** : देशातील सर्वात मोठी कार कंपनी मारुती सुझुकी आता गुजरातमध्ये आपली उपस्थिती आणखी वाढवणार आहे. कंपनीने राज्याच्या खोराज (गांधीनगर जिल्हा) येथे नवीन उत्पादन प्रकल्प उभारण्यासाठी गुजरात सरकारसोबत ३५,००० कोटींच्या गुंतवणुकीचा करार केला आहे. गांधीनगर येथे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल आणि मारुती सुझुकीचे एमडी हिताशी ताकेयुची यांच्या उपस्थितीत या गुंतवणुकीचे पत्र सुपूर्द करण्यात आले. या नवीन प्रकल्पातून राज्यात सुमारे १२,००० लोकांना रोजगार मिळण्याची अपेक्षा आहे. खोराजमध्ये उभारण्यात येणारा हा नवीन प्रकल्प १,७५० एकर जमिनीवर पसरलेला असेल. कंपनीचे उद्दिष्ट आहे की येथे दरवर्षी १० लाख (१ दशलक्ष) वाहने तयार केली जावीत. गुजरात इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन या प्रकल्पासाठी जमीन उपलब्ध करून देत आहे. या गुंतवणुकीमुळे गुजरात भारताच्या एका मोठ्या ऑटोमोबाइल हबच्या रूपात आणखी मजबूत होईल.

### ओपन एआयने आणले चॅटजीपीटी ट्रान्सलेट


**नवी दिल्ली** : ओपनएआयने आपले नवीन एआय-शक्तीचे टूल चॅटजीपीटी ट्रान्सलेट लाँच केले आहे. या टूलमुळे तुम्ही लॉग-इन न करता आणि सबस्क्रिप्शन शुल्क न देता ५० पेक्षा जास्त भाषांमध्ये भाषांतर करू शकाल. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) कंपनीने हे गुगल ट्रान्सलेटला टक्कर देण्यासाठी बनवले आहे. चॅटजीपीटीमध्ये भाषांतराचे वैशिष्ट्य आधीही होते, आता कंपनीने यासाठी एक वेगळा वेब प्लॅटफॉर्म तयार केला आहे, जो दिसण्यात बऱ्याच अंशी गुगल ट्रान्सलेटसारखाच दिसतो. या नवीन टूलची सर्वात मोठी खासियत ही आहे की ते केवळ शब्दांचे भाषांतर करत नाही, तर वाक्यामागील भाव (टोन) आणि संदर्भ (कॉन्टेक्स्ट) देखील समजून घेते. तसेच ते म्हणीचा अर्थही समजावून सांगू शकते.

### २४२ अवैध ऑनलाईन गेमिंग लिंक ब्लॉक

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने देशातील अवैध ऑनलाईन सट्टेबाजी आणि जुगाराशी संबंधित २४२ वेबसाइट्सच्या लिंक्स ब्लॉक करण्याचे आदेश दिले आहेत. ऑनलाइन गेमिंग ॲक्ट बनल्यानंतर ही सरकारची आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई आहे. युवकांना आर्थिक आणि सामाजिक नुकसानीपासून वाचवण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. ऑनलाईन गेमिंग ॲक्ट संसदेत पास झाल्यानंतर अंमलबजावणीच्या कारवाईत मोठी वाढ झाली आहे. आतापर्यंत ७,८०० हून अधिक अवैध सट्टेबाजी आणि जुगाराच्या वेबसाइट्स बंद करण्यात आल्या आहेत. त्वरित पैशांचे आमिष दाखवून लोकांची दिशाभूल करणाऱ्या प्लॅटफॉर्मवर लगाम घालणे हे सरकारचे उद्दिष्ट आहे.

### पद्मविभूषण इलयाराजा यांना पद्मपाणि पुरस्कार जाहीर

**छ. संभाजीनगर** : जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठवाड्यातील रसिकांपर्यंत पोहोचवणाऱ्या अकराव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची घोषणा करण्यात आलेली असून बुधवार २८ जानेवारी ते रविवार ०१ फेब्रुवारी २०२६ या दरम्यान हा महोत्सव छत्रपती संभाजीनगर येथे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील कलावंताच्या मांदियाळीत संपन्न होणार आहे. या महोत्सवात भारतीय सिनेसृष्टीतील अतुलनीय योगदानाबद्दल दिला जाणारा पद्मपाणि पुरस्कार चित्रपट संगीताला नवी दिशा देणारे ज्येष्ठ भारतीय संगीतकार, पद्मविभूषण श्री. इलयाराजा (राज्यसभा सदस्य) यांना जाहीर करण्यात आला आहे. यासंदर्भातील घोषणा महोत्सवाचे अध्यक्ष आशुतोष गोवारीकर यांनी केली. पद्मपाणि सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व दोन लक्ष रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे.




### सराफा

| | |
|---|---|
| **सोने** (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,४२,६०० |
| **चांदी** (प्रतिकिलो) | रु. २,८३,५०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३३.४ | १६.७ |
| अमरावती | ३२.४ | १३.३ |
| भंडारा | ३०.४ | १३.६ |
| बुलडाणा | ३०.३ | १६.० |
| चंद्रपूर | ३२.० | १३.० |
| गडचिरोली | ३०.४ | १२.० |
| गोंदिया | ३०.६ | ९.८ |
| नागपूर | ३०.९ | ११.० |
| वर्धा | ३१.० | ११.५ |
| वाशीम | ३१.२ | १३.४ |
| यवतमाळ | ३१.४ | १०.४ |

# ‘तृणमूल’ची घुसखोरांना मदत

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा घणाघात ● बंगालमधील महाजंगलराज संपुष्टात आणा

◆ **सिंगूर, १८ जानेवारी**

पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसचे सरकार मतपेटीच्या राजकारणासाठी घुसखोरांना मदत करून राष्ट्रीय सुरक्षेशी खेळत आहे, असा घणाघात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी ममता सरकारवर केला. विकास आणि सुशासनाचा मार्ग मोकळा करण्यासाठी बंगालमधील महाजंगलराज संपुष्टात आणणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

सीमेवरील कुंपण उभारण्यासह इतर महत्त्वाच्या सुरक्षा उपाययोजना करण्यात राज्य सरकारने केंद्राला सहकार्य केले नाही, असे मोदी यांनी हुगळी जिल्ह्यातील सिंगूर येथील एका सभेला संबोधित करताना सांगितले. तृणमूल काँग्रेस राष्ट्रीय सुरक्षेशी खेळत आहे. ते घुसखोरांना संरक्षण



देण्याचा प्रयत्न करीत आहेत. घुसखोरांना आपली मतपेढी मानत असल्याने ही मदत केली जात असल्याचा दावा नरेंद्र मोदी यांनी केला. बनावट दस्तावेज तयार करून राज्यात राहणाऱ्या अवैध स्थलांतरितांना ओळखले पाहिजे आणि त्यांना त्यांच्या देशात परत पाठवले पाहिजे. सीमेवर कुंपण उभारण्यासाठी जमीन अधिग्रहणाबाबत केंद्र सरकार कित्येक वर्षांपासून तृणमूल काँग्रेसला पत्र पाठवत आहे. पण, राज्य सरकारने काहीही केले नाही,

**संदेशखालीची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून...**

भाजपा सरकार हे संपवून टाकले. कायदा आणि सुव्यवस्था सुधारल्यावरच पश्चिम बंगालमध्ये उद्योग आणि गुंतवणूक येईल. संदेशखालीत जमिनी बळकावणे आणि बलात्काराच्या घटनांची पुनरावृत्त होऊ नये आणि भ्रष्टाचाराच्या कारणाने शिक्षकांना आपल्या नोकऱ्या गमवाव्या लागू नयेत, यासाठी लोकांनी मतदान केलेच पाहिजे, असे मोदी यांनी सांगितले.

असा आरोप मोदी यांनी केला.

घुसखोरांना बंगालमध्ये स्थायिक होण्यास मदत करणाऱ्या गटांना तृणमूल काँग्रेसने सहकार्य केले. भाजपा सरकार राज्यातून या घुसखोरांना मुळापासून उपटून काढेल, असे मोदी यांनी ठामपणे सांगितले.

भाजपाला दिलेले तुमचे मत बंगालमधून घुसखोरांना बाहेर काढण्यास मदत करेल. राज्यात ‘डबल इंजिन’ सरकार स्थापन करण्याच्या पक्षाच्या आवाहनाचा त्यांनी यावेळी पुनरुच्चार केला.

तृणमूल काँग्रेसच्या महाजंगलराजचा अंत करणे आणि सुशासनासाठी कटिबद्ध असलेले भाजपा सरकार आणणे आवश्यक आहे. पश्चिम बंगालमध्ये भाजपाचे ‘डबल इंजिन’ सरकार असलेच पाहिजे. कारण, त्यामुळे विकासाला गती मिळेल. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेच्या स्थितीवरून सत्ताधारी तृणमूल काँग्रेसवर तीव्र हल्ला चढवताना मोदी यांनी आरोप केला की, दंगलखोर आणि तृणमूलच्या सिंडिकेट राजला मोकळे रान मिळाले आहे. (वृत्तसंस्था)

# बिजापुरात दुसऱ्या दिवशी दोन माओवाद्यांचा खात्मा

◆ **बिजापूर, १८ जानेवारी**

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत चार माओवादी ठार झाल्यानंतर, त्याच मोहिमेदरम्यान रविवारी या भागात आणखी दोन माओवाद्यांना कंठस्नान घालण्यात आले, असे पोलिसांनी सांगितले.

ही चकमक जिल्ह्याच्या वायव्य भागातील डोंगराळ जंगल परिसरात आज सकाळी झडली. सुरक्षा दलाचे संयुक्त पथक येथे नक्षलविरोधी अभियान राबवत आहे, असे बिजापूरचे पोलिस अधीक्षक जितेंद्र यादव यांनी सांगितले.

शनिवारी याच कारवाईदरम्यान चार माओवादी ठार झाले. विभागीय समितीचा सदस्य दिलीप वेडजा, क्षेत्र समितीचा सदस्य माडवी कोसा आणि लक्की मडकाम तसेच पक्षाची सदस्य राधा मेटाचा त्यात समावेश आहे. ते चौघेही माओवाद्यांच्या राष्ट्रीय उद्यान क्षेत्र समितीत सक्रिय होते, असे यादव यांनी सांगितले. आज ठार झालेल्या दोन माओवाद्यांची ओळख अद्याप पटलेली नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. या मोहिमेमध्ये राज्य पोलिस दलाचे विशेष कृती दल आणि जिल्हा राखीव रक्षक, सीआरपीएफच्या कोब्रा या विशेष गटाचा सहभाग आहे. (वृत्तसंस्था)

# संघ शताब्दी वर्षानिमित्त संघाचे कार्य घरोघरी पोहोचवा

## सचिन जोशी यांचे आवाहन ● विद्या भारती प्रांत बैठक संपन्न

◆ **वर्धा, १८ जानेवारी**

संघ शताब्दी वर्षाच्या निमित्ताने संपर्क अभियानाच्या माध्यमातून संघाचा शंभर वर्षांचा गौरवशाली इतिहास घरोघरी सांगावा व समाजातील गैरसमज दूर करून प्रत्येक जिल्ह्यापर्यंत विद्या भारतीचे कार्य पोहोचवणे आपले कर्तव्य असल्याचे प्रतिपादन विद्या भारती प्रांत अध्यक्ष सचिन जोशी यांनी केले.

विद्या भारती विदर्भ प्रांताची द्विदिवसीय प्रांत बैठक १७ व १८ जानेवारी रोजी वर्धा येथे पार पडली. मंचावर विद्या भारतीचे प्रांत अध्यक्ष सचिन जोशी, प्रांत मंत्री रोशन आगरकर, सहमंत्री समीर थोडगे, वर्धा जिल्हा अध्यक्ष मदन परसोडकर उपस्थित होते.

बैठकीत सहमंत्री दिलीप जोशी यांनी पंचकोषात्मक विकास व ‘दायित्व बोध’ या महत्त्वाच्या विषयांवर प्रभावी मार्गदर्शन केले. पंचकोषात्मक विकासाची सांगड विद्या भारतीच्या पाच आधारभूत विषयांशी कशी जोडलेली आहे, हे त्यांनी स्पष्ट केले. सहमंत्री रणदीप बिसने यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार भारतीय पंचपदी शिक्षण पद्धतीचे सविस्तर विवेचन केले.

संघटनात्मक विषयांवर चर्चा करताना सर्व कार्यकर्त्यांनी कामाला प्राधान्य देण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. संघ शताब्दी वर्षाच्या निमित्ताने प्रत्येक जिल्ह्यापर्यंत विद्या भारतीचे कार्य पोहोचवण्याचा संकल्प करण्यात आला. सप्तशक्ती संगम कार्यक्रमाच्या यशाबद्दल प्रांत व जिल्हा संयोजकांचे अभिनंदन करण्यात आले.

बैठकीत जिल्ह्याची भौगोलिक रचना, संघटनात्मक माहिती, जिल्हा बैठकांचा आढावा, संलग्न शिक्षण संस्था, शाळा व शिशुवाटिकांची माहिती, आचार्य प्रशिक्षण वर्ग, संस्कृती ज्ञान परीक्षेतील सहभागी शाळा व विद्यार्थ्यांची संख्या, सप्तशक्ती संगमची संख्यात्मक माहिती व मागील तीन महिन्यांत झालेले विशेष कार्यक्रम तसेच आगामी सूर्यनमस्कार व वसंत पंचमी कार्यक्रमांचे नियोजन आदी विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीसाठी क्षेत्र पदाधिकारी, विदर्भ व देवगिरी प्रांत संघटन मंत्री, प्रांत कार्यकारिणी, आधारभूत विषय प्रमुख, आयाम प्रमुख, गतिविधी प्रमुख, समरसता संगम संयोजिका व सहसंयोजिका यांच्यासह जिल्हाध्यक्ष, उपाध्यक्ष, मंत्री, सहमंत्री, जिल्हास्तरीय सप्तशक्ती संगम संयोजक, सोबतच विद्या भारती विदर्भ प्रांताचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, मंत्री व सहमंत्री यांची प्रामुख्याने उपस्थित होते. (तभा वृत्तसेवा)




कार्यक्रमात बोलताना सचिन जोशी. मंचावर उपस्थित रोशन आगरकर, समीर थोडगे व मदन परसोडकर

# भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षाची निवडणूक प्रक्रिया आज

## नितीन नबीन यांच्या अविरोध निवडीची घोषणा होणार

◆ **नवी दिल्ली, १८ जानेवारी**

भाजपाच्या नव्या राष्ट्रीय अध्यक्ष निवडीची प्रक्रिया सोमवारी सुरू होत आहे. कार्यकारी अध्यक्ष नितीन नबीन हेच भाजपाचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष होणार आहेत.

नवा अध्यक्ष निवडण्यासाठी भाजपा मुख्यालयात निवडणूक प्रक्रिया राबवली जाणार आहे. अध्यक्षपदासाठी सोमवारी दुपारी २ ते ४ या वेळात उमेदवारी अर्ज भरता येईल. दुपारी ४ ते ५ या वेळेत अर्जांची छाननी केली जाईल. सायंकाळी ५ ते ६ या वेळात अर्ज



मागे घेता येईल. एकापेक्षा जास्त उमेदवारांनी अर्ज दाखल केल्यास मंगळवारी सकाळी ११.३० ते दुपारी १.३० या वेळेत मतदान घेतले जाईल. अध्यक्षपदासाठी नबीन यांचा एकमेव अर्ज असल्यास निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. के. लक्ष्मण सोमवारी सायंकाळी ६.३० वाजता नितीन नबीन यांच्या अविरोध निवडीची घोषणा करतील. अध्यक्षपदासाठी नितीन नबीन यांचा एकमेव अर्ज राहणार असल्यामुळे भाजपाच्या नव्या राष्ट्रीय अध्यक्षाची निवडणूक प्रक्रिया अविरोध होणार, हे निश्चित मानले जात आहे. नबीन उमेदवारी अर्जाचे तीन संच सादर करणार आहेत. उमेदवारी अर्जाच्या पहिल्या संचावर पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षणमंत्री राजनाथसिंह, गृहमंत्री अमित शाह आणि भाजपाचे विद्यमान अध्यक्ष जे.पी. नड्डा यांच्यासह काही केंद्रीय मंत्री सूचक आणि अनुमोदक राहणार आहेत. (तभा वृत्तसेवा)



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे रविवारी दावोस येथे वर्ल्ड इकोनॉमिक फोरमसाठी आगमन झाले. यावेळी मराठमोळ्या पद्धतीने त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

# देशाच्या फाळणीबद्दल मुलांना सांगितले पाहिजे : सुधा मूर्ती

◆ **जयपूर, १८ जानेवारी**

जेव्हा मी देशाच्या फाळणीकडे पाहते तेव्हा मला असे वाटते की मुलांना सांगितले पाहिजे की ते घडले, ते चुकीचे होते. ते पुन्हा घडू नये. सध्याच्या पाकिस्तान आणि बांगलादेशमधून ज्यांना आपले घर सोडावे लागले त्यांच्याबद्दल मला वाईट वाटते, अशी भावना राज्यसभेच्या खासदार आणि इन्फोसिस फाउंडेशनच्या अध्यक्षा सुधा मूर्ती यांनी व्यक्त केली.

जयपूर साहित्य महोत्सवात त्यांच्या ‘द मॅजिक ऑफ द एट इयर्स’ या पुस्तकावरील सत्रात बोलताना त्यांनी हे विधान केले. त्यांचे जावई, माजी ब्रिटिश पंतप्रधान ऋषी सुनक यांचे कुटुंब पाकिस्तान सोडून लंडनला कसे पोहोचले याचे वर्णन तिने केले. सुनक यांचे आजी-आजोबा मूळचे गुजरांवाला (आताचे लाहोर) पाकिस्तान येथील होते.

फाळणीच्या वेळी त्यांना त्यांचा व्यवसाय, घर आणि पैसा मागे सोडून आफ्रिकेत जावे लागले. तिथे त्यांनी त्यांचे जीवन पुन्हा उभारले. त्यानंतर ते लंडनला गेले. त्यावेळी सुनक दहा वर्षांचे होते. कुटुंबाने दोनदा त्यांचे घर गमावले. तरीही, त्यांनी शून्यापासून सुरुवात केली. आज त्यांचे कुटुंब जिथे आहे ते त्या संघर्षाचे आणि कठोर परिश्रमाचे परिणाम आहे. भारताच्या संस्कृती, भाषा किंवा लोकांबद्दल काहीही माहिती नसलेल्या व्यक्तीने फक्त पेन्सिलने एक रेषा काढली आणि म्हटले, आजपासून ही भूमी तुमची नाही. ही भूमी परकी आहे. जर कोणी मला सांगितले की कर्नाटक आता तुमचा नाही तर ते किती वेदनादायक असेल, असे सुधा म्हणाल्या. भारतात सिंध नावाची कोणतीही जागा नाही. तिथे राहणारे लोक अचानक रस्त्यावर सोडून गेले आणि निर्वासित झाले. सिंधी लोकांकडे काहीही शिल्लक राहिले नाही. सुमारे २० वर्षांपूर्वी मी पाकिस्तानला गेले होते. तिथे, रावळपिंडीमध्ये मी श्रीमती कोहलीला पाहिले, ज्या त्यांचे जुने घर पाहून रडत होत्या. मी जे विचार करते आणि प्रत्यक्षात जे पाहते ते मी पुस्तकांमध्ये लिहिते. मी १५ वर्षांत मुलांसाठी २५ हून अधिक पुस्तके लिहिली आहेत. (वृत्तसंस्था)



राष्ट्र सेविका समिती वर्धा नगरच्या वतीने रविवारी सायंकाळी अष्टभुजा मंदिरातून सघोष संचलन काढण्यात आले. धंतोली, बढे चौक, सोशालिस्ट चौक, इंदिरा मार्केट, वंजारी चौक मार्गे फिरून अष्टभुजा मंदिरात संचलनाचा समारोप झाला (छाया : राहुल तेलरांधे)

### पुंगनूर गायी आणि मोदी



**गायीला** हिंदू धर्मात अतिशय पवित्र मानले जाते, गायीच्या पोटात ३३ कोटी देव असतात, अशी धारणा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा गोब्राह्मण प्रतिपालक म्हणून केला जातो. गाय अतिशय उपयुक्त पशु आहे, गायीच्या दुधाचे महत्त्व तर असाधारणा असेच आहे, पण गायीचे शेण आणि गोमुत्रातही औषधी गुण असल्याचे सिद्ध झाले आहे. तरीही आपल्या देशात गोहत्या मोठ्या प्रमाणात होतात. त्यामुळेच गोहत्याबंदीचा कायदा करावा, अशी मागणी केली जाते. अनेक राजकीय पक्षांनी आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात गोहत्याबंदीच्या कायद्याचे आश्वासन दिले आहे. काही राज्यांत असा कायदा आहे, पण सध्या तो देशभरात नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी गोभक्त आहेत. राजधानी दिल्लीतील आपल्या शासकीय निवासस्थानी त्यांनी गायी पाळल्या आहेत. दरवर्षी मकरसंक्रांतीच्या दिवशी या गायींना चारा खाऊ घालत असल्याचा मोदींचा व्हिडीओ व्हायरल होत असतो. यावर्षीही तसा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. मोदी समोरून येत असताना चार गायी त्यांच्या दिशेने धावत असल्याचे यात दिसते. मोदी या चारही गायींना प्रेमाने जवळ घेऊन चारा खाऊ घालत असल्याचे यात दिसते.

मोदी ज्या गायींना चारा खाऊ घालतात, त्या गायी साधारण नाही. या गायींची उंची नेहमीच्या गायींपेक्षा कमी आहे. म्हणजे त्या बऱ्यापैकी ठेंगण्या आहेत. आंध्रप्रदेशच्या चित्तुर जिल्ह्यातील पुंगनूर गावातील या गायी आहेत. गावाच्या नावावरून पुंगनूर गायी म्हणूनच त्या ओळखल्या जातात. या गायी अतिशय शांत स्वभावाच्या असतात. त्यांचे दुध अतिशय पोषक असते. एका गायीची किंमत दहा लाख रुपये असते. या गायींची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे, त्यामुळे त्यांचे जतन आणि संवर्धन होण्याची गरज आहे. पंतप्रधान मोदी यांनी आपल्या कृतीतून तेच सांगितले आहे. स्वत:ला गोभक्त म्हणणे सोपे असते, पण गाय पाळणे कठीण असते. प्रत्येक भारतीयाने किमान एक गाय पाळली पाहिजे, असा मोदींचा संदेश आहे.

●● ●●

### राघव चड्ढा गिग कर्मचारी बनतात तेव्हा...

**गेल्या** काही महिन्यांत गिग कर्मचाऱ्यांच्या समस्यांची चर्चा जोरात सुरू आहे. ३१ डिसेंबरला राजधानी दिल्लीसह काही राज्यांतील गिग कर्मचाऱ्यांनी संपावर जाण्याचा इशारा दिला होता. या कर्मचाऱ्यांना अतिशय अत्यल्प मानधनात काम करावे लागते. दहा मिनिटांत कोणताही ऑर्डर ग्राहकांच्या घरी पोहोचवावा लागतो. यामुळे त्यांना वेळेशी स्पर्धा करावी लागते. आपला जीव धोक्यात टाकून पिझ्झा आणि बर्गर आदी वस्तू ग्राहकांच्या निवासस्थानी नेऊन द्याव्या लागतात. यासाठी संबंधित कंपन्या त्यांच्यावर दबाव टाकतात. यावर बराच गदारोळ झाल्यानंतर केंद्र सरकारने एका परिपत्रक काढत दहा मिनिटांत कोणत्याही खाद्यपदार्थाची मागणी ग्राहकांच्या घरी पोहोचवण्यावर निर्बंध आणले. दहा मिनिटांचा वेळ किती मिनिटे केला, ते मात्र समजू शकले नाही. पण गिग कर्मचाऱ्यांवरील अन्यायाच्या विरोधात अनेक राजकीय पक्षांनी




आवाज उठवला. यात आपचे राज्यसभा सदस्य राघव चड्ढा आघाडीवर होते. त्यांनी केलेले प्रयत्न देशभर चर्चेचा विषय ठरले. चित्रपट अभिनेत्री परिणती चोप्रासोबत विवाह केल्यामुळे राघव चर्चेत आले होते. राघव चड्ढा यांनी गिग कर्मचाऱ्यांसारखा गणवेश परिधान करून स्कुटीवरून काही खाद्यपदार्थांची मागणी ग्राहकांच्या घरी पोहोचवली. गिग कर्मचाऱ्यांना काम करताना कोणत्या अडचणींचा सामना करावा लागतो, याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी त्यांनी हे केले, असे म्हणतात. त्यांनी कोणत्या भाग्यवान ग्राहकांच्या घरी बर्गर आणि पिझ्झा दहा मिनिटांत पोहोचवाला, ते समजू शकले नाही. मात्र या मुद्यावरून राघव यांनी जनजागृती घडवून आणली. मागणी नोंदविल्यानंतर दहा मिनिटांत पिझ्झा आणि बर्गर घरी नाही आला, तर आकाश कोसळणार आहे का? राघव चड्ढा यांनी प्रसिद्धीसाठी हे सर्व केले, असे काही जण म्हणत असले, तरी त्यांनी गिग कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी एक चांगला प्रयत्न केला, असे म्हणायला हरकत नाही.

●● ●●

### खट्टर यांनी ठेवले नियमावर बोट

**संक्रांतीच्या** पर्वावर पंजाब आणि उत्तर भारतात लोहडी समारंभाचे आयोजन केले जाते. लोहडीत शेकोटी पेटविल्यासारखी लाकडाची होळी पेटवली जाते आणि त्या भोवती गाण म्हणत लोक गोलाकार फिरत नाचत असतात. थंडी हळूहळू कमी होत असते आणि शेतात पिके बहरण्याच्या टप्प्यात असतात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मनात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण असते, त्यामुळे शेतकऱ्याच्या जीवनातील संभाव्य समृद्धीचे प्रतीक म्हणून या सणाकडे पाहिले जाते. सक्रांतीच्या आदल्या दिवशी म्हणजे १३ जानेवारीला लोहडी साजरा केला जातो.

हरयाणा मैत्री समाजातर्फे यावर्षी हरयाणा भवनात लोहडी समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. केंद्रीय ऊर्जा आणि ग्रामविकास मंत्री मनोहरलाल खट्टर, सरन्यायाधीश सूर्यकांत आणि दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. कोणताही कार्यक्रम रात्री दहापर्यंत संपवला पाहिजे, असा शासकीय नियम आहे. लोहडी कार्यक्रमासाठी येताना हा कार्यक्रम रात्री दहापर्यंत संपवत असाल तरच मी येईल, असे केंद्रीय मंत्री खट्टर यांनी सांगितले होते. त्यामुळे खट्टर यांच्या आग्रहामुळे हा कार्यक्रम रात्री दहा वाजता आयोजकांना संपवावा लागला. आपण उपस्थित असलेल्या कार्यक्रमात शासकीय नियमांचा भंग झाला, असे होऊ नये, याची खबरदारी खट्टर यांनी घेतली, ती स्तुत्य म्हटली पाहिजे.

●● ●●

### समूह छायाचित्राचा असाही पेचप्रसंग...

**मोदी** सरकारचा नवीन वर्षाचा अर्थसंकल्प यावेळी रविवार, १ फेब्रुवारीला संसदेत सादर केला जाणार आहे. मात्र, यावेळी अर्थमंत्रालयासमोर एक नवा पेचप्रसंग उद्‌भवला आहे. अर्थमंत्रालय नॉर्थ ब्लॉकमधून कर्तव्य भवनात स्थानांतरित झाले आहे. मात्र, अर्थसंकल्प ज्या छापखान्यात छापला जातो, तो छापखाना अद्याप कर्तव्य भवनात आला नाही. त्यामुळे अर्थसंकल्प नॉर्थ ब्लॉकमधील जुन्या छापखान्यात छापला जात आहे. पेंचप्रसंग अर्थसंकल्प कुठे छापायचा हा नाही, तर अर्थमंत्री, अर्थराज्यमंत्री सचिवांसोबत अर्थसंकल्प संसदेत सादर करण्यासाठी जात असताना आतापर्यंत नॉर्थ ब्लॉकमध्ये समूह छायाचित्र काढले जात होते. यावेळी अर्थमंत्रालय कर्तव्य भवनात, तर अर्थसंकल्प छापला जाणार जुन्या अर्थमंत्रालयात. त्यामुळे समूह छायाचित्र कुठे काढावे, हा तो पेंचप्रसंग आहे, याचे उत्तर १ फेब्रुवारीलाच मिळणार आहे.

● **दिल्लीवाला**

# आनंद एल. राय यांच्याविरोधात खटला दाखल


**मुंबई** : बॉलिवूडमध्ये कॉपीराइट वादाने जोर पकडला आहे. इरॉस इंटरनॅशनल मीडिया लिमिटेडने मुंबई उच्च न्यायालयात चित्रपट निर्माता आनंद एल. राय आणि त्यांची प्रोडक्शन कंपनी कलर यलो मीडिया एंटरटेनमेंट एलएलपी यांच्या विरोधात खटला दाखल केला आहे. इरॉसचा आरोप आहे की आनंद राय यांच्या नवीन चित्रपट तेरे इश्क में (२०२५) ला जाणूनबुजून २०१३ च्या हिट चित्रपट ‘रांझणा’चा ‘स्पिरिचुअल सीक्वल’ म्हणून प्रचारित केले गेले, ज्यामुळे त्यांच्या सद्‌भावनेचा (गुडविलचा) अवैध फायदा घेतला गेला. कंपनी ८४ कोटींच्या नुकसान भरपाईची मागणी करत आहे.

# भाजपाचे ज्येष्ठ नेते राज पुरोहित यांचे निधन

## महत्त्वाचा आधारस्तंभ काळाच्या पडद्याआड

◆ **मुंबई, १८ जानेवारी**

भाजपाचे ज्येष्ठ नेते, मुंबई भाजपाचे माजी प्रदेशाध्यक्ष आणि माजी मंत्री राज के. पुरोहित यांचे रविवारी निधन झाले. ते ७१ वर्षांचे होते. मुंबईतील एका खाजगी रुग्णालयात



उपचार सुरू असताना त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

राज पुरोहित हे मुंबई भाजपाच्या जडणघडणीतील एक महत्त्वाचे नेतृत्व मानले जात होते. त्यांनी राज्य सरकारमध्ये मंत्रिपदाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली होती. त्यांच्या निधनामुळे भाजपाने एक अनुभवी, अभ्यासू आणि पक्षनिष्ठ नेता गमावल्याची भावना केली जात आहे.

राज पुरोहित यांची ओळख एक आक्रमक, स्पष्टवक्ते आणि जनतेच्या प्रश्नांसाठी सदैव आवाज उठवणारे नेते अशी होती. विधानसभेत जनहिताच्या मुद्यांवर त्यांचा आवाज नेहमीच बुलंद राहिला. सामान्य कार्यकर्त्यांमध्ये ते ‘राजभाई’ या नावाने परिचित होते.

**अभ्यासू नेतृत्व गमावले : मुख्यमंत्री**

दांडगा जनसंपर्क आणि जनतेच्या प्रश्नांसाठी झटणारे क्रियाशील नेतृत्व गमावल्याची भावना व्यक्त करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज पुरोहित यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण

**मुलगा आकाश पुरोहित यांचा महापालिकेत विजय**

अलिकडे झालेल्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीत वॉर्ड क्रमांक २२१ मधून राज पुरोहित यांचे पुत्र आकाश पुरोहित विजयी झाले आहेत. एकेकाळी दक्षिण मुंबईतील भाजपाचे सामर्थ्यशाली नेते म्हणून ओळखले जाणारे राज पुरोहित गेल्या काही वर्षांत कुलाबा मतदारसंघात राहुल नार्वेकर यांची ताकद वाढल्यानंतर सक्रिय राजकारणातून काहीसे दूर झाले होते. (तभा वृत्तसेवा)

# अमेरिकेविरोधात ग्रीनलँडमध्ये निदर्शने




◆ **नुउक, १८ जानेवारी**

ग्रीनलँडवर ताबा मिळविण्याची धमकी देणारे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याविरोधात हजारोंच्या संख्येने लोक रविवारी रस्त्यावर उतरले. नागरिकांनी अमेरिकेविरोधात जोरदार घोषणाबाजी करीत आमचा देश विक्रीसाठी नाही; ताबा मिळविण्याचा प्रयत्न केल्यास शस्त्रे उचलू, असा इशारा दिला.

बर्फाळ रस्त्यांवरून आंदोलक ग्रीनलँडची राजधानी नुउकच्या डाउनटाउनमधून अमेरिकन वाणिज्य दूतावासापर्यंत पोहोचले. यावेळी त्यांनी राष्ट्रीय ध्वज फडकवले आणि विरोध दर्शवणारे फलक हातात धरले होते. आंदोलनात देशातील ७५ टक्के लोक सहभागी झाले. यात मुले आणि महिलांचा समावेश होता. अमेरिका बळजबरीने आमच्या देशाचा ताबा घेऊ शकत नाही. त्यांनी लष्कराच्या बळावर घुसखोरी केल्यास आम्ही शस्त्रे हातात घेऊ असा इशारा आंदोलकांनी दिला. ट्रम्प यांचा देशावर ताबा मिळविण्याचा डाव उधळून लावू, कोणत्याही परिस्थितीत त्यांना आमच्या देशात प्रवेश देणार नाही, असे आंदोलकांनी बजावले. या निदर्शनात लोक आपल्या नवजात मुलांसोबत आले होते. (वृत्तसंस्था)

### टेरिफच्या धमक्यांना घाबरत नाही



ट्रम्प यांनी ग्रीनलँडमध्ये सैन्य तैनात करणाऱ्या देशांवर व्यापार शुल्क अर्थात् टेरिफ लादण्याची घोषणा केल्यानंतर फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी म्हटले की, अमेरिकेच्या शुल्क लादण्याच्या धमक्यांना आम्ही घाबरत नाही. कोणत्याही परिस्थितीत ग्रीनलँडवर ताबा मिळविणे स्वीकार केले जाणार नाही. कोणताही दबाव किंवा धमकी फ्रान्स आणि युरोपला त्यांच्या तत्त्वांपासून मागे हटण्यास भाग पाडू शकत नाही.

### युरोपच्या सार्वभौमत्वाशी तडजोड नाही

एक्सवरील पोस्टमध्ये मॅक्रॉन म्हणाले, युरोपच्या सार्वभौमत्वाशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही आणि जर टेरिफ लादले गेले तर युरोपियन देश एकत्रित आणि समन्वित पद्धतीने प्रतिसाद देतील. टेरिफ लादण्याच्या धमक्या पूर्णपणे अस्वीकार्य आहेत. ग्रीनलँडमध्ये आमचे सैन्य लष्करी सराव करणार आहे आणि आता आम्ही माघार घेणार नाही.

### ट्रम्प यांचा निर्णय चुकीचा



ब्रिटिश पंतप्रधान केयर स्टारमर यांनी म्हटले की, युरोपियन देशांवर नवीन टेरिफ लादण्याचा अमेरिकेचा निर्णय पूर्णपणे चुकीचा आहे. नाटो सहयोगी देशांच्या सामूहिक सुरक्षेसाठी घेतलेल्या उपाययोजनांवर आक्षेप घेणे खपवून घेतले जाणार नाही. डेन्मार्क आणि ग्रीनलँडच्या लोकांनाच ग्रीनलँडचे भविष्य ठरवण्याचा अधिकार आहे.

### बद्रीनाथ, केदारनाथ मंदिर परिसरात मोबाईल बंदी

◆ **डेहराडून, १८ जानेवारी**

बद्रीनाथ आणि केदारनाथ मंदिरात परिसरात आता मोबाईल नेण्यावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. गढवाल विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. भाविकांचे मोबाईल सुरक्षित ठेवण्यासाठी मंदिर परिसराबाहेर योग्य व्यवस्था करण्याचे निर्देश आयुक्तांनी जिल्हा प्रशासनाला दिले. मोबाईलमुळे दर्शनासाठी भाविकांच्या रांगा रेंगाळत असल्याच्या तक्रारीमुळे हा निर्णय घेण्यात आला.

विभागीय आयुक्त विनय शंकर पांडे यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले, की बद्रीनाथ आणि केदारनाथ मंदिरातील गर्भगृहात दर्शन घेतल्यावर भाविक तिथेच फोटो आणि सेल्फी काढण्यात व्यस्त होतात, ज्यामुळे दर्शनाचा वेग मंदावतो आणि इतर भाविकांचा प्रतीक्षा काळ वाढतो. हा अडथळा दूर करण्यासाठी मंदिर परिसरात मोबाईल वापरण्यास बंदी घालण्यात आली. भाविकांचे मोबाईल सुरक्षित ठेवण्यासाठी मंदिर परिसराबाहेर योग्य व्यवस्था करण्याचे निर्देश दिला आहे. (वृत्तसंस्था)

# भारताला गृहित धरणे अमेरिकेला भोवणार

## रिपब्लिकन पक्षाच्या खासदाराचा ट्रम्प यांना इशारा


◆ **वॉशिंग्टन, १८ जानेवारी**



भारतासोबत अमेरिकेला द्विपक्षीय संबंध बिघडविणे परवडणारे नाही. पाकिस्तान हा कमकुवत देश आहे; त्यांच्यासोबत जवळीक साधणे आणि भारताला गृहित धरणे देशाला भोवणार, असा इशारा अमेरिकन काँग्रेस सदस्य रिच मॅककॉर्मिक यांनी दिला.

एका कार्यक्रमात बोलताना रिच म्हणाले, भारत गुंतवणूक आणि प्रतिभेसाठी मजबूत स्रोत आहे, अशा परिस्थितीत भारताला वेगळे करणे अमेरिकेसाठी एक मोठी समस्या निर्माण करू शकते. भारत आणि पाकिस्तानची तुलना होवूच शकत नाही, अमेरिकेसाठी भारत महत्त्वाचा आणि विश्वासार्ह भागीदार आहे. पाकिस्तानची लोकसंख्या मोठी असली तरी, ते अमेरिकेत लक्षणीय गुंतवणूक करू शकत नाहीत. त्याउलट, गुंतवणूक, तांत्रिक प्रतिभा आणि नवोपक्रमाद्वारे भारत अमेरिकन अर्थव्यवस्थेत एक मजबूत योगदान देत आहे. मॅककॉर्मिक यांनी मान्य केले की रशियाकडून तेल खरेदी करण्यावर अमेरिका नाराज आहे, तर पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांच्या देशाच्या हितांना प्राधान्य देतात. स्वस्त तेल खरेदी करणे ही भारताची आर्थिक गरज आहे. त्यांच्यावर सक्ती लादणे योग्य नाही. (वृत्तसंस्था)

### पाकिस्तानशी भागीदारी अशक्य : अमी बेरा



भारतीय वंशाचे डेमोक्रॅटिक पक्षाचे काँग्रेस सदस्य अमी बेरा म्हणाले, भारतासोबतचे संबंध पूर्वपदावर आणणे अमेरिकेसाठी गरजेचे आहे. अमेरिकन कंपन्या भारतात अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक करतात, त्या तुलनेत पाकिस्तानातील गुंतवणूक नगण्य आहे. पाकिस्तानसोबत भागीदारी अशक्य आहे. जर अमेरिकेने भारताला मित्र म्हणून स्वीकारले तर शांतता आणि समृद्धी साध्य होईल. तथापि, जर भारत दुरावला गेला तर त्याचे परिणाम अमेरिकेसाठीही भयानक असतील.

# उत्तराखंडमध्ये ४० वर्षांनंतर प्रथमच बर्फवृष्टीचा अभाव!

## ग्लोबल वॉर्मिंगमुळे बदलतोय् हिमालय

◆ **डेहराडून, १८ जानेवारी**

उत्तराखंडमध्ये हिवाळ्यातही डोंगरावर बर्फ पडत असतो. ऑक्टोबर ते जानेवारी या कालावधीत हिमालयाच्या उंच भागात नगण्य बर्फवृष्टी झाली आहे. रुद्रप्रयागमधील तुंगनाथच्या उंच भागात जानेवारीमध्ये बर्फ पडला नाही. असे १९८५ नंतर पहिल्यांदाच घडले आहे. जानेवारीत सामान्यपणे बर्फाने झाकलेला बद्रीनाथ आणि केदारनाथसारख्या भागातही अशीच परिस्थिती आहे.

उंचावरील भागांसोबतच नैनिताल, मसुरी आणि मुक्तेश्वरसारख्या टेकड्यांमध्येही बर्फाचा अभाव आहे. १५ हजार फूट उंचीवर असलेल्या गुंजीमध्येही बर्फ पडला नाही. हवामानशास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे की या वर्षी उत्तराखंडमध्ये बर्फवृष्टी न होण्याचे मुख्य कारण जागतिक तापमानवाढ आहे. हिमवृष्टी कमी झाल्यामुळे राज्यातील नंदा देवी वनक्षेत्रात उन्हाळ्याप्रमाणे हिवाळ्यात जंगलात वणवा लागत आहे. हवामानातील यामुळे संपूर्ण हिमालयीन परिसंस्था, जलस्रोत, शेती आणि पर्यटनावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. (वृत्तसंस्था)

### विक्षोभ कमकुवत, डोंगर जणू प्रतीक्षेत...

उत्तराखंडमध्ये बर्फवृष्टी न होण्याचे एक कारण म्हणजे पश्चिमी विक्षोभाचा अभाव. सहसा हिवाळ्यात चार ते पाच पश्चिमी विक्षोभ उत्तराखंडमध्ये पाऊस आणि हिमवर्षाव आणतात. या हिवाळ्यात काही पश्चिमी विक्षोभ प्रणाली निर्माण झाली, पण ती कमकुवत झाली आणि दक्षिणेकडे सरकली. ते राज्य सोडून गेले. डोंगर रांगा बर्फवृष्टीच्या प्रतीक्षेतच राहिल्या. काश्मीरच्या आग्नेयेला एक पश्चिमी विक्षोभ तयार होत आहे. २१ जानेवारीपर्यंत उत्तराखंडला पोहोचणे अपेक्षित आहे. हा पश्चिमी विक्षोभ सक्रिय झाल्यास उत्तराखंडमध्ये बर्फवृष्टीची शक्यता आहे.

### मणिपूरमध्ये तीन वर्षांपूर्वी गँगरेप झालेल्या तरुणीचा मृत्यू

◆ **इम्फाळ, १८ जानेवारी**

मणिपूरमध्ये ३ मे २०२३ रोजी वांशिक हिंसाचारात सामूहिक बलात्काराला बळी पडलेल्या २० वर्षीय तरुणीचा मृत्यू झाला आहे. सामूहिक बलात्काराच्या वेळी ती फक्त १८ वर्षांची होती. ती तरुणी सुमारे तीन वर्षांपूर्वी अपहरण आणि सामूहिक बलात्काराच्या धक्क्यातून अद्याप सावरली नव्हती.

महिलेच्या आईने सांगितले की ती गंभीर जखमी झाली होती. गंभीर दुखापतींमुळे तिच्या मुलीला श्वास घेण्यास त्रास होऊ लागला होता. अखेरीस, १० जानेवारी रोजी तिने आयुष्याची लढाई गमावली. ती महिला कुकी समुदायाची होती. तिने मणिपूरच्या सिंगहाट येथे अखेरचा श्वास घेतला. (वृत्तसंस्था)

# इंडिगोच्या विमानात बॉम्बच्या धमकीने खळबळ

## बागडोगराला जाणारे विमान लखनौला वळवले



◆ **लखनौ, १८ जानेवारी**

आकाशात हजारो फूट उंचावर विमान उडत असताना अचानक बॉम्ब ठेवल्याची चिठ्ठी सापडल्याने प्रवाशांमध्ये एकच खळबळ उडाली. दिल्लीहून पश्चिम बंगालमधील बागडोगरा येथे जाणाऱ्या इंडिगोच्या विमानाची लखनौ विमानतळावर आपातकालीन स्थितीत उतरण्यात आले. यावेळी विमानात चालक दलाच्या सदस्यांसह २२२ प्रवासी होते.

कंपनीच्या प्रवक्त्याने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, इंडिगोचे विमान क्रमांक ६ई ६६५० रविवारी सकाळी दिल्लीहून बागडोगरसाठी झेपावले. विमान हवेत असतानाच विमानातील शौचालयात एका कर्मचाऱ्याला हाताने लिहिलेली एक चिठ्ठी आढळली. त्यात विमानात बॉम्ब ठेवण्यात आल्याचा उल्लेख होता. ही माहिती मिळताच वैमानिकाने तत्काळ एअर ट्रॅफिक कंट्रोलला याची कल्पना दिली. सुरक्षेच्या कारणास्तव विमानाचा मार्ग वळवण्यात आला आणि सकाळी ९:१७ वाजता लखनौच्या चौधरी चरण सिंह विमानतळावर विमान सुरक्षित उतरवण्यात आले. विमान खाली उतरताच सुरक्षा यंत्रणांनी आणि बॉम्ब शोधक पथकाने विमानाची तपासणी केली असता काहीही आक्षेपार्ह आढळून आले नाही. ज्या टिशू पेपरवर बॉम्बची धमकी लिहिली होती, तो पेपर कोणी ठेवला याचा तपास सीसीटीव्ही आणि इतर तांत्रिक बाबींच्या आधारे केला जात आहे. (वृत्तसंस्था)

### इंडोनेशियामध्ये ११ प्रवाशांना घेऊन जाणारे विमान बेपत्ता

◆ **जकार्ता, १८ जानेवारी**

इंडोनेशियातील जावा आणि सुलावेसी दरम्यानच्या डोंगराळ प्रदेशात शनिवारी ११ प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या इंडोनेशिया एअर ट्रान्सपोर्ट टर्बोप्रॉप एटीआर ४२-५०० विमानाचा नियंत्रण कक्षाशी संपर्क तुटला आणि बेपत्ता झाले. हे विमान योग्याकार्ताहून दक्षिण सुलावेसीकडे जात होते. बुलुसरुंग पर्वतावर गिर्यारोहकांनी ढिगारा आणि आग पाहिल्याची माहिती दिल्यानंतर हवाई दलाकडून विमानाचा शोध घेतला जात आहे.

दक्षिण सुलावेसीचे हसनुद्दीन लष्करी कमांडर मेजर जनरल बांगुन नावोको यांनी सांगितले, की सुलावेसी बेटांदरम्यानच्या डोंगराळ प्रदेशाजवळ ११ प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या एका प्रवासी विमानाचा नियंत्रण कक्षाशी संपर्क तुटला. त्यानंतर शोध आणि बचाव कार्य सुरू करण्यात आले. विमान योग्याकार्ताहून दक्षिण सुलावेसीची राजधानीकडे उड्डाण करत असताना रडारवरून गायब झाले. दक्षिण सुलावेसी प्रांतातील मारोसच्या लेआंग-लेआंग भागात स्थानिक. हवाई दलाच्या हेलिकॉप्टर आणि ड्रोनच्या मदतीने विमानाचा शोध घेतला जात आहे. अधिकाऱ्यांच्या मते, ज्यावेळी विमान बेपत्ता झाले, त्यावेळी परिसरात ढग होते, परंतु दृश्यमानता सुमारे ८ किलोमीटर होती. (वृत्तसंस्था)

# तुम्ही कितीही बदललात तरी आपली परंपरा विसरू नका!

## अजित डोवाल यांना आठवली पालकांची शिकवण

◆ **नवी दिल्ली, १८ जानेवारी**



तुम्ही तुमच्या जीवनात कितीही बदललात तरी आपल्या परंपरांना कधीही विसरू नका, हीच शिकवण माझ्या आई-वडिलांनी मला दिली, अशी आठवण राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (एनएसए) अजित डोवाल यांनी सांगितली.

डोवाल यांनी नवी दिल्ली येथे आयोजित रायबर-७ कार्यक्रमाला संबोधित करताना हे विधान केले. सीडीएस जनरल अनिल चौहान यांच्यासह उत्तराखंडमधील अनेक मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते. व्यासपीठावर बोलताना सीडीएस चौहान आणि डोवाल यांनी विकासासोबतच सांस्कृतिक ओळख जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

उत्तराखंडच्या या कार्यक्रमात डोवाल यांनी गढवाली भाषेत भाषण केले. ते म्हणाले की रायबर हा गढवाली शब्द आहे, ज्याचा अर्थ "संदेश" आहे. तो विश्वास आणि भावनिक संबंधांवर आधारित पारंपारिक संप्रेषण प्रणालीचे प्रतीक आहे. कार्यक्रमाला संबोधित करताना, एनएसए डोवाल यांनी या शब्दाचे खोल सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित केले आणि आधुनिक विकासाच्या शर्यतीत स्थानिक परंपरा नष्ट होण्याविरुद्ध इशारा दिला. ते म्हणाले, जर उत्तराखंड पंचतारांकित पर्यटन स्थळ बनले तर ते चांगले आहे, पण वाटेत कुठेतरी आपली संस्कृती हरवू शकते. माझ्या पालकांनी त्यांना नेहमीच परंपरा आणि रीतिरिवाज जपण्यास शिकवले. ते म्हणायचे की, आपण कितीही बदललो तरी आपण आपल्या परंपरा कधीही विसरू नयेत. रायबर हेच आहे. (वृत्तसंस्था)

### रायबर, एक मजबूत संप्रेषण प्रणाली

डोवाल म्हणाले, रायबर हा शब्द गढवाल्यांसाठी एक महत्त्वाची भावना आहे. ही एक संप्रेषण प्रणाली आहे जी कदाचित अपरिचित असेल, परंतु पूर्णपणे विश्वासार्ह आहे. आज अनेक संवाद प्रणाली आहेत, परंतु त्यामध्ये भावनांचा अभाव आहे. त्यांनी मंचावरून विनोदाने टिप्पणी केली की आज एअर इंडियाची उड्डाण रद्द झाली तरी रायबर कधीही रद्द करता येणार नाही.

## चित्रपट वार्ता

### ‘वाईल्ड लाईफ फोटोग्राफी’त रमल्या वहिदा रहमान

**मुंबई** : हिंदी चित्रपटसृष्टीत अगदी गुरुदत्तपासून आताच्या आमीर खानपर्यंत अनेकांसोबत काम करणाऱ्या अभिनेत्री वहिदा रहमान अनेकांच्या आवडत्या आहेत. आता वयाच्या ८७ व्या वर्षी त्या वाईल्ड लाईफ फोटोग्राफी म्हणून नाव कमावत आहे. त्यांना नेहमीच फिरण्याची आणि निसर्गाची आवड होती. पण त्यांनी आता कॅमेरा हातात घेऊन निसर्गातील वेधक क्षण टिपायला सुरुवात केली आहे. अभिनयाचे क्षेत्र गाजवून त्या आपला छंद जोपासत आहेत. आपल्या या आवडीसाठी वहिदा यांनी केवळ भारताच्या जंगलांचीच भ्रमंती केली नाही तर त्या आफ्रिकेसारख्या दुर्गम भागातही जाऊन आल्या. तिथेही त्यांनी आपली फोटो ग्राफीची जादू अनुभवली आहे. आयुष्यभर एखाद्या क्षेत्रात काम केल्यानंतर निवृत्तीच्या काळात काहीही न करण्यापेक्षा आपल्या छंदाला प्राधान्य देणे किती योग्य ठरू शकते, याचे उदाहरण त्यांनी आपल्या कृतीतून घालून दिले आहे.



### मृणालने लग्नाच्या बातम्यांचे केले खंडन



**मुंबई** : गेल्या काही दिवसांपासून साऊथ स्टार धनुष आणि अभिनेत्री मृणाल ठाकूर यांच्या लग्नाच्या बातम्या चर्चेत आहेत. धनुष आणि मृणाल १४ फेब्रुवारीला विवाहबंधनात अडकणार आहेत, असेही सांगितले जात होते. मात्र, आता धनुषच्या जवळच्या मित्राने आणि स्वतः मृणालने या बातम्यांचे खंडन केले आहे. त्याचबरोबर अभिनेत्रीच्या टीमनेही या बातम्यांना अफवा म्हटले आहे. याच दरम्यान आता मृणाल ठाकूरने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत स्वतःला ‘अडिग’ म्हटले आहे. धनुषच्या मित्राने सांगितले की, त्याचा जेव्हा घटस्फोट झाला तेव्हा तो आणि पूर्वपत्नी दोघांनीही मुलांच्या दृष्टीने यापुढील सर्व निर्णय घेण्याचे ठरवले. मुलांना कधीही सावत्र आई आणणार नाही, अशी त्याची भावना आहे. त्यामुळे तो लग्न करण्याच्या बातम्यांमध्ये कोणतेही तथ्य नाही.

### वर्षभरात ३७ चित्रपटांनी ओलांडला १०० कोटींचा टप्पा

**मुंबई** : २०२५ हे वर्ष भारतीय चित्रपटसृष्टीसाठी कोविडनंतरचे सर्वात यशस्वी वर्ष ठरले आहे. तिकीट खिडकीवरील कमाईत वार्षिक आधारावर १३ टक्क्यांनी वाढ झाली. या वाढीमध्ये तिकीट दरातील २० टक्के वाढीचाही मोठा वाटा आहे. हिंदीत या वर्षी कमी चित्रपट आले असले तरी धुरंधर सारख्या चित्रपटामुळे हिंदी सिनेमाने पॅन इंडिया स्तरावर मोठी झेप घेतली. आदित्य धर दिग्दर्शित या चित्रपटाने देशात ९५० कोटी आणि जगभरात १३०० कोटींहून अधिक व्यवसाय केला. यामुळे हा हिंदी चित्रपट इतिहासातील (या संदर्भात) सर्वात यशस्वी चित्रपट मानला जात आहे. याव्यतिरिक्त छावा, सैयारा आणि वॉर-२ सारख्या हिंदी चित्रपटांनीही टॉप-१० मध्ये स्थान मिळवले. देशभरात ३७ चित्रपटांनी १०० कोटींहून अधिक कमाई केली. २०२४ मध्ये ही संख्या केवळ २२ होती. मल्याळम चित्रपटांचा व्यवसाय २०२४ मधील ५७२ कोटींवरून वाढून १,१६५ कोटींवर पोहोचला. तमिळ सिनेमाच्या तिकीट विक्रीत १७ टक्के, तर तेलुगू सिनेमात १५ टक्क्यांनी घट झाली.

### शॉपिंग मॉलमध्ये आग; ३ लोकांचा मृत्यू

◆ **कराची, १८ जानेवारी**

पाकिस्तानमधील कराची येथे एका शॉपिंग मॉलमध्ये अचानक भीषण आग लागल्याने तीन लोकांचा मृत्यू झाला, तर ७ इतर लोक जखमी झाले. प्राथमिक तपासानुसार, आग लागण्याचे कारण शॉर्ट सर्किट असल्याचे सांगितले जात आहे.

सिंधचे प्रांताचे गृहमंत्री झियाउल हसन लंजार यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, एका दुकानातून लागलेली आग संपूर्ण मॉलमध्ये पसरली. घटनास्थळी ७ अग्निशमन दलाच्या गाड्या पोहोचल्या, ज्यांनी आगीवर नियंत्रण मिळवले. परिसरातील सिव्हिल हॉस्पिटललाही सतर्कतेचा इशारा देण्यात आला होता.बचाव पथकाने लोकांना सुरक्षित बाहेर काढले आणि मदतकार्यात सहकार्य केले. या घटनेत तीन लोकांचा होरपळून मृत्यू झाला, तर सात जण जखमी आहे. तपासात शॉर्ट सर्कीटने आग लागल्याचे समोर आले.एक दिवसापूर्वी कराची पोर्ट ट्रस्टमध्येही आग लागली होती. (वृत्तसंस्था)

# प्रजासत्ताक दिन परेडची संकल्पना ‘वंदे मातरम’ आणि ‘आत्मनिर्भर भारत’

**२,५०० कलाकारांचे सादरीकरण**

◆ **नवी दिल्ली, १८ जानेवारी**

भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन स्वातंत्र्य आणि समृद्धीच्या जयघोषांनी दुमदुमणार आहे. भव्य परेडची संकल्पना ‘वंदे मातरम, स्वातंत्र्याचा मंत्र’, आणि ‘वंदे मातरम, समृद्धीचा मंत्र’ आणि ‘आत्मनिर्भर भारत’ अशी ठेवण्यात आली आहे.

एकूण ३० झांकी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करतील, त्यापैकी १७ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे असतील, तर १३ विविध मंत्रालये आणि विभागांचे असतील. याव्यतिरिक्त, अंदाजे २,५०० कलाकार सांस्कृतिक सादरीकरणाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करतील.

यावर्षी, युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन प्रजासत्ताक दिनाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. त्यांच्या उपस्थितीमुळे भारत-युरोप संबंधांना नवी चालना मिळेल. गेल्या वर्षी परेडमध्ये सहभागी होऊ न शकलेली अनेक राज्ये यावेळी त्यांचा सांस्कृतिक वारसा दाखवतील. यामध्ये आसाम, छत्तीसगड, हिमाचलप्रदेश, जम्मू आणि काश्मीर, केरळ आणि महाराष्ट्र यांचा समावेश आहे. मणिपूर, नागालँड, ओडिशा, पुद्दुचेरी, राजस्थान आणि तामिळनाडू येथील झांकी देखील प्रमुख आकर्षण असतील.

आसामच्या झांकीमध्ये आशीर्कंडी गावातील पारंपारिक हस्तकला अधोरेखित केल्या जातील. गुजरात आणि छत्तीसगडमध्ये वंदे मातरम थीम एका अनोख्या पद्धतीने सादर केली जाईल. पश्चिम बंगाल स्वातंत्र्यलढ्यात बंगालची भूमिका दाखवेल. (वृत्तसंस्था)



प्रजाकसत्ताक दिनाची रंगीत तालीम करताना केंद्रीय राखीव पोलिस दलातील महिला पथक

### ‘वंदे मातरम्’ची १५० वर्षे

संचलनाची थीम वंदे मातरम्ची १५० वर्षे असणार आहे. यामध्ये तेजेंद्रकुमार मित्रा यांनी १९२३ मध्ये वंदे मातरम्चे चित्रण करणाऱ्या आणि वंदे मातरम् अल्बम (१९२३) मध्ये प्रकाशित झालेल्या चित्रांची मालिका कर्तव्य पथावर व्ह्यू-कटर म्हणून प्रदर्शित केली जाईल. परेडच्या शेवटी वंदे मातरम् बॅनर असलेले फुगे हवेत सोडण्यात येतील. संरक्षण सचिव राजेशकुमार सिंह यांनी यावर्षीच्या उत्सवासाठी नियोजित असलेल्या अनोख्या उपक्रमांची विस्तृत रूपरेषा पत्रकार परिषदेत स्पष्ट केली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# अस्वस्थ वर्तमानाचे आकलन

गेल्या चार वर्षांपासून जगावरची अस्थिरतेची सावली गडद बनत चालली आहे. यामध्ये सर्वच देश विनाकारण भरडले जात आहेत. स्वतःला महाशक्ती म्हणवून घेणारे अमेरिका, रशिया आणि चीन या देशांनी स्वीकारलेल्या स्वार्थी धोरणांमुळे सर्वत्र अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यात मुस्लिम कट्टरपंथीयांच्या धर्मांध राजकारणामुळे आणि अनेक भागांत मध्ययुगीन काळाप्रमाणे त्यांचे वर्तन असल्याने वातावरण आणखीनच चिघळले आहे. यामध्ये जीवित आणि संपत्तीचे नुकसान झाले ते सर्वसामान्यांचेच. इस्रायल-पॅलेस्टाईन, इस्रायल-इराण, इराण-लेबनॉन, रशिया-युक्रेन संघर्षात आतापर्यंत लाखो सामान्य नागरिक किडे- मुंग्यासारखे मेले. वित्तहानीची तर मोजदादच होऊ शकत नाही. आज अर्धे जग विनाशाच्या उंबरठ्यावर आहे, असे म्हणावे लागेल. जगात सुरू असलेली हिंसा, अनाचार आणि गरिबांचे होत असलेले दमन पाहता सध्याचे युग हे ज्ञानाचे आणि बुद्धिवंतांचे आहे, असे म्हणणे चुकीचे असल्याचे वाटू लागते. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासच्या दहशतवाद्यांनी इस्रायलमध्ये जाऊन जो नंगानाच केला, हिंसा केली, शेकडो निष्पाप नागरिकांचे प्राण घेतले, त्याची तुलना चंगेझखानच्या क्रूरतेशीस करावी लागेल. आपण काय करतो आहोत आणि कुणाला डिवचत आहोत, याचे भान नसलेल्या या हमासच्या हिंसाचाराचे अत्यंत वाईट परिणाम गाझातील जनता अजूनही भोगत आहे. हमासच्या पाठीशी कोण आहे, हे सर्वश्रुत आहे. आजही इस्रायलचे गाझावरील हल्ले थांबलेले नाहीत. कधीकाळी अत्यंत समृद्ध, झगमगाटाने भरलेल्या गाझाचे रूपांतर आता स्मशानात झाले आहे. गेल्या अडीच वर्षांपासून सुरू असलेल्या या संघर्षात आतापर्यंत ८१ हजारांहून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला. यात प्रामुख्याने लहान मुले आणि महिलांचा समावेश आहे. हजारोंना अन्नाअभावी प्राण गमवावे लागले. आजही लक्षावधी पॅलेस्टिनी नागरिक गढूळ पाणी पिऊन आणि फाटक्या-तुटक्या तंबूत नरकासमान जीवन कंठित आहेत. पळीभर भाजी, भाताची काही शितं आणि ब्रेडच्या तुकड्यांसाठी मदत घेऊन येणाऱ्या वाहनांच्या मागे धावणारी मुलं आणि बुरखाधारी महिला पाहून आपले मन हळहळते खरे; पण, ही परिस्थिती ज्या हमासमुळे आली, त्या दहशतवादी संघटनेला आजही पाकिस्तान, मलेशिया आणि अरबस्थानातील काही सुन्नी देश पाठीशी घालत आहेत. लाखो निष्पाप बालके आणि महिलांचा मृत्यू होत असताना कुठल्या धर्मासाठी हे सर्व काही केले जात आहे, असा प्रश्न त्यांना पडत नाही. जीवापेक्षा कुठला धर्म मोठा आहे? आज पॅलेस्टाईन-इस्रायल संघर्षाची धग कमी झाली असली तरी हल्ले सुरूच आहेत. मनात आणले असते तर अमेरिकेसह जगातील अन्य आर्थिक आणि लष्करीदृष्ट्या (वैचारिक किंवा मानवीयदृष्ट्या नव्हे) महाशक्ती असलेल्या अमेरिका-रशियासारख्या देशांना गाझातील हिंसाचार थांबविणे अशक्य नव्हते. पण, येथेही स्वहित आडवे आले. माणसं मरत राहिली अन् जग तमाशा पाहत बसले. मुस्लिम उम्माह केवळ कागदावरच्या गोष्टी आहेत, प्रत्यक्षात कुणीही गाझाच्या मदतीसाठी आले नाहीत आणि येणारही नाहीत.

२०२२ मध्ये आधीच रशिया-युक्रेन संघर्ष सुरू असतानाच गाझा युद्ध सुरू झाल्याने जग नाहक अशांततेत ढकलले गेले. गेली चार वर्षे हे युद्ध सुरू आहे. दोन्ही बाजूंची अपरिमित अशी हानी सुरू आहे. फेब्रुवारी २०२२ पासून सुरू झालेल्या या संघर्षात रशियाची मनुष्यहानी मोठ्या प्रमाणात झाली. रशियाचे आतापर्यंत सव्वा लाख सैनिक ठार मारल्याचा दावा युक्रेनने केला; तर आम्ही पावणेपाच लाख युक्रेनियन सैनिक ठार केल्याचा दावा रशियाने केला. युक्रेन सरकारने मात्र, आपले आतापर्यंत ३१ हजार सैनिक मृत्युमुखी पडल्याचे म्हटले आहे. इस्रायल-पॅलेस्टाईन संघर्षाची व्याप्ती केवळ अरब देशांपर्यंतच मर्यादित राहिली, पण रशिया-युक्रेन युद्धाची झळ साऱ्या जगाला पोहोचत आहे. अनेक देशांची अर्थव्यवस्था खिळखिळी झाली. आधीच उल्हास, त्यात फाल्गुन मास, या म्हणीप्रमाणे डोनाल्ड ट्रम्प यांच्यासारखा अत्यंत कडवा आणि लहरी अध्यक्ष अमेरिकेला मिळाल्याने जगावर संकट ओढवल्यासारखे झाले. मागचा पुढचा विचार न करता त्यांनी अनेक देशांवर प्रचंड व्यापार शुल्क आकारल्याने जगातील पुरवठा साखळीच विस्कळीत झाली आहे. बाजारपेठा अस्थिर झाल्या आहेत. याचा सर्वांत जास्त फटका प्रचंड लोकसंख्या असलेल्या भारतासारख्या विशाल देशाला बसला. युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की हे सुद्धा ट्रम्प यांच्याच जातकुळीतले आहेत, असे म्हणावे लागेल. कारण, अतिमहत्त्वाकांक्षा आणि कच्चे कान असलेल्या या नेत्याने नाटोहट्ट धरल्याने रशियाचे अरिष्ट युक्रेनवासीयांवर ओढून घेतले गेले.

आज जगात जेवढे मोठे संघर्ष निर्माण झाले आहेत-सुरू आहेत ते सारे भूमीसाठी आणि संसाधनांसाठी. रशियाकडे जगातील सर्वांत जास्त भूमी असूनही दुसऱ्या देशांची जमीन गिळंकृत करण्याची राक्षसी भूक पुतिन यांना लागलेली आहे. क्रिमिया यापूर्वीच गिळला. आता युक्रेनचा उत्तरी प्रांतही त्यांना हवा आहे. जे पुतिन करीत आहेत, तेच करण्याच्या दिशेने डोनाल्ड ट्रम्प यांनीही पावले टाकण्यास सुरुवात केली आहे. त्यांची गिधाडी नजर ग्रीनलॅण्डवर पडली आहे. त्यामुळे युरोपात आणखी एक संघर्ष पेटण्याची भीती निर्माण झाली आहे. आम्ही नाही तर रशिया, चीन ग्रीनलॅण्ड घेईल, असे तकलादू कारण देत ट्रम्प यांनी हालचाली सुरू केल्या. व्यापाराचे प्यादे पुढे करीत ट्रम्प जगाला वेठीस धरत आहेत. ज्या भारताचे गुणगाण करताना ट्रम्प थकत नाहीत, त्या देशावरच अधिकतम व्यापारशुल्क लादण्याचे काम ट्रम्प यांनी केले. गेल्या अनेक महिन्यांपासून भारत ५० टक्के टॅरिफचा सामना करतो आहे. नाही म्हटले तरी आपल्या अर्थव्यवस्थेवर याचा नकारात्मक परिणाम होतोच आहे. ग्रीनलॅण्ड हा डेन्मार्कचा भूभाग आहे. या भूभागावर हवाई संरक्षण प्रणाली तयार करण्यासाठी आम्हाला ग्रीनलॅण्ड हवा असल्याचे ट्रम्प यांचे म्हणणे आहे. आपल्या भूभागाचे संरक्षण करण्यासाठी डेन्मार्क आणि अन्य युरोपियन देशांनी काही लष्करी तुकड्या रवाना केल्याने ट्रम्प संतापले आणि त्यांनी डेन्मार्कसह सात देशांवर १० टक्के टॅरिफ लावण्याची घोषणा केली. युरोपियन देशांना अमेरिकेचा हस्तक्षेप नको आहे. कारण, तसेही ग्रीनलॅण्डच्या परिसरात रशिया आणि चीन यांच्या हालचाली सुरू आहेत. नकाशावर ग्रीनलॅण्डचे अस्तित्व पाहता या भूभागातूनच हवाई मार्गाने हल्ला होण्याची भीती अमेरिकेला वाटत आहे. रशिया, अमेरिकेच्या धोरणामुळे युरोपात अशांतता असतानाच आता अरबस्थानातही नवा संघर्ष पेटण्याची शक्यता आहे. इराणमध्ये प्रचंड हिंसाचार सुरू असून गृहयुद्धात आतापर्यंत १६ हजारांपेक्षा नागरिकांचा मृत्यू झाला तर साडेतीन लाख जखमी झाले आहेत. या संघर्षामागेही अमेरिका असल्याची पक्की धारणा इराणच्या सर्वोच्च मुस्लिम नेत्याची झाली आहे. वरकरणी ती चूक म्हणता येत नाही. अमेरिकेने इराणकडे विमानवाहू युद्धनौका रवाना केली आहे. मात्र, इराणनेही हार मानलेली नाही. या देशाचे सर्वोच्च नेते अयातुल्लाह खामेनी यांनी तर ट्रम्प यांना गुन्हेगार म्हणून घोषित केले. अमेरिकेच्या तुलनेत इराण चिमुकला देश. पण, हा देशही फणा काढून उभा आहे. सर्वांना भांडण करण्याची खुमखुमी आहे; मग तो कुणीही असो. वाईट वाटते ते ताकद असलेल्या देशांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या कृत्यांचे. वास्तविक पाहता महाशक्ती म्हणवून घेणाऱ्या देशांनी जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी पुढाकार घेणे अपेक्षित आहे. काही देशांनी आगळिक केली असेल तरी व्यापक मानवहितासाठी मनाचा मोठेपणा दाखविणे आवश्यक असते. समज देण्यासाठी इतर मार्ग असतात. दुर्दैवाने अमेरिका, चीन, रशियासारखे बलाढ्य देश स्वतःच इतर देशांचा भूभाग बळकाविण्याची इच्छा बाळगून आहेत आणि हेच तिघे जगाला शांत ठेवण्याची जबाबदारी असलेल्या संयुक्त राष्ट्रांचे म्होरके आहेत. अमेरिकेचा ग्रीनलॅण्डवर, रशियाचा युक्रेनवर तर चीनचा व्याप्त काश्मिरातील जमिनीवर डोळा आहे. एकूणच आज जगभरात अशांततेचे वातावरण निर्माण होण्यास हे महाशक्ती म्हणविणारे देश कारणीभूत ठरत आहेत. शांततेसाठी महाशक्तीने अधिक जबाबदारीने आणि इतरांनी संयमाने वागायचे असते. प्रामुख्याने धर्मांधता आणि विस्तारवाद ही इंधने संघर्ष पेटवत आहेत हे साऱ्यांना दिसते; पण कुणीच थांबत नाही; कुणीच थांबवतही नाही.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# ...नहीं तो पैसा वापिस!

''लेआयो! तुम्हे जो करना है! दायेंसे आना, बायेंसे आना, उपरसे आना, नीचे आना, एकठ्ठे आना या किसीके साथ आना! एक बार मजा ना करा दिया तो पैसा वापिस!'' हा एखाद्या हिंदी चित्रपटातील डॉयलाग वगैरे नाही तर पाकिस्तानचे वरिष्ठ लष्करी अधिकारी लेफ्ट. जनरल अहमद शरीफ चौधरी यांनी भारतासंदर्भात उच्चारलेले शब्द आहेत. पाकिस्तानी जनरल इधरसे 'आना'- उधरसे 'आना' असे म्हणत असले तरी पाकिस्तानची स्थिती जेब में नही 'चार आना' अशी आहे. लेफ्ट. जनरल चौधरी हे पाकिस्तानच्या आयएसपीआर म्हणजे इंटर सर्व्हिसेस पब्लिक रिलेशन्स, तिन्ही सेनादळांचे मुख्य माहिती अधिकारी आहेत. ऑपरेशन सिंदूर काळात तेच पाकिस्तानच्या वतीने दररोज पाकिस्तानी व जागतिक प्रसार माध्यमांशी संपर्क साधत होते.

**मग्रुरीचा अर्थ :** ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानचे मनोबल का उंचावले हे समजण्यास मार्ग नाही. फिल्ड मार्शल असिम मुनीर यांनी अमेरिकेतील एका कार्यक्रमात भारताच्या विरोधात उच्चारलेली भाषा आणि आता लेफ्ट. चौधरी यांची ही भाषा मिळतीजुळती आहे. भारत हा मर्सिडिस कार आहे तर पाकिस्तान हा गिट्टीने भरलेला ट्रक. गिट्टीने भरलेल्या ट्रकने मर्सिडिसला धडक दिली तर मर्सिडिसचे काय होईल याची जरा कल्पना करा अशा शब्दांत मुनीर बोलले होते.

**पैसा वापिस... :** चौधरी यांनी आपल्या खास शैलीत पैसा वापिस करण्याची भाषा उच्चारली असली तरी, 'वापिस' करण्यासाठी पाकिस्तानजवळ पैसा आहे कुठे? कधी जागतिक बँक तर कधी आंतरराष्ट्रीय नाणे निधी तर कधी चीन-सौदी अरेबिया यांच्याकडे भिकेची झोळी फिरवायची आणि त्यात जमा झालेल्या पैशातून आपला खर्च कसाबसा चालवायचा अशी स्थिती असणाऱ्या पाकिस्तानने पैसा वापिस करण्याची भाषा कशाच्या भरवशावर उच्चारावी हे अनाकलनीय आहे.

**विमानांना मागणी? :** पाकिस्तानने कराची एरो कॉम्प्लेक्समध्ये चीनच्या साहाय्याने जेएफ- १७ थंडर या लढाऊ विमानांचे उत्पादन सुरू केले आहे. या विमानांनी भारतासोबत झालेल्या संघर्षात फार मोठी कामगिरी बजावली असा पाकिस्तानचा दावा असून, त्यानंतर या विमानांना जोरदार मागणी येत असल्याचे पाकिस्तानचे सरंक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी सांगितले आहे. ज्या प्रमाणात आमच्याकडे या विमानांच्या खरेदीची मागणी होत आहे ती पाहता आम्हाला आता परदेशी कर्जाची गरज राहणार नाही असा दावाही आसिफ यांनी केला आहे. आसिफ यांच्या या दाव्यानंतर, बांगलादेश व सुदान या दोन देशांनी पाकिस्तानकडून जेएफ-१७ विमाने खरेदी करण्याची चर्चा सुरू केली आहे.




**तैमूरची चाचणी :** पाकिस्तानने ३ जानेवारी रोजी 'तैमूर' या आपल्या प्रक्षेपणास्त्राची चाचणी घेतली. ही चाचणी यशस्वी झाल्याचे पाकिस्तानने घोषित केले. पाकिस्तानी प्रचार माध्यमे तैमूरला पाकिस्तानी 'स्टॉर्म शॅडो' असे संबोधित आहेत. हे ब्रिटनच्या एका प्रक्षेपणास्त्राचे नाव आहे आणि युक्रेन युद्धात याचा वापर केला जात आहे. रशियाच्या प्रक्षेपणास्त्रांना प्रतिशह देण्यासाठी ब्रिटनने या प्रक्षेपणास्त्रांचा पुरवठा युक्रेनला केला आणि हे प्रक्षेपणास्त्र प्रभावी सिद्ध होत आहे. जमीन व समुद्रावरील आपले लक्ष्य अचूक भेदणारे प्रक्षेपणास्त्र असा याचा उल्लेख केला जात आहे. तैमूरचा पल्ला ६०० किलोमीटरचा असल्याचे सांगितले जाते. म्हणजे दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास भारताची राजधानी नवी दिल्ली व आर्थिक राजधानी मुंबई तैमूरच्या टप्प्यात असल्याचे पाकिस्तानने न बोलता सांगितले आहे. १३ फूट लांबी असणारे हे प्रक्षेपणास्त्र १८ ते २४ हजार फूट उंचीवर जात आपले लक्ष्य टिपू शकते. यात फ्रान्स बनावटीची अत्याधुनिक अशी आदेश प्रणाली वापरण्यात आली आहे. तैमूर हे परंपरागत शस्त्रांसाठी वापरले जाणार असून, अण्वस्त्र वाहून नेणारे तैमूर विकसित केले जाईल काय याचा खुलासा पाकिस्तानने केलेला नाही. पण, येणाऱ्या काळात तैमूरचा आण्विक अवतार तयार केला जाऊ शकतो असे मानले जाते.

**'ड्रोन'चा वापर :** एका ताज्या घटनाक्रमात ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानने प्रथमच भारतीय सीमेत काही 'ड्रोन' पाठविल्याची घटना घडली. सांबा, राजौरी, पूंछ या अतिदुर्गम भागात हे ड्रोन पाठविण्यात आले होते. भारतात घुसलेल्या व स्थानिक दहशतवाद्यांसाठी मादक पदार्थ व शस्त्रे पाठविण्यासाठी याचा वापर करण्यात आला असावा असा भारतीय सुरक्षा संस्थांचा कयास आहे.

**२०२६ ची तयारी? :** पाकिस्तान २०२६ मध्ये भारताशी युद्ध करण्याची तयारी करीत आहे काय या प्रश्नावर चौधरी यांचे उत्तर होते, भारत आमचे अस्तित्व मानण्यास तयार नाही. आमची निर्मिती अल्लाने केली आहे. मग, भारत आमचे अस्तित्व कसे नाकारू शकता ? जनरल चौधरी म्हणतात त्याप्रमाणे पाकिस्तानची निर्मिती खरोखरीच अल्लाने केली असेल तर मग अल्लाने पाकिस्तानच्या हाती कटोरा का दिला हा एक प्रश्नच आहे. की ही पण अल्लाचीच कृपा आहे? या व अशा अनेक प्रश्नांची उत्तरे जनरल चौधरी वा कोणत्याही पाकिस्तानी नेत्याजवळ नाहीत.

**कर्ज वाढले :** दरम्यान, पाकिस्तानवरील विदेशी कर्ज सतत वाढत असून एक कर्ज फेडण्यासाठी दुसरे कर्ज अशी पाकिस्तानची स्थिती तयार झाली आहे. पाकिस्तान कर्जबाजारी झाला आहे. पाकिस्तान आपला शस्त्रसाठा वाढवीत असला तरी त्याचा परकीय चलनाचा साठा कमी होत आहे. यासाठी त्याला आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडून वारंवार समज दिली जात आहे. पण, तरीही पाकिस्तानचा युद्धज्वर कमी झालेला नाही. उलट ऑपरेशन सिंदूरनंतर तो वाढला आहे. पाकिस्तानी लष्करी अधिकारी पैसा 'वापिस' करण्याच्या वल्गना करीत असले तरी त्यांच्याजवळ विदेशी कर्ज परत करण्यासाठीच पैसा नाही, ते कसा पैसा 'वापिस' करणार?

**अर्थसंकल्पाची तयारी :** आणखी १२ दिवसांनी १ फेब्रुवारी रोजी लोकसभेत २०२६-२७ चा अर्थसंकल्प सादर केला जाईल. यावेळी अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांच्यासमोरील एक मोठे आव्हान पेट्रोलियम पदार्थांच्या किमती स्थिर ठेवणे हे राहणार आहे. कारण, भारताला स्वस्त दरात मिळणारे रशियाचे कच्चे तेल आता कमी मिळणार आहे. भारताच्या एकूण आयातीपैकी ३१ टक्के आयात रशियातून होत होती. आता यात कपात झाली आहे. याचा परिणाम म्हणजे भारताला सौदी अरेबिया व इराण या आपल्या परंपरागत तेल पुरवठा करणाऱ्या देशांकडून तेल आयात करावी लागणार आहे.

इराणचे तेल काही प्रमाणात स्वस्त आहे. पण, तेथील स्थितीही तणावाची झाली आहे. त्यातही अमेरिकेने इराणवर लावलेले आर्थिक निर्बंध हा भारतासाठी एक अडचणीचा मुद्दा ठरू शकतो. या साऱ्याचा परिणाम आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमती वाढण्यात होईल असे मानले जाते. रशियातून आयात केल्या जाणाऱ्या तेलाच्या भरवशावर भारताला पेट्रोल-डिझेलच्या किमती स्थिर ठेवण्यात यश आले होते. पण, आता रशियन तेलाच्या आयातीत झालेली घट व दुसरीकडे आंतरराष्ट्रीय बाजारतील चढते भाव याचा परिणाम भारतीय बाजारावर होईल असे मानले जाते.

**मोठे आव्हान :** राष्ट्रपती ट्रम्प यांनी भारतावर आणखी मोठे आयात शुल्क लावण्याची घोषणा केली आहे. याचा विचार अर्थमंत्र्यांनी व सरकारने केलेला असेल. त्याला हाताळण्यासाठी सरकारकडून केल्या जाणाऱ्या उपाययोजनांचे प्रतिबिंब या अर्थसंकल्पात दिसावे अशी एक अपेक्षा व्यक्त केली जात आहे. प्रत्येक अर्थसंकल्प अर्थमंत्र्यांसाठी एक आव्हान राहात असला तरी अमेरिकेने लावलेल्या आयात शुल्कामुळे २०२६-२७ चा अर्थसंकल्प सरकार समोरील मोठे आव्हान ठरणार यात शंकाच नाही.

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# मोबाईल सोडा, आत्मघात टाळा!

तंत्रज्ञान हे माणसाला जोडण्यासाठी असते, तोडण्यासाठी नाही. मात्र प्रत्येकाच्या हाती आलेला मोबाईल हा घातकच ठरला आहे. त्यामुळे लोक एकमेकांपासून तुटले आहेत. यावर तत्काळ उपाय न केल्यास युवा पिढी उद्ध्वस्त होईल अन् आपला देश महासत्ता सोडा शेवटच्या रांगेतही राहणार नाही. एवढी दाहकता यातून निर्माण होईल. आजच्या पिढीला लाईक्स म्हणजे प्रेम वाटते, तर कमेंटस् आल्यास आभाळ ठेंगणे वाटते. अशा मृगजळरूपी काल्पनिक विश्वात ते वावरत आहेत. याच विश्वातील मित्र जेव्हा एकमेकांना भेटतात, त्यावेळी प्रत्येकाच्या हाती मोबाईल असतो. ते एकमेकांसोबत न बोलता मोबाईलवरील चॅटिंगला प्राधान्य देतात. मग दोघे जण भेटायला का आले, असाच प्रश्न सहजतेने उपस्थित होतो. प्रत्येकाच्या फेसबुकवर पाच हजार मित्र असतात. इन्स्टाग्रामवर हजारो फॉलोअर्स आणि व्हॉट्सॲपवर शेकडो ग्रुप्सवर बहुतांश युवक, युवती सक्रिय असतात. सर्वांनाच वाटते आपण खूप सामाजिक आहोत. पण ते शंभर टक्के मृगजळ आहे. रस्त्यावरचे मृगजळ माणसाची तहान भागवू शकत नाही, अगदी तद्वतच मोबाईलवरील हे हजारो मित्र कधीच मदतीला येत नाहीत. मग त्यांना मित्र का म्हणावे, असाही प्रश्न कुठल्याही सुज्ञ युवा पिढीच्या मनात आलेला नाही.

एका संशोधनानुसार, दिवसाला २ तासांपेक्षा जास्त मोबाईल हाती धरून सोशल मीडियाचा वापर करणाऱ्या तरुणांमध्ये एकटेपणाची भावना ८० टक्के असते. ते तरुण हळूच नैराश्याकडे वळतात. त्यांना चिंता आणि निद्रानाशाची समस्या भेडसावते. प्रत्यक्ष लोकांमध्ये मिसळण्याची भीती वाटते. जी मुले मनमोकळेपणाने मित्रांमध्ये मिसळतात ते सुखात असतात. त्यांना पाहून या



मुलांमध्ये असुरक्षितपणाची भावना वाढते. अभ्यासात मन लागत नाही. परिणामी ती हुशार असली तरी मोबाईलवरील वेडाने नापास होतात. मग त्यांना परीक्षेची भीती वाटते. आज मोबाईल माणसाच्या मानगुटीवर बसला असल्याची अनेक उदाहरणे जागोजागी सापडतात. शेकडो मुले-मुली तर रस्ता ओलांडताना मोबाईल कानाशी धरूनच समोर जातात. दुचाकी वाहन चालवितानाही त्यांचे सर्व लक्ष मोबाईलवर असते. एवढेच नव्हे तर नैसर्गिक विधी आणि भोजन करतानाही ते मोबाईलमध्ये गर्क असतात. माझ्या मते भारतीय मुलांना मोबाईलचे वेड लावणे हे आंतरराष्ट्रीय षडयंत्र आहे. कारण भारत हा युवकांच्या बळावरच महासत्ता होण्याच्या उंबरठ्यावर आहे. या स्थितीत ही युवा पिढीच बर्बाद झाली तर भारत महासत्ता होणार नाही अन् विकसित देशांपुढचा धोका टळेल. यातून देशाला अन् पर्यायाने स्वत:ला सावरायचे झाल्यास दररोज १२ तास मोबाईल दूर ठेवावा लागेल. मित्रांसोबत मनमोकळेपणाने गप्पा माराव्या लागतील. आई-वडिलांशी संवाद साधून त्यांच्या मनातील घालमेल समजून घ्यावी लागेल. त्यांना दैनंदिन कार्यात मदत करावी लागेल. शक्य तेवढे मैदानी खेळ खेळावे लागतील. इंग्रजांनी भारतावर १५० वर्षे राज्य केले. आता हा मोबाईलसुद्धा इंग्रजांप्रमाणे नव्हे त्यांच्यापेक्षाही घातक आहे. हा जर मानगुटीवर बसला तर कुणीही यातून भारतीयांना बाहेर काढू शकणार नाही. पुन्हा या देशात स्वातंत्र्य युद्ध छेडावे लागेल. ते आता तातडीने पूर्णत्वास जाईल अशी आजची स्थिती नाही. कारण तेव्हाचे लोक देशभक्तीने ओतप्रोत होते. आज तर मोबाईलच्या नादापायी स्वत:चा स्वार्थही लोकांना कळत नसल्याने ते देशाचा विचारच करू शकणार नाही. अशा मोबाईलच्या चक्रव्यूहात सापडलेल्यांचा अभिमन्यू होणारच, हे तेवढेच खरे आहे. अभिमन्यू जिंकला नव्हता तर त्याला आत्मघाती मरण पत्करावे लागले होते, हे सदैव स्मरणात ठेवा. तसाच आत्मघात मोबाईल न सोडल्यास देशातील युवकांचा होईल. म्हणूनच वेळीच सावध होऊन युवकांना या चक्रव्यूहातून बाहेर पडावेच लागेल. आपण केलेल्या पोस्टला लाईक्स न मिळाल्यास मुले दु:खी होतात. हा मानसिक आजारच आहे. माणूस जेव्हा शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम असतो, तेव्हाच त्याला निरोगी म्हटले जाते. मानसिक रोगाने पीडितांना आपण निरोगी का म्हणून म्हणावे? विशेष म्हणजे अशा लोकांचा देशालाही फायदा नसतो. ते तर खायला काळ अन् भुईला भारच असतात. याचा फटका देशाच्या विकासाला बसेल. भारत तरुणांचा असला तरी तो मानसिकदृष्ट्या कमकुवत लोकांचा गणला जाईल. अशी अवहेलना आपल्या भारताची होऊ नये असे वाटत असेल तर आजच मोबाईलचा नाद सोडा. शेवटी, 'मोबाईल नव्हते तेव्हा माणूस माणसांत होता. गप्पांची मैफल सोबत हास्यकल्लोळ होता.'

९८८१७१७८५९

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# भीती आणि भावनांचे राजकारण

ओवैसींच्या पक्षाला महाराष्ट्रात सर्वत्र चांगला प्रतिसाद मिळालेला आहे. पूर्वी एका मालेगावमध्येच मुस्लिम विचारांच्या पक्षाची अधिकृत जागा यायची. पूर्वी मुसलमानांचे एकगठ्ठा मतदान हे काँग्रेसकडे जायचे. परंतु आता ओवैसींचा एमआयएम हा पक्ष सर्वत्र आपली विजयी घोडदौड करताना दिसून येत आहे. जो पक्ष एका व्यक्तीभोवती फिरणारा आहे, ज्याने आपल्या जाहीरनाम्यात विकासाची कोणतीही आश्वासने दिलेली नव्हती. ज्याने रस्ते, पाणी, ऊर्जा, शिक्षण याबद्दल कोणतीही आश्वासने दिलेली नव्हती. तो पक्ष केवळ मुस्लिम मतांच्या भरवशावर सर्वत्र चांगली कामगिरी करीत आहे, असे दिसत आहे. पूर्वी कधीकाळी काँग्रेस पक्ष मुस्लिम समाजाला भाजपा-संघ यांची भीती दाखवत होता. यांच्याबद्दल ते मुस्लिम समाजाला सांगायचे की, हे लोक तुम्हाला पाकिस्तानमध्ये पाठवून देतील. त्यांच्यामध्ये भीती निर्माण केली जायची. त्या भीतीचे राजकारण केले जायचे. आज त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून ओवैसीने आपला पक्ष स्थापन केला आणि पाहता पाहता ते देशातल्या विविध राज्यांमध्ये आपली पकड बनवीत चालले आहेत. देशाचे विभाजन झाले त्या वेळेला मुस्लिम लीग हा एक मुसलमानांचा प्रमुख पक्ष होता. त्याने मुस्लिमांसाठी वेगळ्या राष्ट्राची मागणी केली. इंग्रजांच्या सहकार्याने ती मागणी पूर्ण सुद्धा झाली आणि पाकिस्तान नावाचे एक मुस्लिम राष्ट्र जगाच्या रंगमंचावर अवतीर्ण झाले. धर्माच्या आधारावर राजकारण करून पहिले सत्ता प्राप्त करायची आणि त्यानंतर वेगळा देश मागायचा, असा मुस्लिम लीगचा इतिहास राहिलेला आहे. ओवैसींचा पक्ष त्या मार्गावर जाईल, असे सांगता येत नाही. परंतु त्याने भीती आणि भावनांच्या आधारावर राजकारण करायचे आहे, हे मात्र ठरवलेले दिसते. नागपूरसारख्या ठिकाणी ओवैसींच्या पक्षाचे सहा नगरसेवक निवडून आलेले आहेत. मुस्लिमबहुल भागामध्ये त्यांनी मुस्लिम उमेदवार दिले. एका विशिष्ट जाती-धर्माला मानणाऱ्या वस्तीमध्ये त्यांनी त्या विशिष्ट जाती-धर्माला मानणाऱ्या लोकांना प्रतिनिधित्व दिले. त्याचा परिणाम असा झाला की, मुस्लिमबहुल वस्तीमध्ये मुसलमानांची एकगठ्ठा मते ओवैसींच्या पक्षाला मिळाली आणि त्याचबरोबर एका विशिष्ट जातीची मते सुद्धा त्यांना मिळाली. त्यामुळे नागपूरमध्ये एका प्रभागात भाजपाच्या उमेदवारांना असलेले तीन हजारांचे आधिक्य सुद्धा त्यांनी मोडून काढले आणि आपला विजय नोंदविला.ओवैसींचा पक्ष मुसलमान आणि एक विशिष्ट जात यांना घेऊन भविष्यातील राजकारण करू शकतो, असे संकेत त्यांनी सर्वत्र दिलेले आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळामध्ये जिथे या विशिष्ट जातीचे लोक अधिक आहेत, तिथे मुस्लिम समाज त्यांना मतदान करू शकतो आणि जिथे मुस्लिम समाज अधिक आहे, तिथे या विशिष्ट जातीचे लोक त्यांना मतदान करू शकतात, अशी परिस्थिती भावी काळामध्ये निर्माण होऊ शकते. नागपूरमध्ये मुस्लिम लीगचे सुद्धा चार उमेदवार निवडून आलेले आहेत. म्हणजे भीती आणि भावनांचे राजकारण करणाऱ्या पक्षाच्या विजयी उमेदवारांची संख्या नागपूर महानगरपालिकेत दहा झालेली आहे. यांचे पक्ष किती मुस्लिम लोकांना रोजगार मिळवून देतील? किती दवाखाने उभे करतील? हे लोक विकासाची किती कामे करतील? हे सांगता येत नाही. त्यांचा समाज सुद्धा त्यांना हे विचारणार नाही, कारण त्यांच्या समाजाने आणि एका विशिष्ट जातीने केलेले मतदान हे धर्माच्या आधारावर केलेले आहे.

एकेकाळी भाजपा राम मंदिराच्या आंदोलनाच्या वेळेला, ज्या वेळेला हिंदुत्वाच्या मुद्यावर लोकांना मतदानाचे आवाहन करीत होता, त्यावेळेस काँग्रेस, पुरोगामी आणि इतर सर्वच लोक धर्माच्या नावावर राजकारण करू नका, विकासाच्या मुद्यावर राजकारण करा, असा सल्ला त्यांना देत होते. धर्माच्या आधारावर राजकारण करू नका, असे सांगणारी काँग्रेस आणि इतर पक्ष हे दिल्लीच्या जामा मशीदमध्ये शाही इमाम यांच्यासमोर आपला माथा टेकवायला जात होते. त्यांच्या या मुस्लिम अनुनयाला भाजपाने हिंदुत्वाच्या मुद्याने उत्तर दिले होते. परंतु भीती आणि भावनांचे राजकारण हे फार काळ साथ देत नाही, अशा पद्धतीचा त्यांना साक्षात्कार झाल्याने ते विकासाच्या मागे लागले व आताच्या निवडणुका ते विकासाच्या मुद्यावर लढवत आहेत. परंतु विरोधी पक्ष मात्र अजूनही जाती-पातीच्या भावनांच्या आधारावर निवडणूक लढवीत आहेत, असे सर्वत्र दिसून येते. विविध जातींच्या आरक्षणासाठी उभी झालेली आंदोलने आणि त्यातून निर्माण झालेले नेते हे त्यांचे प्रतीक आहेत.

मुंबईमध्ये ठाकरे बंधूसुद्धा मराठीच्या नावावर एकत्र आले. जेव्हा त्यांना सत्ता मिळाली, त्यावेळेस ते विकास करून दाखवू शकले नाहीत. त्यामुळे त्यांच्याजवळ विकासाचा मुद्दा नव्हता. त्यामुळे आता हीच शेवटची वेळ आहे, अशा पद्धतीची भावनिक हाक मराठी मतदारांना मुंबईत देऊन त्यांनी आपले अस्तित्व वाचविण्याचा प्रयत्न केला. मराठी मतदारांनी ठाकरे बंधूंना बहुसंख्येने मतदान केले. परंतु याच्याच विरोधात मुंबईतील सर्व अमराठी लोकांनी भाजपाचा पर्याय स्वीकारला. परंतु मुंबईकर जनतेला त्यांच्या दैनंदिन हाल अपेष्टांपासून मुक्ती देत विकास घडवून आणण्याचे कसब केंद्र, राज्य आणि आता महानगरपालिकेत सत्ता असलेला भाजप करून दाखवू शकतो, हे मुंबईकर जनतेने लक्षात घेतले पाहिजे. थोडक्यात काय? भाजप जेव्हा भावनेचे राजकारण करीत होता, त्यावेळेस हे सर्व पक्ष भाजपला विकासाच्या गोष्टी सांगत होते. आज भाजप विकासाच्या गोष्टी करत आहे, तर उर्वरित सर्व पक्ष भीती आणि भावनेची तुतारी वाजवीत आहेत. लोकांची पण कमाल आहे की, लोक अशा पक्षांना मतदान करताना त्यांना आलू-कांद्याचे भाव कसे वाढले आहेत, तेल कसे महाग झाले आहे, पेट्रोल कसे महाग झाले आहे, या गोष्टी विचारत नाहीत. त्यावेळेस त्यांना आपली जात, आपला धर्म आठवतो. आणि केंद्र सरकारची निवडणूक आली की महागाई किती वाढली आहे, बेरोजगारी तुम्ही किती कमी केली, असे प्रश्न ते विचारतात. वास्तविक हे लक्षात घेतले पाहिजे की, जनता जर धार्मिक मुद्यांवर, जातीच्या मुद्यांवर मतदान करत असेल, तर सत्तापक्ष बेरोजगारी, विकास यांची चिंता सोडून तोही भीती आणि भावनेच्या भरवशावर निवडणुका जिंकण्याचा प्रयत्न करेल. त्यामुळे ठाकरे बंधूंना मतदान करणारे लोक असो किंवा ओवैसीच्या पक्षाला मतदान करणारे लोक असो, त्यांनी एक नागरिक म्हणून आपले कर्तव्य पार पाडणे आवश्यक आहे. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतर तरी लोकशाही प्रगल्भ झाली पाहिजे. त्यासाठी जनता सुज्ञ झाली पाहिजे. यासाठी समाजातील विचारवंत, सामाजिक संस्था या सर्वांनीच लोकजागृती, समाजजागृती करण्याची आवश्यकता आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### महाराष्ट्राचे देवाभाऊ, देवाभाऊंचा महाराष्ट्र

महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकांचे निकाल हाती आले असून भाजपच्या त्सुनामीत विरोधकांचा पालापाचोळा झाला आहे. आमचाच ब्रॅण्ड म्हणून गाजावाजा केलेल्यांचा जनतेने बॅण्ड वाजवला असून महाराष्ट्राचा एकमेव ब्रॅण्ड म्हणून देवेंद्रज फडणवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे. एकतर तू राहशील किंवा मी राहील याचा फैसला जनतेने केला असून भाजपच्या विकासाच्या धोरणाला जनतेचे भरभरून प्रेम मिळाले आहे. यावेळी निवडणुका जरी स्थानिक स्तरावर, प्रश्नांवर आधारित असल्या तरीही त्याला कुठे ना कुठे तरी राष्ट्रीय स्तरावरील घडामोडींची किनार होती. याचीच चुणूक मग निकालात दिसली आहे. ऑपरेशन सिंदूर हा देश, सैन्याच्या अस्मितेचा मुद्दा होता आणि याच अतिशय महत्त्वाच्या मुद्यांवर विरोधकांनी माती खाल्ली. भाजप आणि पंतप्रधानांचा विरोध करता करता विरोधकांनी चक्क देश सैन्याविरुद्ध गरळ ओकून जनतेची सहानुभूती गमावली होती. ज्यांना ज्येष्ठ श्रेष्ठ समजले जायचे अशा पृथ्वीबाबांनी सुद्धा ध्वनिप्रदूषण करून आगीत तेल ओतले होते.

त्यातच कधीकाळी ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणाऱ्या सेनेने आमचे हिंदुत्व शेंडी जानव्याचे नाही असे म्हणत उरलीसुरली कसर पूर्ण केली. केंद्रात नरेंद्र आणि राज्यात देवेंद्र हे जनतेच्या मनावर पक्के कोरले गेले असल्याने त्यांच्या विरोधात बेताल वक्तव्य करणे किती भारी पडू शकते हे या निमित्ताने दिसून आले आहे. खरेतर ही निवडणूक म्हणजे सबकुछ देवेंद्र फडणवीस यांचा वन मॅन शो होता आणि त्यांनी आपल्या दणदणीत कामगिरीने ते सिद्ध केले आहे.

या निवडणुकीत सर्वांचे डोळे लागले होते ते मुंबईकडे. हा बालेकिल्ला जोपर्यंत सर करत नाही तोपर्यंत महाराष्ट्र जिंकला असे समजले जायचे नाही आणि इथेच देवेंद्र फडणवीस यांचा खरा कस लागला. गेली २५ वर्षे सेनेच्या ताब्यात असलेले हे संस्थान खालसा करणे हे वाटते तितके सोपे काम नक्कीच नव्हते. मात्र ज्याप्रकारे राज्यसभा, विधान परिषद, विधानसभा निवडणुकांत देवेंद्र फडणवीस यांनी विजयश्री खेचून आणली होती त्याच हुशारीने मुंबईत विजय मिळवला आहे.

वास्तविकत: देवेंद्रजींच्या झंझावातापुढे विरोधक पुरते नामोहरम झाले होते परंतु आपली चूक मान्य करतील तर ते विरोधक कसले. सरकारी यंत्रणेचा गैरवापर, पैशाचा महापूर, ईव्हीएम घोटाळा, व्होटचोरी आणि यावेळी तर शाई पुसली, शाई मिटलीचे रडगाणे सुरू केले. मात्र जनतेने हा खोडसाळपणा पुरता ओळखला होता. दुष्ट राजकारण आणि बेताल वक्तव्य करणाऱ्या विरोधकांना जनतेने नाकारले. थोडक्यात काय तर महाराष्ट्राचे देवाभाऊ आणि देवाभाऊंचा महाराष्ट्र असे म्हटले तर ते वावगे ठरू नये.

**डॉ. अनिल पावशेकर**/९८२२९३९२८७

## वाचक पत्रे

### प्रदूषणकारी इंधनाला पर्याय शोधण्याची गरज

प्रदूषण ही सध्याची सर्वांत मोठी समस्या आहे. देशातील वाढती वाहने हे त्यामागील एक महत्त्वाचे कारण आहे. ४० टक्क्यांहून अधिक प्रदूषण पेट्रोल आणि डिझेल या इंधनावर चालणाऱ्या वाहनांमुळे होत आहे. सरकारनेही हे मान्य केले आहे की डिझेल, पेट्रोलवर चालणाऱ्या वाहनांमुळे प्रदूषणात भर पडत आहे तरीही सरकार प्रदूषणकारी इंधनाला पर्याय शोधत नाही. पेट्रोल आणि डिझेलसारख्या प्रदूषणकारी इंधनाला पर्याय शोधण्याची आता वेळ आली आहे. ग्रीन हायड्रोजनसारखे जैविक इंधन प्रदूषणकारी इंधनाला पर्याय ठरू शकतात असे जाणकारांचे मत आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचेही पेट्रोल, डिझेलविरहित गाड्या रस्त्यावर आणण्याचे स्वप्न आहे. त्यांनी तसे अनेकदा बोलूनही दाखवले आहे. त्यांनी जर मनात आणले आणि केंद्रीय नेतृत्वाने त्यांना तशी मुभा दिली तर ते नक्कीच देशातून पेट्रोल, डिझेल हद्दपार करतील आणि प्रदूषणाला पर्यायी इंधन देतील असा विश्वास वाटतो. पेट्रोल, डिझेलला पर्याय मिळाल्यास प्रदूषण कमी होण्यास मोठ्या प्रमाणात मदत होईल.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### राजकारण्यांची कारस्थाने व मतदारांचे विस्मरण

देवेंद्र फडणवीस व एकनाथ शिंदे यांना तुरुंगात टाकायचा कट आता उघड झाला असला तरी तो अगोदरही एक सरकारी वकील मोठ्या साहेबांच्या आदेशावरून करत होते, असे वृत्त पुराव्यानिशी मागेच महाविकास आघाडीच्या काळात बाहेर आले होते. एका गुंडाला पोलिसात घाईघाईने मध्यरात्री नेमून, त्याला अवास्तव अधिकार देऊन विरोधकांचा छळ करणारी प्रकरणे आता सामान्य जनतेच्या विस्मरणात गेली आहेत. दिशा मृत्यू प्रकरण व सुप्रसिद्ध नटाच्या आत्महत्येचे प्रकरणही असेच पुरावे नष्ट करून मिटविण्याचा प्रयत्न झाला असावा. एका राजकारणी विदुषीचे खरे नाव टीव्हीवर घेतले, या क्षुल्लक कारणावरून अर्णब गोस्वामी या पत्रकाराला तुरुंगात डांबून त्याचा छळ ज्या व्यवस्थेत करण्यात येतो, तिथे सामान्य माणसाचे अस्तित्व, राजकारण्यांचा पाठिंबा नसेल तर सहज संपवण्यात येऊ शकते. अशा परिस्थितीत आपली लोकशाही कशी तग धरेल, याविषयी शंका घ्यायला बराच वाव आहे.

**गणेश हजारे**/८६९८८१५५५९

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# बुद्धिबळमध्ये सिद्धेश्वर, शासकीय तंत्रनिकेतन विजेते

## तंत्रनिकेतन स्पर्धा : कॅरममध्ये पंढरपूर व एस.पी.एम. तंत्रनिकेतनची बाजी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या बुद्धिबळ स्पर्धेत मुलींच्या गटात सिद्धेश्वर वुमेन्स पॉलिटेक्निक व मुलांच्या येथील शासकीय तंत्रनिकेतनने विजेतेपद पटकाविले.

श्री सिद्धेश्वर वुमेन्स पॉलिटेक्निकमध्ये आयईडीएसएसए अंतर्गत झालेल्या विभागीय स्पर्धेत कॅरममध्ये मुलींच्या गटात पंढरपूरच्या न्यू सातारा पॉलिटेक्निक व मुलांच्या गटात एस. पी. एम पॉलिटेक्निकने विजेतेपदाचा मान मिळविला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन सिद्धेश्वर वुमन्सच्या गव्हर्निंग बॉडीचे सदस्य ॲड. आर. एस. पाटील यांच्या हस्ते झाले.



यावेळी सदस्य श्रेयस आळंद उपस्थित होते. श्री. प्रमोद शिवगुंडे यांनी जोपर्यंत स्पर्धा जिंकत नाही तोपर्यंत हार होत नाही असे सांगून स्पर्धकांचे मनोबल वाढवले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मयुरी अगरखेड यांनी केले. क्रीडा प्रमुख प्रा. स्वयंप्रकाश व्यास यांनी कार्यक्रमाच्या वेळापत्रकाचे नियोजन केले. विजयी स्पर्धकांना आकर्षक ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सर्व विजेत्यांचे संस्थेचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांनी अभिनंदन केले.

क्रीडा प्रमुख प्रा. स्वयंप्रकाश व्यास यांनी आभार मानले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी कॉलेजचे प्राचार्य गजानन धरणे प्रा. शीतल सावळगी, प्रा. संग्राम माने, प्रा. रविकिरण पतंगे, प्रा. वैदेही देशपांडे, ऐश्वर्या व्हनमाने तसेच विद्यार्थी प्रतिनिधींनी परिश्रम घेतले.

### अंतिम निकाल (प्रथम, द्वितीय)

**बुद्धिबळ : मुली :** श्री सिद्धेश्वर वुमेन्स पॉलिटेक्निक, शासकीय तंत्रनिकेतन सोलापूर. **मुले :** शासकीय तंत्रनिकेतन सोलापूर, फॅबटेक कॉलेज सांगोला.

**कॅरम : मुली :** न्यू सातारा पॉलिटेक्निक, पंढरपूर, एस. पी. एम पॉलिटेक्निक सोलापूर. **मुले :** एस. पी. एम पॉलिटेक्निक सोलापूर, स्वेरी पॉलिटेक्निक पंढरपूर.

## महत्वाचे...



**कोल्हापूर : प्रा. नामदेवराव गरड यांचा सत्कार करताना ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ जयसिंगराव पवार.**

## महाराष्ट्र इतिहास परिषदेच्या अध्यक्षपदी प्रा. गरड, सचिवपदी प्रा. डॉ. जावळे

**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे माजी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व अधिष्ठाता प्रा. नामदेवराव गरड यांची महाराष्ट्र इतिहास परिषदेच्या अध्यक्षपदी तीन वर्षासाठी निवड झाली आहे. प्रा. डॉ सोपान जावळे यांना दुसऱ्यांदा सचिवपदाची संधी मिळाली. कणकवली येथे झालेल्या इतिहास परिषदेच्या अधिवेशनानंतर ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ जयसिंगराव पवार यांनी त्यांचा कोल्हापूर येथील त्यांच्या निवासस्थानी सत्कार केला. यावेळी इतिहास संशोधक डॉ सतीश कदम व प्रा विकास कदम उपस्थित होते. प्रा. गरड यांनी कुर्डूवाडी येथील के एन भिसे महाविद्यालयात ३९ वर्ष इतिहास विषयाचे अध्यापन केले. त्यांनी आत्तापर्यंत देश विदेशातील ८५ परिषदांमधून आपल्या संशोधनाची चुणूक दाखविली ३१ देशांचा ऐतिहासिक अभ्यास दौरा केला प्रा. डॉ. जावळे हे छत्रपती शिवाजी महाराज नाईट कॉलेजमध्ये इतिहासाचे प्राध्यापक म्हणून त्यांनी ३५ वर्षे अध्यापनाचे कार्य केले. इतिहासाचे व्यासंगी अभ्यासक म्हणून त्यांची ख्याती आहे.



## भारतीय काँग्रेसच्या सोलापूर शहराध्यक्षपदी मुस्ताकअली लालकोट यांची निवड

**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

भारतीय काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष हाजी एन.डी. शेख यांच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेस पक्षाच्या सोलापूर शहर अध्यक्षपदी मुस्ताकअली लालकोट यांची निवड करण्यात आली. एम.डी. शेख यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी लालकोट यांनी पक्ष मजबुत करण्यासाठी व पक्षाचे वाढासाठी प्रयत्न करणार, असे मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. माढले, मलंग बाबुजी, गौस शेख, दाऊद शेख, आसिफ शेख उपस्थित होते.

## दीपक परचंडे यांना डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम जीवनगौरव पुरस्कार


**वेळापूर, दि. १८ जानेवारी-**



ए.डी. फाउंडेशन महाराष्ट्र यांच्याकडून दिला जाणारा भारतरत्न डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार शिक्षक दिपक परचंडे यांना जाहीर झाल्याचे संस्थापक अध्यक्ष अशोक गोरड यांनी कळविले. याचे वितरण पुणे येथे संपन्न होणार आहे. दिपक परचंडे हे २०१८पासून जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळा कदमवाडी नं.२ केंद्र तांदुळवाडी तालुका माळशिरस या ठिकाणी कार्यरत आहेत. त्यांचे माळशिरस तालुका गटशिक्षणाधिकारी महामुनी, विस्ताराधिकारी जमादार, मुख्याध्यापक प्रशांत जाधव यांनी अभिनंदन केले.


## चौथे पुण्यस्मरण

।। भावपूर्ण श्रध्दांजली ।।



**स्व. श्रीमती लिलावती वेंकटसा मेघराज**
स्वर्गवास - १९/०१/२०२२
शके १९४३, पौष कृ. २ आश्लेषा

**आपल्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली !**

* शोकाकुल *
**ॲड.अनिलकुमार मेघराज व अरुण मेघराज परिवार सोलापूर**
**भाग्यनगर (कर्नाटक)**
**खटवटे परिवार-गदग (कर्नाटक)**



## तहसील कार्यालय, कळंब

**बाशी रोड, कळंब, पीन कोड- ४१३५०७**

दुरध्वनी क्र. ०२४७३- २६२२५४ Email id-tahkalambgmail.com

**(संकलन विभाग - दंडणीय)**

जा.क्र.२०२५/मह/दंडणीय/कावी- दिनांक : २३/१२/२०२५

### जाहिर प्रगटन

समस्त गावकरी कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात मुख्याधिकारी, नगर परिषद, कळंब यांचेमार्फत **श्री. उमर रियाज शेख रा. कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव** यांनी **रुबीना रियाज अहमद शेख** यांचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रमाणपत्र धारकाचे गाव मी कळंब, ता. कळंब हे असून सदर व्यक्तीचा मौजे कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव या ठिकाणी **दि.०१/०६/१९९०** रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात मुख्याधिकारी, न.प. कळंब यांनी **दि.१२/१२/२०२५** रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे.

वरील जन्म बाबा कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा **(१५)** दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा, आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब. ता. कळंब**



## तहसील कार्यालय, कळंब

**बाशी रोड, कळंब, पीन कोड- ४१३५०७**

दुरध्वनी क्र. ०२४७३- २६२२५४ Email id-tahkalambgmail.com

**(संकलन विभाग - दंडणीय)**

जा.क्र.२०२५/मह/दंडणीय/कावी- दिनांक : २३/१२/२०२५

### जाहिर प्रगटन

समस्त गावकरी कळंब, ता. कळंबख जि. धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात मुख्याधिकारी, नगर परिषद, कळंब यांचेमार्फत **श्री. उमर रियाज शेख रा. कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव** यांनी **शेख तलत सुलताना शेख रियाज अहमद** यांचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रमाणपत्र धारकाचे गाव मौ. कळंब, ता. कळंबे हे असून सदर व्यक्तीचा मौजे कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव या ठिकाणी **दि.०१/०२/१९९३** रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात मुख्याधिकारी, न.प. कळंब यांनी **दि.१२/१२/२०२५** रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा **(१५)** दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा, आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब. ता. कळंब**



## तहसील कार्यालय, कळंब

**बाशी रोड, कळंब, पीन कोड- ४१३५०७**

दुरध्वनी क्र. ०२४७३- २६२२५४ Email id-tahkalambgmail.com

**(संकलन विभाग - दंडणीय)**

जा.क्र.२०२५/मह/दंडणीय/कावी- दिनांक : ०९/०१/२०२६

### जाहिर प्रगटन

समस्त गावकरी कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात मुख्याधिकारी, नगर परिषद, कळंब यांचेमार्फत **श्री. रजाअहेमद अब्दुलरहीम सय्यद रा. कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव** यानी त्यांचे स्वतःचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रमाणपत्र धारकाचे गाव मौ. कळंब, ता. कळंब हे असून सदर व्यक्तीचा मौजे कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव या ठिकाणी **दि.३१/१२/१९८४** रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात मुख्याधिकारी, न.प. कळंब यांनी **दि.२९/१२/२०२५** रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा **(१५)** दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा, आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब. ता. कळंब**



## तहसील कार्यालय, कळंब

**बाशी रोड, कळंब, पीन कोड- ४१३५०७**

दुरध्वनी क्र. ०२४७३- २६२२५४ Email id-tahkalambgmail.com

**(संकलन विभाग - दंडणीय)**

जा.क्र.२०२५/मह/दंडणीय/कावी- दिनांक : २३/१२/२०२६

### जाहिर प्रगटन

समस्त गावकरी शेळका धानोरा, ता. कळंब, जि. धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शेळका धानोरा यांचेमार्फत **श्री. भास्कर दादाराव शेळके रा. शेळका धानोरा, ता. कळंब, जि. धाराशिव** यांनी त्याचे पती **कै. दादाराव कोंडीबा शेळके** यांचे मृत्यु प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रमाणपत्र धारकाचे गाव मौ. शेळका धानोरा, ता. कळंब हे असून सदर व्यक्तीचा मौजे शेळका धानोरा, ता. कळंब, जि. धाराशिव या ठिकाणी **दि. १६/१२/१९९६** रोजी मृत्यु झाला असून मृत्यु प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शेळका धानोरा यांनी **दि. १५/१२/२०२५** रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे.

वरील मृत्यु बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा **(१५)** दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा, आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब. ता. कळंब**



## तहसील कार्यालय, कळंब

**बाशी रोड, कळंब, पीन कोड- ४१३५०७**

दुरध्वनी क्र. ०२४७३- २६२२५४ Email id-tahkalambgmail.com

**(संकलन विभाग - दंडणीय)**

जा.क्र.२०२५/मह/दंडणीय/कावी- दिनांक : ०९/०१/२०२६

### जाहिर प्रगटन

समस्त गावकरी कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात मुख्याधिकारी, नगर परिषद, कळंब यांचेमार्फत **श्रीमती फरीदा स. अब्दुल रहीम सय्यद रा. कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव** यांनी त्यांचे स्वतःचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रमाणपत्र धारकाचे गाव मौ. कळंब, ता. कळंब, हे असून सदर व्यक्तीचा मौजे कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव या ठिकाणी **दि.०७/०७/१९९०** रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात मुख्याधिकारी, न.प. कळंब यांनी **दि.२९/१२/२०२५** रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा **(१५)** दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा, आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब. ता. कळंब**



## तहसील कार्यालय, कळंब

**बाशी रोड, कळंब, पीन कोड- ४१३५०७**

दुरध्वनी क्र. ०२४७३- २६२२५४ Email id-tahkalambgmail.com

**(संकलन विभाग - दंडणीय)**

जा.क्र.२०२५/मह/दंडणीय/कावी- दिनांक : २८/०८/२०२५

### जाहिर प्रगटन

समस्त गावकरी कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात मुख्याधिकारी, नगर परिषद, कळंब यांचेमार्फत **श्री. अझरोद्दीन अमीर मोमीन रा. कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव** यांनी त्यांचे स्वतःचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रमाणपत्र धारकाचे गाव मौ. कळंब ता. कळंब हे असून सदर व्यक्तीचा मौजे कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव या ठिकाणी **दि.१५/०६/१९८६** रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात मुख्याधिकारी, न.प. कळंब यांनी **दि.२९/१२/२०२५** रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा **(१५)** दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा, आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब. ता. कळंब**



## तहसील कार्यालय, कळंब

**बाशी रोड, कळंब, पीन कोड- ४१३५०७**

दुरध्वनी क्र. ०२४७३- २६२२५४ Email id-tahkalambgmail.com

**(संकलन विभाग - दंडणीय)**

जा.क्र.२०२५/मह/दंडणीय/कावी- दिनांक : २८/०८/२०२५

### जाहिर प्रगटन

समस्त गावकरी कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात मुख्याधिकारी, नगर परिषद, कळंब यांचेमार्फत **श्री. सिकंदर अमीर मोमीन रा. कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव** यांनी त्यांचे स्वतःचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रमाणपत्र धारकाचे गाव मौ. कळंब, ता. कळंब हे असून सदर व्यक्तीचा मौजे कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव या ठिकाणी **दि.०२/०४/१९८१** रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात मुख्याधिकारी, न.प. कळंब यांनी **दि.२९/१२/२०२५** रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा **(१५)** दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास, सादर करावा, आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब. ता. कळंब**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन** :- डि ।। व सब डि ।। सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी महानगरपालिका हद्दवाढ मधील कसबे सोलापूर येथील पुणे गृहनिर्माण क्षेत्र विकास मंडळ पुणे यांचे मार्फत जुळे सोलापूर भाग-२ हैद्राबाद रोड येथील विडी घरकुल गाळा क्र. २९२१ यांसी सोडत नं. १३३६ अर्ज क्र. १८५९ असे असून यांसी एकूण क्षेत्र ५५० चौ. फुट इतकी असून यांसी चतुः सिमा पुर्वेस गाळा नं. २९२४, पश्चिमेस-रस्ता, दक्षिणेस- गाळा नं. २९२२, उत्तरेस- गाळा नं. २९२० येणेप्रमाणे गाळा मिळकत ही दि. ०९/०५/१९८८ रोजीच्या मंजुर आदेशानुसार **रामबाई मलय्या आटीपामुल** यांना मिळालेली असुन त्यानुसार त्यांच्या मालकी व कब्जेवहिवाटीची होती, सदरची मिळकत **रामबाई मलय्या आटीपामुल** यांनी विक्रीस काढण्याचे ठरवून त्यानुसार आमचे अशिलांकडून मोबदला स्विकारुन मिळकत विक्री केली होती. त्यानुसार दि. ११/०४/२००१ रोजी **रामबाई मलय्या आटीपामुल** यांनी आमचे अशिलाच्या हक्कात करारपत्र व खरेदीदस्त लिहून दिलेले आहे.

त्याअर्थी सदरहू करारपत्र व खरेदीदस्त नुसार आमचे अशिल हे पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ सोलापूर येथिल दप्तरी आमच्या अशिलाच्या नावाची नोंद होणेकरीता म्हणून रितसर अर्ज दाखल करणार आहेत. तरी सदर घरकुल मिळकतीबाबत कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, दान, लिज, टाच, गहाण, जप्ती, बोजा, इसारापावती साठेखत, खरेदीखत, कब्जापावती, पोटगी, करार, मदार, इत्यादी प्रकारचे हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाच्या आत कागदोपत्री पुराव्यानिशी लेखीस्वरुपात खालील पत्त्यावर तसेच पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ सोलापूर यांच्या कार्यालयाकडे हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही, कसलीही हरकत/तक्रार न आल्यास सदरहू घरकुल मिळकत हि निर्वेध, निजोखीम आहे असे समजून पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ सोलापूर हे त्यांचे दप्तरी आमचे अशिलाच्या नावाची नोंद करतील. तद्नंतर येणाऱ्या हरकती चालणार नाहीत. कोणाचीही कसलीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहिर नोटीस देत आहे, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली दि. १८/०१/२०२६.

**सही/-**
**श्री. अश्विन एस. कोंगारी**
**ॲडव्होकेट**
**बी.कॉम., एलएल.बी.**
**मो.नं. ९८९०५०३२८१**
**पत्ता- प्लॉट नं. २३, नवनाथ नगर,**
**आकाशवाणी केंद्र रोड, सोलापूर**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**



## जाहीरनामा

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. १५१/२०२५

१. लता विष्णु जाधव -- अर्जदार
रा. चिलवडी ता.जि. धाराशिव
(असल्यास, तर्फे वकील प्रशांत रोहिदास झोंबाडे)

विरुध्द

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथाग्रामसेवक -- गैरअर्जदार
ग्रा. प. निंबळक

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदाराची आई समींद्राबाई नानासाहेब जगताप, रा. चिलवडी ता. जि. धाराशिवयांचा दिनांक ०४ सप्टेंबर २०२२ रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची आई समींद्राबाई नानासाहेब जगताप यांचा मौजे निंबळक ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०४ सप्टेंबर २०२२ रोजी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का

**सही/-**
**(एच. आर. शेख)**
**तहसिलदार बार्शी**



## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर बार्शी, ता. बार्शी जि. सोलापूर येथील लोकांस कळविण्यात येते की,

डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी शहर बार्शी येथील म्यु. पल. हद्दीतील मिळकत गट नं. ९४३/४ यापैकी प्लॉट नं. १ यापैकी दक्षिण बाजुचा प्लॉट याचे क्षेत्रफळ १३९.५४ चौ.मी. आहे. याचे मोजमाप पुर्व बाजु मी. ५.९०, दक्षिण बाजू मी २२.८५, पश्चिम बाजु मी ६.१२ व उत्तर बाजु मी. २४.६५ यांसी चर्तुः सिमा पुर्वेस-प्लॉट नं. ४, दक्षिणेस-प्लॉट नं. २, पश्चिमेस १५ मी. रुंदीचा रस्ता व उत्तरेस सदर प्लॉट पैकी उर्वरित प्लॉट याचे वागणुक व पाणी पश्चिम बाजुचे रस्त्याने जाते व आहे येणेप्रमाणे बिनशेती प्लॉट मिळकत आतील तद्ंगभुत वस्तुसह

यात वर्णन केलेला प्लॉट मिळकत ही सौ. सुप्रिया शेखर गुंडपाटील यांचे मालकी वहिवाटीची असून सदर प्लॉट मालकांनी सदरची मिळकत आमचे अशिलास कायमखुष खरेदी देण्याचे ठरवून तशी बोलणी करुन तसा लेखी ठराव केलेला आहे. सदर प्लॉट निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असल्याची खात्री व भरवसा संबंधित मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

तरी सदर प्लॉटबाबत अन्य कोणाचे गहाण, दान, लिज, लिन, साठेखत, खरेदीखत, बक्षीसपत्र, फेडपत्र, मृत्यूपत्र, वाटप, वारसा, हिस्सा, बँक लोन, ॲटेचमेंट, जप्ती, कोर्ट मॅटर, भाडेपट्टा, लायसेन्सी, इजमेंट, पोटगी, चोळीबांगडी, करार, मदार, इ. स्वरुपाचा तसेच या अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क अधिकार हितसंबंध असल्यास संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ दिवसाचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत द्यावी. मुदतीत कोणाचीही कांहीही हरकत न आल्यास सदर प्लॉट हे निर्वेध, निजोखमी व बोजारहीत आहे असे प्रामाणिकपणे गृहित धरुन आमचे अशिल सदर प्लॉट मालकांशी उर्वरीत खरेदीखताचा व्यवहार करतील मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही.

कळावे ही जाहीर नोटीस दिली, तारीख : १८/०१/२०२६.

**सही/-**
**(अशिल)**

**सही/-**
**श्री. रोहन रणजीत स्वामी (ॲडव्होकेट)**
**जिल्हा व सत्र न्यायालय आवार,**
**बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**मो.नं.८२३७५०५००८**
**अशिला तर्फे ॲडव्होकेट**



## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर

मुख्य कार्यालय : ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२

फोन नं-०२१७-२६२२९४४/२६२२९३३

ज्या अर्थी खाली सही करणार श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली., सोलापूर प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ या कायद्यातील कलम १३ (१२) आणि नियम ८/१ व ३/९ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील कर्जदार व जामीनदार यांना कलम १३ (२) अन्वये दि. २१/०८/२०२५ रोजी मागणी नोटीस बजावली होती कि, त्यांनी सदरची नोटीसितील नमूद केलेली बँकेला येणे असलेली रक्कम नोटीसीच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत परत करण्याबाबत कळवूनही सदर रक्कम परतफेड करण्यास आपण असमर्थ ठरल्याने, विशेषतः कर्जदार व जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते कि, खाली सही करणार यांनी सदर कायद्याचे सेक्शन १३ (४) व नियम ८/१ व ३/९ अंतर्गत प्राप्त अधिकाराचा वापर करून खाली नमूद मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतला आहे.

### ताबा सुचना

**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ या कायद्यातील कलम १३ (४) व नियम ८/१**

**परिशिष्ठ IV प्रमाणे**

| अ. क्र. | कर्ज खाते क्र. / कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | थकीत कर्ज रक्कम दि. ३१/०७/२०२५ अखेर | मागणी नोटीस दिनांक / प्रतिकात्मम ताबा घेतलेली दिनांक | तारण मालमत्ता तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | **कर्ज खाते क्र. ००२००३२०७००००४०७**<br>**कर्जदार :**<br>**१) ऋषभ डेव्हलपर्स चे भागीदार -**<br>**अ) मांगीलाल घीसुलाल पुनमिया**<br>**ब) कीर्तीकुमार वस्तीमल जैन**<br>**रा:** ४२७६, सोमवार पेठ, बार्शी, जि. सोलापूर ४१३४०१<br>**जामीनदार :**<br>**२) पोपटलाल घीसुलाल पुनमिया**<br>**रा:** ४२८१, सोमवार पेठ, बार्शी, जि. सोलापूर **४१३४०१**<br>**३) कल्पेश अमृतलाल तेलीसरा**<br>**रा:** ४२८१, सोमवार पेठ, बार्शी, जि. सोलापूर ४१३४०१ | एकूण रक्कम **रु. १,५७,८९,५९७/-** (एक कोटी सत्ताव्वन लाख एकोणनव्वद हजार पाचशे सत्याण्णव फक्त) अधिक दि. ०१/०८/२०२५ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + नोटीस व कोर्ट खर्च + इतर खर्च | **२१/०८/२०२५**<br>**१७/०१/२०२६** | डी. व सब डी. सोलापूर पैकी ता. बार्शी पैकी तालुका पंचायत समिती बार्शी येथील बार्शी शहर म्युनिसपल हद्दीतील जमीन गट नं. २५६/२ याचा जुना गट नं २५९/२ (जुना सर्वे नं. ६१/१अ) याचे क्षेत्र ०० हेक्टर ८३ आर यासी आकार २ रुपये ४७ पैसे यापैकी प्लॉट नं.- १.२.३.४.५,६,७.९,१८,१९,२०, २१,२२,२३,२४,२५,२६,२९, ३४,३५,३६,३७,३८,३९,४०, ४१,४२,४३,४४,४५,४६,४७, ४८,४९,५०,५१,५२,५३,५४, ५५,५६,५७,५८,५९,६०,६१, ६२,६३,६४,६५,६६,६७,६८, ६९,७०,७१,७२,७३,७४,७५, ७६,७७,७८,७९,८०,८१,८२, ८३,८४,८५, सदर गट नं. २५६/२ यांसी येणेप्रमाणे चतुः सिमा असे-<br>**पूर्वेस** - माने यांची जमीन<br>**पश्चिमेस** - स्वामी नारायण मंदिर व सोजर पाटील यांची जमीन<br>**उत्तरेस** - स्मशानभूमी<br>**दक्षिणेस** - सोजर पाटील यांची जमीन |

विशेषतः कर्जदार, जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना सुचित करण्यात येते कि, त्यांनी सदर स्थावर मालमत्ता संदर्भात कोणताही व्यवहार करू नये असा व्यवहार केल्यास श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर यांना येणे असलेली रक्कम कर्जदार यांचे कर्ज व मालमत्ता तारण कर्ज खाते यांचे अधीन राहील. कृपया लक्षात घ्या कि श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर यांना उपलब्ध असलेल्या अश्या अधिकार आणि उपायांवर पृवग्रह न ठेवता हे प्रकाशन केले गेले आहे. श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर कायद्याच्या अधीन असलेल्या आधार आर्थिक आणि कर्जदाराच्या विरुद्ध आपणास पुढील अधिनियमाच्या कलम १३ (१३) नुसार नोंद घेण्याची विनंती केली आहे. आमच्या बँकेच्या पूर्व लेखी संमतीशिवाय वरील तारण मिळकत विल्हेवाट लावण्यापासून किंवा व्यवहार करण्यास किंव्हा विक्रीच्या मार्गाने, भाडेपट्याने किंवा अन्यथा सुरक्षित मालमत्ताद्वारे हस्तांतरित करण्यास आपल्याला प्रतिबंधित आहे.

**दिनांक : १७/०१/२०२६**
**स्थळ : सोलापूर**

सील

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/




## महत्त्वाचे

### बीडब्ल्यूएफ २५ सेकंदांचा टाईम क्लॉक ट्रायल सुरु ठेवणार

**नवी दिल्ली :** बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशन (बीडब्ल्यूएफ) पुढील आठवड्यात इंडोनेशिया मास्टर्समध्ये २५ सेकंदांचा टाईम क्लॉक ट्रायल करणार आहे. निवडक वर्ल्ड टूर स्पर्धांमध्ये सुरू राहणाऱ्या या उपक्रमाचा उद्देश धोरणात्मक विलंब रोखणे आणि सामन्यांच्या लयीचे प्रमाणीकरण करणे आहे. तथापि, या हालचालीवर खेळाडू आणि प्रशिक्षकांकडून संमिश्र प्रतिक्रिया आल्या आहेत. या प्रणाली अंतर्गत, पंच स्कोअर अपडेट करताच टाइम क्लॉक सुरू होतो. सर्व्हिंग प्लेअर आणि रिसीव्हर दोघांनाही २५ सेकंदांच्या आत सर्व्हिंग आणि रिसीव्ह करण्यासाठी तयार असणे आवश्यक आहे. चीनचा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा खेळाडू वांग जी यी याने या निर्णयाचे स्वागत करत म्हटले आहे की जर हा नियम समान रीतीने लागू केला गेला तर खेळाडू त्याच्याशी जुळवून घेतील. तथापि, डेन्मार्कच्या मॅथियास क्रिश्चियनसेनने शंका व्यक्त केली आणि प्रश्न उपस्थित केला की घड्याळ समस्येचे मूळ सोडवेल का? इंडिया ओपनच्या अंतिम फेरीत पोहोचल्यानंतर तो म्हणाला, मला हे सांगायचे आहे की, मी याबद्दल थोडासा साशंक आहे. जर पंचांनी सामना व्यवस्थित सांभाळला आणि तो सुरळीत ठेवला तर मला वाटत नाही की यात काही समस्या आहे.





### सापटणेच्या गौरी व साईप्रसाद ढवळे यांना राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत सुवर्ण, रौप्य

**टेंभुर्णी, दि. १८ जानेवारी-**

भोपाळ येथे झालेल्या ६९व्या शालेय राष्ट्रीय शालेय रायफल शूटिंग स्पर्धेत गौरी व साईप्रसाद ढवळे या दोघे बहिण-भावंडांनी अनुक्रमे सुवर्ण व रौप्य पटकाविले. महाराष्ट्र संघाकडून खेळताना गौरीने १९ वर्षाखालील गटात तर साईप्रसादने १४ वर्षाखालील मुलांच्या गटात ही कामगिरी केली. सापटणे (टेंभुर्णी) येथील उप कृषी अधिकारी आनंदराव ढवळे यांची ती मुले आहेत. ते दोघेही बबनरावजी शिंदे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय अकोले खुर्द तालुका माढा येथे इयत्ता बारावी व इयत्ता सातवीच्या वर्गात शिकत आहेत. गौरीने सलग तिसऱ्यांदा तर साईप्रसाद पहिल्याच राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होता. गौरी व साईप्रसाद यांना या हरिभाऊ होले व राजेंद्र अनवते यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष आमदार संजयमामा शिंदे, रणजीतभैय्या शिंदे, मुख्याध्यापक राजेंद्र ठोंबरे, क्रीडाशिक्षक श्री माने व श्री श्रीराम यांनी अभिनंदन केले.

### बार्शीत उद्यापासून राज्य महिला खो-खो स्पर्धा सुरु

**बार्शी, दि १८ जानेवारी-**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी, महाराष्ट्र खो-खो असोसिएशन व सोलापूर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त विभागीय निमंत्रित महिला गट खो-खो स्पर्धा आयोजन कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी येथे दि. २० ते २२ जानेवारी या कालावधीत विभागीय निमंत्रित महिला गट खो-खो स्पर्धा आयोजित करण्यात आल्याची माहिती कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. पी. शिखरे यांनी दिली. या स्पर्धा आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांनी मान्यता दिली आहे. या स्पर्धेत धाराशिव, सांगली, पुणे, ठाणे, सोलापूर व रत्नागिरी या जिल्ह्यातील एकूण आठ संघ सहभागी होणार आहेत. या स्पर्धे साठी प्रथम क्रमांकास रुपये २१,००० द्वितीय क्रमांकास रुपये १५,००० व तृतीय क्रमांकास रुपये ११,००० रोख, प्रमाणपत्र व ट्रॉफी दिली जाणार आहे. या स्पर्धेचा आनंद घेण्यासाठी जास्तीत जास्त क्रीडाप्रेमी व खेळाडूंनी उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांच्यावतीने करण्यात येत आहे.

# न्यूझीलंडचा २-१ ने मालिका विजय

## कोहलीचे 'विराट' शतक व्यर्थ ● डॅरिल मिचेल आणि ग्लेन फिलिप्सची शतके

◆ **इंदूर, १८ जानेवारी**

येथे खेळल्या गेलेल्या चुरशीच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात न्यूझीलंडने भारताचा ४१ धावांनी पराभव केला. या सामन्यात न्यूझीलंडकडून डॅरिल मिचेलने १३७ आणि ग्लेन फिलिप्सने १०६ धावा केल्या आणि भारतासमोर ३३८ धावांचे लक्ष्य ठेवले. प्रत्युत्तरात भारत ४६ षटकांत सर्व बाद २९६ धावांपर्यंत मजल मारू शकला. भारताकडून विराट कोहलीने १२४, नितीशकुमार रेड्डीने ५३ आणि हर्षित राणाने ५२ धावा करून विजय मिळविण्याचा प्रयत्न केला. पण तळातले फलंदाज लवकर बाद झाल्याने विराट कोहलीचे प्रयत्न निष्फळ ठरले. कोहलीचे हे एकदिवसीय सामन्यातील विक्रमी ५४ वे शतक होते. न्यूझीलंडने प्रथमच भारतात एकदिवसीय मालिका जिंकली. सामनावीर आणि मालिकावीर डॅरिल मिचेल ठरला.

लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय कर्णधार शुभमन गिल आणि रोहित शर्मा खेळण्यास आले. पण दोघेही लवकर बाद झाले. त्यानंतर श्रेयस अय्यर आणि विराट





विराट कोहली १२४ धावा आणि डॅरिल मिचेल १३७ धावा

कोहलीने डाव सांभाळण्याचा प्रयत्न केला. पण संघाच्या ६८ धावा असताना श्रेयस (३) बाद झाला. त्यानंतर केएल राहुल एक धाव काढून बाद झाला. तेव्हा भारताची स्थिती ४ बाद ७१ अशी होती. तेथून नितीशकुमार रेड्डी आणि कोहली यांनी डाव सांभाळला. दोघांनी मोठी भागीदारी करून संघाला १५० च्या वर नेऊन ठेवले. १५९ धावा असताना रेड्डी बाद झाला. त्यानंतर जडेजाही बाद झाला. एकेक खेळाडू बाद होत असताना कोहली एका बाजूने विजयाची पराकाष्ठा करीत होता. हर्षित राणा आणि कोहलीने मोठी भागीदारी करण्याचा प्रयत्न केला. पण हर्षित संघाच्या २७७ धावा असताना बाद झाला. त्याने ५२ धावा केल्या. त्यानंतर तळातले फलंदाज पटापट बाद झाले. भारत सर्व बाद २९६ धावा करू शकला.

तत्पूर्वी, भारताच्या वेगवान गोलंदाजांच्या सुरुवातीच्या अडचणी असूनही, डॅरिल मिचेलचे सलग दुसरे शतक (१३७) आणि ग्लेन फिलिप्स (१०६) यांच्या धमाकेदार शतकामुळे न्यूझीलंडने रविवारी येथे तिसऱ्या आणि शेवटच्या एकदिवसीय सामन्यात आठ बाद ३३७ धावा केल्या. मिचेल आणि फिलिप्स यांनी १८८ चेंडूत चौथ्या गड्यासाठी २१९ धावांची भागीदारी करून डाव पूर्णपणे बदलला.

मिचेल (१३१ चेंडू, १५ चौकार, तीन षटकार) ने संयम आणि नियंत्रणाने डाव हाताळला, तर फिलिप्स (८८ चेंडू, नऊ चौकार, तीन षटकार) यांनी आक्रमकपणे धावगती वाढवली आणि सावध सुरुवातीनंतर न्यूझीलंडचा डाव सावरला. एका वेळी भारत पूर्णपणे वर्चस्व गाजवत होता. न्यूझीलंडचे ५८ धावांत तीन बळी अशी स्थिती होती. तथापि, मिचेल आणि फिलिप्सने सावधपणे खेळून डाव स्थिरावला.

फलंदाजीसाठी आमंत्रित केल्यानंतर, न्यूझीलंडने पहिल्या दोन षटकांत पाच धावांत त्यांचे पहिले दोन फलंदाज गमावले, ज्यामुळे हेन्री निकोल्स आपले खाते उघडू शकले नाहीत. प्रसिद्ध कृष्णाची जागा घेणाऱ्या डावखुरा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगने त्याच्या पहिल्याच षटकात निकोल्स (०) ला बाद केले.

त्यानंतर हर्षितने डेव्हॉन कॉन्वे (०५) ला सलग तिसऱ्यांदा बाद केले. परिणामी, न्यूझीलंड १० षटकांत फक्त ४७ धावा करू शकला. १३ व्या षटकात हर्षितच्या चेंडूवर विल यंग (३०) ने षटकार मारून दबाव कमी करण्याचा प्रयत्न केला, परंतु तो बाद झाला. मिचेलने डावखुरा फिरकीपटू कुलदीप यादवच्या चेंडूवर शानदार षटकार मारून न्यूझीलंडच्या पुनरागमनाचा पाया रचला. मिचेलने आक्रमक खेळ सुरू ठेवला, नितीशकुमार रेड्डीच्या चेंडूवर षटकार मारला, तर फिलिप्सनेही आक्रमक खेळण्याचा प्रयत्न केला. फिलिप्सने मोहम्मद सिराजच्या (१/४३) गोलंदाजीच्या पुल शॉटवर चौकार आणि अर्शदीपच्या चेंडूवर सरळ षटकार मारला. मिचेलने जडेजाच्या गोलंदाजीवर एक धाव घेऊन आपले शतक पूर्ण केले, हे मालिकेतील त्याचे सलग दुसरे शतक होते.

◂(वृत्तसंस्था)

### उत्तरप्रदेशविरुद्ध सोलापूरच्या गंगा कदमची नाबाद शतकी खेळी

**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

भुवनेश्वर, ओडीसा येथे सुरू असलेल्या अंध महिलांच्या राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत पहिल्याच सामन्यात महाराष्ट्र संघाने उत्तर प्रदेश संघाचा १६७ धावांनी पराभव केला. यात सोलापूरच्या गंगा कदम हिने ३५ चौकारांच्या साहाय्याने नाबाद १८३ धावांची शानदार खेळी केली. तसेच गंगाने गोलंदाजीत ४ षटकात केवळ ६ धावा देत २ गडी तर क्षेत्ररक्षण करताना ३ गडी धावबाद करत अष्टपैलु कामगिरी केली. गंगाचे राष्ट्रीय स्तरावरील हे दुसरे शतक आहे. राष्ट्रीय स्तरावर एका साम न्यात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम गंगाच्याच नावे नोंदला गेला आहे.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना महाराष्ट्र संघाने निर्धारीत २० षटकात



२ गड्यांच्या मोबदल्यात २६७ धावांचा डोंगर रचला प्रतीउत्तरात उत्तरप्रदेश संघ निर्धारीत २० षटकात ८ बद १०० धवा करु शकला. गंगाचे उद्योजक राजेश दमाणी, भैरुरतन दमाणी अंध शाळेचे सचिव संतोष भंडारी, स्थानिक प्रशिक्षक राजू शेळके, क्रिकेट असोसिएशन ब्लाइंन्ड ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष पंकज चौधरी, महासचिव डॉ. माधव गोरे यांनी अभिनंदन केले.

# महाराष्ट्राचे कबड्डी संघ सुवर्णपदक पटकावतील

### जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांचा विश्वास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

महाराष्ट्राचे शालेय १४ वर्षाखालील मुलींचे कबड्डी संघ सुवर्णपदक पटकावतील, असा विश्वास जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांनी व्यक्त केला.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य अंतर्गत व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूर पार्क स्टेडियमवर झालेल्या शालेय १४ वर्षाखालील मुलींच्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धापूर्व शिबीराचा सांगता समारोप समारंभ त्यांनी हा विश्वास व्यक्त केला. राष्ट्रीय स्पर्धा या गुडीवाडा, आंध्रप्रदेश या ठिकाणी दि. १८ ते २३ जानेवारी दरम्यान संपन्न होणार आहेत. त्यात भाग घेण्यासाठी हा संघ रवाना झाला. या संघांचे स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबीर १३ ते १७ जानेवारी दरम्यान झाले.

या शिबीराच्या सांगता समारोपप्रसंगी प्रमुख जिल्हा नियोजन अधिकारी श्री. पवार यांनी शुभेच्छा दिल्या.



**संघात सोलापूरची संस्कृती माने, संघव्यवस्थापकपदी संतोष जाधव**

महाराष्ट्राचे संघः ईशिका अण्णासाहेब बवले, ज्ञानेश्वरी विक्रम बवले, आराध्या योगेश दौंडकर, समृद्धी संतोष झगडे (पुणे ), भैरवी रत्नदीप इंगवले (सातारा), शर्वरी सचिन पाटील ( वाशिम), अमृता विजय पाटील (ठाणे), सीमा लतिफ शेख (लातूर ) , राधिका कमलेश्वर अकिंगे (नाशिक), संस्कृती दिपक माने (सोलापूर), कृष्णा हरीओम वर्मा (नाशिक), पायल अनिल आढे (परभणी). संघव्यवस्थापक : संतोष जाधव.

या वेळी सहाय्यक नियोजन अधिकारी श्रीकांत कुंडला, जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे, जिल्हा क्रिकेट संघटनेचे सचिव चंद्रकांत रेंम्बुर्सू, मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी दत्तात्रय वरकड, निवृत्त तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव, तालुका क्रीडा अधिकारी सचिन रणदिवे, महाराष्ट्र संघाचे संघव्यवस्थापक संतोष जाधव, प्रशिक्षक सायली जाधव आदी उपस्थित होते.



### बार्शीच्या सान्वी गोरेला शालेय राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत सुवर्ण पदक

#### महाराष्ट्र संघास रौप्य पदक

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. १८ जानेवारी-**

रांची (झारखंड) येथे झालेल्या ६९व्या शालेय राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत महाराष्ट्र विद्यालय बार्शीच्या सान्वी गोरे हिने सुवर्णपदक पटकाविले. तसेच संघासही रौप्यपदक मिळवून दिले. महाराष्ट्र विद्यालयामध्ये इयत्ता ७वी मध्ये शिकणारी सान्वीने १४ वर्षाखालील गटात महाराष्ट्रकडून प्रतिनिधित्व करताना सान्वीने ही कामगिरी केली. तिला संघ व्यवस्थापक अतुल नलगे, क्रीडा शिक्षक पुष्कराज पाटील, योगेश उपळकर व विकास पाटील यांचे म ार्गदर्शन लाभले. सान्वीचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष एन. एन. जगदाळे, सचिव पी. टी. पाटील, सहसचिव देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, शाळा समिती सदस्या डॉ. मिराताई यादव, प्राचार्या के. डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर. बी. सपताळे, पर्यवेक्षिका एन. बी. साठे, पर्यवेक्षक के. जी. मदने, आदींनी अभिनंदन केले.

# 'युनायटेड'ची एनजी अकादमीवर मात



### नजीर पैलवान शेख स्मृती चषक क्रिकेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

युनायटेड क्रिकेट क्लबचे दिवंगत खेळाडू नजीर पैलवान शेख स्मृती चषक क्रिकेट स्पर्धेत युनायटेट क्रिकेट क्लबने नीलेश गायकवाड क्रिकेट अकादमीवर २८ धावांनी मात केली.

तीन दिवशीय सामन्यात हर्षद विजापूरे सामन्याचा मानकरी ठरला. हर्षदने गोलंदाजाचेही पारितोषिक पटकाविले. श्रीराज गवळी उत्कृष्ट फलंदाजाचा मानकरी ठरला. पारितोषिके ज्येष्ठ क्रिकेटपटू के. टी. पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी बिजेश रॉय, ऋषिकेश यरगल, विक्रांत पवार, रविंद्र हांगे, विनोद पाटील, विष्णू गायकवाड, सुनिल शिंदे आदी उपस्थित होते. विष्णू गायकवाड यांनी सुत्रसंचलन केले. या साम न्यासाठी पंच म्हणून प्रविण बेनाळाकर व प्रवीण आवळे यांनी काम पाहिले.

**संक्षिप्त धावफलक : युनायटेड पहिला डाव :** ७२.२ षटकात सर्व बाद २३२ (श्रीराज गवळी ८२, सम्राट बोबडे ४३, ध्रुव शिंदे २३, हर्षद विजापुरे १८, सार्थक कन्ना ४-५४, जयवर्धन भोसले ३-२४, ऋग्वेद पाटील अनुज वाल्मिकी आर्यन हंगे प्रत्येकी एक बळी)

**निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमी पहिला डाव :** ५१ षटकात सर्व बाद १३१ धावा (सुजल गायकवाड नाबाद ४१, यशराज टेकाळे २९, आर्यन हंगे २४, जयवर्धन भोसले १०, हर्षद विजापुरे व दत्तात्रय कुलकर्णी प्रत्येकी चार बळी, देवदत्त कोळेकर व सम्राट बोबडे प्रत्येकी एक बळी )

**युनायटेड दुसरा डाव :** ३८ षटकात सर्व बाद ११७ (श्रीराज गवळी ४५, श्रीराज कबाडे २३, सम्राट बोबडे ११, अनुज वाल्मिकी ५-२३ जयवर्धन भोसले व सार्थक कन्ना प्रत्येकी दोन बळी, ऋग्वेद पाटील १-२१).

**निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमी :** सर्व बाद १९० (अभिजीत सरवदे ७२, यशराज टेकाळे १८, अनुज वाल्मिकी १९, कबीर कीर्तीकर १७, सम्राट बोबडे ५-२९. हर्षद विजापुरे ३-७०, दत्तात्रय कुलकर्णी २-४२)

# मोहोळच्या नागनाथ विद्यालयाचे वर्चस्व

### पुणे विभागीय शालेय शूटिंग बॉल स्पर्धा : एम. ए. पानगल तृतीय



**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

पुणे विभागीय शालेय शूटिंग बॉल स्पर्धेत १९ वर्षांखालील मुले व मुलींच्या गटात मोहोळच्या नागनाथ विद्यालयाने विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला. विजयी संघाची २० ते २२ जानेवारी दरम्यान अकोला येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेसाठी निवड झाली.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूर व नागनाथ विद्यालय व जुनिअर कॉलेज मोहोळ यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेस सुरुवात झाली. या स्पर्धे चे उद्घाटन नागनाथ विद्यालय मोहोळचे राष्ट्रीय खेळाडू कार्तिकी गरगडे हिचे हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रशालेचे प्राचार्य श्री बागवान, उपप्राचार्य श्री शिंदे क्रीडाशिक्षक संभाजी चव्हाण, निवृत्त तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव आदी उपस्थित होते. या स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी पंच म्हणून शोएब शेख, इकबाल दलाल व माऊली गायकवाड यांनी सहकार्य केले

**स्पर्धेचा अंतिम निकाल (प्रथम तीन)**

**१९ वर्षे मुले :** नागनाथ विद्यालय मोहोळ, अहिल्यानगर ग्रामीण, पानगल ज्युनिअर कॉलेज सोलापूर. **१९ वर्षे मुली :** नागनाथ विद्यालय मोहोळ, अहिल्यानगर ग्रामीण, पानगल ज्युनियर कॉलेज सोलापूर.

# सुर्यनमस्कार स्पर्धेत सुमतीबाई स्कूलला दुहेरी मुकुट

### खुल्या गटात स्नेहसाधना मंडळाची बाजी; शिक्षक ग्रुपमध्ये हजारे, ढोणे प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

सुर्यनमस्कार स्पर्धेत शालेय गटात सुमतीबाई स्कूलने मुली व मुलींच्या गटात विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला. खुल्या पुरुष व महिला गटात स्नेहसाधना मंडळाने बाजी मारली. शिक्षक गटात गायत्री हजारे व दत्ता ढोणे यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

क्रीडा व युवक सेवा, आयुष संचालनालय, जिल्हा क्रीडा कार्यालय, म.न.पा सोलापूर, क्रीडा भारती, आस्था सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हरिभाई दैवकरण कनिष्ठ महाविद्यालय येथे जिल्हा प्रशिक्षण व स्पर्धेचे आयोजन केले होते. यात १५० विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते. याचे उद्घाटन ह. दे. प्रशालेच्या प्राचार्या दिपा पाठक यांच्या हस्ते झाले. यावेळी छत्रपती योग साधना मंडळ अंबड राज्य समन्वयक देवानंद चित्राल, तालुका क्रीडाधिकारी आर. आर गायकवाड, क्रीडाधिकारी नदीम शेख, क्रीडा भारती जिल्हाध्यक्ष डॉ विलास हरपाळे, क्रीडा भारती शहराध्यक्ष सुधीर देव, उपाध्यक्ष अरुण उपाध्ये, संचालक राजेश कळमणकर, प्रा. प्रमोद चुंगे आदी उपस्थित होते. यावेळी महान कुस्तीपटू खाशाबा जाधव यांची जयंती व राज्य क्रीडा दिन साजरा करण्यात आला.

छत्रपती योग व क्रीडा प्रशिक्षण अंबड तालुका जिल्हा जालना येथे झालेल्या राज्यस्तरीय शिक्षक प्रशिक्षण स्पर्धा आणि दोन दिवसीय योग साधना शिबिरातून सुर्यनमस्कारांचे प्रशिक्षण घेऊन आलेल्या मास्टर ट्रेनर सुहास छंचुरे व परमेश्वर व्हसुरे यांच्या तांत्रिक समितीने सूर्यनमस्कार स्पर्धा घेण्यात आले. राज्य सम न्वयक देवानंद चित्राल यांच्या मार्गदर्शनाखाली शास्त्रशुद्ध पद्धतीने सूर्यनमस्कार प्रशिक्षण १२ मंत्र्यांसह घेण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुहास छंचुरे यांनी केले. प्रमोद चुंगे यांनी आभार मानले. सूर्यनमस्कार प्रशिक्षण व स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रा. प्रमोद चुंगे, रोहन घाडगे, सोमनाथ मगर, प्रतिमा स्वामी, शितल शिंदे यांनी परिश्रम घेतले. स्पर्धेतील प्राविण्य प्राप्त खेळाडूंना क्रीडा भारती सोलापूर यांच्या वतीने सन्मानित करण्यात आले.





**अंतिम निकाल (प्रथम तीन)**

* **शालेय गट मुली :** पी.एस. इंग्लिश मीडियम, वि.म.मेहता, उमाबाई श्राविका. **मुले :** पी.एस. स्कूल, वि.म. मेहता,शिवाजी प्रशाला.
* **खुला गट मुले :** स्नेह साधना मंडळ, शिवोहम योगा क्लास, दमानी प्रशाला. **मुली :** स्नेहसाधना मंडळ, दमाणी प्रशाला, कन्या प्रशाला.
* **शिक्षक गट : महिला :** गायत्री हजारे, अर्चिता आघाव, स्वामी प्रतिमा. **पुरुष :** दत्ता ढोणे, ऋषिकेश पट्टा, सोमनाथ मगर.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### देवकते-पाटलांच्या वाढदिनानिमित्त शालेय साहित्य वाटप

**माळशिरस, दि.१८ जानेवारी-**

माळशिरस तालुक्याचे ज्येष्ठ व्यक्तिमत्व स्व. शिवाजीराव पाटील उर्फ शिवाजीभाऊ यांच्या विचाराचा वारसा जपत युवा नेतृत्व प्रितमसिंह साधनादेवी काशिनाथ देवकाते पाटील यांचा वाढदिवसानिमित्त गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊवाटप करण्यात आले. माळशिरस नगरपंचायत हद्दीतील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाघमोडे वस्ती, साठ फाटा पाटील वस्ती, चौगुले वस्ती येथील लहान मुलांना शालेय साहित्य व खाऊवाटप करण्यात आले. यावेळी अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक व अहिल्यादेवी विकास सेवा संस्थेचे चेअरमन संदीप पाटील, माळशिरस नगरपंचायतीचे माजी उपनगराध्यक्ष अजिनाथ वळकुंदे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नानासाहेब वाघमोडे, हरिभाऊ वाघमोडे, सचिन वाघमोडे, दत्तात्रय वाघमोडे, मारुती वाघमोडे, संजय झंजे, दत्तू वाघमोडे, शिवाजी वाघमोडे, विनोद वाघमोडे, अज्ञान टेळे, शिक्षक अमोल करचे, पुनम वाघमारे, दत्तात्रय जाधवर, राजश्री जाधवर, वैशाली महामुनी, साहेबराव रुपनवर उपस्थित होते. यावेळी चांदापूरी कारखाना स्थळावर लोकप्रतिनिधी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी ॲड. पांडुरंग पाटील, ज्योतीराम जाधव, कारखाना मार्केटिंग मॅनेजर ऋषिकेश इनामदार, नितीन लोंढे, अकाउंटंट अनिकेत गोपने, बापूराव ननवरे, ओंकार कदम, आझाद सय्यद, बापूराव तरंगे, सोमनाथ काळे उपस्थित होते.




### डिजीटल पत्रकार संघाच्या बार्शी शाखेचा पदग्रहण उत्साहात

**बार्शी, दि.१८ जानेवारी-**

डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघाच्या बार्शी शाखेची कार्यकारिणी पदग्रहण व आढावा बैठक बार्शी येथे पार पडली. संघटनेचे राजा माने यांच्या मार्गदर्शनाखाली तर संघटनेचे ज्येष्ठ मार्गदर्शक सूर्यकांत वायकर यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. बैठकीस राष्ट्रीय समन्वयक मुरलीधर चव्हाण, राज्य कार्यकारिणी सदस्य संतोष सूर्यवंशी, राज्य प्रसिद्धीप्रमुख धीरज शेळके, राज्य तांत्रिक सल्लागार नागेश सुतार, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष प्रवीण नागणे, सोलापूर जिल्हाध्यक्ष सचिन कुलकर्णी, जिल्हा सहसचिव किरण माने, जिल्हा संघटक तानाजी जाधव, महिला जिल्हाध्यक्ष नीता देव, महिला जिल्हा उपाध्यक्ष राजश्री गवळी, बार्शी तालुका अध्यक्ष सिद्धार्थ बसवंत उपस्थित होते. बैठकीत बार्शी तालुका अध्यक्ष सिद्धार्थ बसवंत, उपाध्यक्ष अक्षय बारंगुळे, तालुका ग्रामीण अध्यक्ष भैरवनाथ चौधरी, सचिव शंकर लाखे, खजिनदार विश्वास वीर, संपर्कप्रमुख श्रीशैल माळी, तालुका महिला अध्यक्ष प्रतिज्ञा वाळके यांच्यासह अभिजीत शिंदे, परशुराम राऊत, रवींद्र सांगोळे, स्वप्निल पोकळे व किशोर शेटे यांची कार्यकारी सदस्य म्हणून निवड करण्यात आली. सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. बैठकीत विविध सामाजिक व संघटनात्मक ठराव मंजूर करण्यात आले. पत्रकार राजा माने यांना विधान परिषदेवर आमदार म्हणून संधी मिळावी, यासाठी संघटनेच्या सर्व प्रतिनिधी व पदाधिकाऱ्यांनी पाठपुरावा व मागणी करावी, असा ठराव मंजूर करण्यात आला. दि. १९ मार्च रोजी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सात व्यक्ती अथवा संस्थांचा पुरस्कार देऊन गौरव करणे, तसेच जून महिन्यात पत्रकारांच्या पाल्यांना शालेय साहित्य वाटप करणे व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्याचे ठराव एकमताने संमत करण्यात आले.

**बैठकीत राजा माने यांना विधान परिषदेवर घेण्याची मागणी**



### प्रशासकीय अधिकारी डॉ.दत्ता नवले यांच्या वतीने नगरसेवक महेश इंगळे यांचा सत्कार.

**अक्कलकोट, दि.१८ जानेवारी-**

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक महेश इंगळे हे नगरसेवक म्हणुन पाचव्यांदा निवडून आले आहेत. यानिमित्ताने प्रशासकीय अधिकारी डॉ.दत्ता नवले यांनी येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान कार्यालयात चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार केला. यावेळी त्यांनी अक्कलकोट सारख्या बहूभाषिक नगर परिषदेच्या निवडणुकीत सलग पाच वेळा निवडून येऊन ऐतिहासिक विजय मिळविणे हे केवळ महेश मालक यांच्या व्यक्तिमत्त्वालाच शक्य आहे असे सांगून महेश मालक इंगळे यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी प्राचार्य डॉ.शंकर नवले, प्रा.सागर नवले, प्राध्यापक प्रकाश नवले, सिंहगड पब्लिक स्कूलचे उपप्राचार्य प्रा.सचिन चव्हाण, शकील नाईकवाडी, ओंकार महाडीक, दर्शन घाटगे, सचिन हन्नूरे, श्रीशैल गवंडी, श्रीकांत मलवे, महेश मस्कले, लखन सुरवसे, विपुल जाधव आदींसह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### शोभा शिंदे



**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

जुळे सोलापूर भागातील रहिवासी शोभा अंबऋषी शिंदे (वय-६२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना नातवंडे असा परिवार आहे. उद्योजक व अँडस बॅटरीचे मालक प्रकाश शिंदे यांच्या त्या मातोश्री होत.

# पं.स., जि.प. निवडणुकीसाठी भाजप-सेना युती होणार का?

## आघाडी व महायुतीतील मित्रपक्ष लढल्याने मतविभागणीचा धोका

**तभा वृतसेवा,**
**अक्कलकोट, दि. १८ जानेवारी-**

नगरपालिका निवडणुकीत अक्कलकोट व दुधनीत भाजपा व शिवसेना शिंदे गट एकमेका विरुद्ध लढले. अक्कलकोट तालुक्यातील ६ जिल्हा परिषद गट व १२ पंचायत समिती गणात निवडणुकीकरिता भाजपा व शिवसेना शिंदे गटात युती होणार की नपा निवडणूकासारखे विरोधात लढणार याकडे संपूर्ण जिल्ह्याचे नव्हे तर राज्याचे लक्ष लागले आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुक कार्यक्रम प्रक्रिया सुरु झाली आहे. भाजपा अक्कलकोट तालुका कार्यालयात जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांची गर्दी वाढत आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीने नगर पालिका निवडणुकीत अक्कलकोट व मैंदर्गी नगरपालिका निवडणुकीत मोठे यश मिळविले. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीतही भाजपाची सत्ता आणण्यासाठी कार्यकर्ते कामाला लागले आहेत. नगर पालिकांसह महानगरपालिका निवडणुकीत भाजपाला मोठे यश मिळाल्याने स्वबळावर तालुक्यात निवडणुका लढविण्याबाबत भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते यांच्या भावना आहेत. जिप व पंस साठी इच्छुकांची संख्या भाजपाकडे अधिक आहे. यामुळे तालुक्यात जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीकरिता भाजपा मित्र पक्ष राष्ट्रवादी, शिवसेना शिंदे गटात युती होणार का याबाबत शंका व्यक्त होत आहे.

दुधनी व अक्कलकोट नपा निवडणुकात भाजपा व शिवसेना शिंदे गट एकमेकाविरोधात लढले पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुक स्वबळावर लढणार का? सर्व उमेदवार उभे करणार का ? याबाबत शिवसेना शिंदे गटाचे जेष्ठ नेते माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांची प्रतिक्रिया घेतली असता तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुक भाजपा सेना महायुतीकडून लढविणार असल्याचे सांगितले.

## 'भैरवनाथ'चे चेअरमन अनिल सावंत भोसे गटासाठी रिंगणात?

### राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून निवडणूक लढवणारची चर्चा

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि.१८ जानेवारी-**

तालुक्यातील भोसे जिल्हा परिषद गटासाठी भैरवनाथ शुगरचे चेअरमन अनिल सावंत राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून निवडणूक लढवण्याची तयारी करत असल्याची चर्चा सध्या केंद्रस्थानी आहे.



भोसे जिल्हा परिषद गट मंगळवेढा तालुक्याच्या दक्षिण भागातील महत्त्वाचा राजकीय पट आहे. राष्ट्रवादी शरदचंद्रजी पवार गटात अनिल सावंत यांची पकड मजबूत असून, त्यांच्याकडे कारखान्यातील कामगारांचा मोठा वर्ग आहे. लवंगी गावासह या गटातील विविध गावांतील जवळपास २०० कामगार कारखान्यात कार्यरत असल्याने सावंत यांना मोठा फायदा होणार आहे. विरोधी गटातील नेत्यांकडूनही सावंत यांना पाठिंबा मिळण्याची शक्यता बळावत आहे. ज्यामुळे निवडणूक चुरशीची होईल. भैरवनाथ शुगर कारखाना हा २५०० टन क्षमतेचा असून, सहवीज निर्मिती प्रकल्पाने स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना दिली आहे. कारखान्याच्या माध्यमातून ऊस उत्पादक शेतकऱ्यांशी थेट संपर्क आहे. रोजगार संधींमुळे स्थानिकांच्या समस्या सोडवणाऱ्या सावंत यांना याचा मोठा आधार मिळेल असे बोलले जात आहे. स्थानिक पातळीवर कोअर कमिटी बैठका आणि रणनीती आखणी सुरू असून, भोसे गटातील ग्रामपंचायती आणि पंचायत समित्यांमध्येही त्यांचा प्रभाव वाढत आहे.

## सुलाखे कॉमर्स कॉलेजचे कासारवाडी येथे श्रमसंस्कार शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१८ जानेवारी-**




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर आणि श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत मौजे कासारवाडी येथे आयोजित सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिरास उत्साहात सुरूवात झाली.

'शाश्वत विकासाच्या दिशेने युवकांची भूमिका- जलसंधारण व्यवस्थापन व पडीक जमीन विकास' या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर हे शिबीर दि. १७ ते २३ जानेवारी या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. एम. ए. ढगे यांनी प्रास्ताविक केले. शिबिराचे उद्घाटन प्रा. के. बी. चपटे यांच्या हस्ते झाले. त्यांनी शिस्त, संघभावना आणि सेवाभाव जपत गावाच्या विकासासाठी काम करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. अध्यक्षस्थानी डॉ. बी. डी. लांडे होते. यावेळी सरपंच प्रतिनिधी नितीन मंडलिक उपस्थित होते. सुलाखे कॉमर्स कॉलेजचे सर्व प्राध्यापक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे १०० स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. कार्यक्रमाधिकारी प्रा. के. एम. माळी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एन. आर. सारफळे यांनी आभार मानले. या सात दिवसांच्या शिबिरात जलसंधारण, पडीक जमीन विकास, स्वच्छता, जनजागृती व सामाजिक बांधिलकी जोपासणारे विविध उपक्रम राबविण्यात येणार असून या माध्यमातून युवकांमध्ये राष्ट्रनिर्माणाची जाणीव अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## प्रहार जनशक्ती पक्ष स्वबळावर निवडणूक लढवणार : अमोल जगदाळे

### करमाळा तालुक्यात ताकद दाखवणार

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.१८ जानेवारी-**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये करमाळा तालुक्यात प्रहार जनशक्ती पक्ष स्वबळावर व स्वतंत्रपणे निवडणूक लढवणार असल्याची घोषणा सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख अमोल जगदाळे यांनी केली.

करमाळा तालुक्यात प्रहार जनशक्ती पक्षाने शेतकरी, कष्टकरी, वंचित, दिव्यांग आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष केला आहे. शेतकऱ्यांच्या दुधाला योग्य दर, ऊस दरवाढ, शेतमालाला हमीभाव, कर्जमाफी यांसाठी रस्ता रोको, ठिय्या आंदोलन, शोले स्टाईल आंदोलन करत प्रशासनाला वेळोवेळी धारेवर धरले आहे. तसेच तालुक्यात आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे व विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून प्रहारने जनतेच्या अडचणींना थेट हात घातला आहे. दिव्यांग बांधवांच्या हक्कासाठी लढणारी आणि न्याय मिळवून देणारी संघटना म्हणून प्रहारची ओळख आहे. जात-धर्माच्या भिंती तोडून सर्व समाजघटकांना न्याय देणे हीच प्रहारची भूमिका असल्याचे जगदाळे यांनी स्पष्ट केले. तालुकाध्यक्ष संदीप तळेकर यांच्याकडे सर्व बी-फॉर्म अधिकृतपणे रवाना करण्यात आले आहेत. चळवळीत झटणाऱ्या, संघर्षातून उभ्या राहिलेल्या कार्यकर्त्यांनाच उमेदवारी देऊन संधी दिली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. करमाळा तालुक्यात प्रहार जनशक्ती पक्षाची सुमारे १५ हजार मतांची ताकद असून येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ही ताकद जनतेसमोर ठामपणे दाखवून दिली जाईल, असा विश्वास जगदाळे यांनी व्यक्त केला. करमाळा तालुक्यातील शेतकरी, युवक, महिला, वंचित, दिव्यांग व परिवर्तनाची इच्छा असलेल्या सर्व नागरिकांनी प्रहार जनशक्ती पक्षाच्या स्वबळाच्या लढ्याला साथ द्यावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.



## सांगोला पोलिसांनी केला वर्षभरात ४ कोटी ६३ लाखाचा दंड वसुल

### सन २०२५ मध्ये धडक कामगिरी

**सांगोला, दि.१८ जानेवारी -**

सन २०२५ मध्ये सांगोला तालुक्यातील अवैध व्यवसायांवर कारवाई करुन सुमारे लाखो रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करत ४ कोटी ६२ लाख ८२ हजार ४९४ रुपये दंड वसुल केला. सराईत गुन्हेगारांवर स्थानबध्द व हद्दपारीची कारवाई करण्यात आली.

यामध्ये एम.पी.डी.ए.ऍक्ट- ३, महाराष्ट्र पोलीस अधिनीयम कलम ५६ व प्रमाणे तडीपार- १०, महाराष्ट्र पोलीस अधिनीयम कलम ५५ प्रमाणे तडीपार- २, सी.आर.पी.सी.१४४ / बी.एन.एस.एस.१६३ प्रमाणे- १७, सी.आर.पी.सी.११०/ बी.एन.एस.एस.१२९ प्रमाणे- ६५, सी.आर.पी.सी.१०७/ बी.एन.एस.एस.१२६ प्रमाणे- २३४५, सी.आर.पी.सी.१०९/बी.एन.एस.एस. १२८ प्रमाणे- ५, प्रोव्ही ऍक्ट ९३ प्रमाणे- ३५, निर्भया पथकांने मुंबई पोलीस अधिनीयम अंतर्गत केलेली कारवाई- ३१७ असे एकुण प्रतिबंधक कारवाई- २ हजार ७९९ करण्यात आली. तसेच दारुबंदी- २३९, जुगार- ८३, वाळु-५९, गुटखा- ८, जनावर वाहतुक- ६, वाहतुक नियमन- ३ हजार ८४७ असे एकुण ४ हजार २४२ केसेस अवैध धंद्यावर करण्यात आल्या असून त्यामधून ४ कोटी ६२ लाख ८२ हजार ४९४ रुपये दंड करण्यात आला आहे. सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, मंगळवेढा उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.बसवराज शिवपुजे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनोद घुगे, एपीआय मोरे, पीएसआय पुजारी, दामिनी पथकाच्या चव्हाण, पोकॉ.राजु आवटे, अधिकारी व अंमलदार यांनी केली.

> सन २०२६ मध्ये सांगोला पोलीस ठाणे हद्दीतील गुन्हेगारी प्रवृतीचे लोकांवर करडी नजर ठेवुन तसेच जेष्ठ नागरीक, महिला, व अल्पवयीन मुलीची छेड काढणारे लोक यांचेवर प्रभावी कारवाई करण्याचे ध्येय आम्ही नववर्षात घेतले आहे. सांगोला पोलीस ठाणे हद्दीतील सर्व अवैध धंद्यांचे समुळ उच्चाटन करण्याचा संकल्प केलेला आहे.
>
> **- विनोद घुगे, पोलीस निरीक्षक, सांगोला**



## सांगोला विद्यामंदिरचे शासकीय रेखाकला परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१८ जानेवारी -**

सांगोला विद्यामंदिर प्रशालेतील विद्यार्थ्यांनी शासकीय रेखाकला एलिमेंटरी व इंटरमिजिएट ग्रेड परीक्षा २०२५-२६ मध्ये अनुक्रमे २० आणि ३७ अशा एकूण ५७ विद्यार्थ्यांनी ए ग्रेड संपादन केली आहे. एलिमेंटरी बी ग्रेडमध्ये २० तर सी ग्रेडमध्ये ४ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. तसेच इंटरमिजिएट बी ग्रेडमध्ये ५ तर सी ग्रेडमध्ये ४ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. दोन्ही परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना एलिमेंटरी परीक्षेसाठी समाधान शिंदे व इंटरमिजिएट परीक्षेसाठी अमोल उकळे यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्था अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, खजिनदार शंकरराव सावंत, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, कार्यकारणी सदस्य विश्वेश झपके, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापक चिंतामणी देशपांडे, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, उत्तम सरगर, काकासाहेब नरुटे तसेच परीक्षा विभाग प्रमुख नामदेव खंडागळे व सिताराम राऊत यांनी अभिनंदन केले.

## माढ्यात सहकार महर्षी चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेस सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १८ जानेवारी-**

सोलापूर जिल्ह्याचे पहिले सहकार महर्षी कै. गणपतराव साठे यांच्या १३८व्या जयंतीनिमित्त माढ्यात स्वराज्य ग्रुपच्या वतीने भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेस सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशालेच्या मैदानावर सुरवात झाली.

माजी नगरसेवक नितीन ताना साठे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वराज्य ग्रुपने याचे आयोजन केले आहे. याचे उद्घाटन पंढरपूर नगर परिषदेच्या नूतन नगराध्यक्षा प्रणितीताई भालके, कुर्डूवाडी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा जयश्री भिसे व माढा नगरपंचायत नगराध्यक्षा मीनलताई साठे यांच्या हस्ते करण्यात आले.



या प्रसंगी दादासाहेब साठे, सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी बंडगर, नगरसेविका भाग्यश्री पाटील, साक्षी डिकोळे नगरसेवविका मोहिनी नेटके, शबाना बागवान, सुनीता राऊत, शहाजी साठे, गुरुराज कानडे, मुन्ना साठे, उमेश साठे, वेदांत साठे, समर्थ भांगे, राजू गोटे, नाना साठे, सचिन साबळे, शिवाजी जगदाळे, नितीन ताना साठे, औदुंबर वाकवकर आदी उपस्थित होते.

## सोमेश्वर व बनसिध्देश्वर यात्रेनिमित्त कुस्त्या संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

हत्तूर येथील सोमेश्वर व बनसिध्देश्वर यात्रेनिमित्त गुरुवारी मान्यवरांच्या उपस्थितीत जंगी मल्लांच्या कुस्त्या पार पडल्या. यावेळी यात्रा कमिटीकडून ५१ हजार रूपयांच्या कुस्त्या लावण्यात आल्या. शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा उपप्रमुख आणप्पा सतुबर व नानागौडा पाटील यांच्या हस्ते या कुस्त्या लावण्यात आल्या. यावेळी शिलीसिद्ध महाराज, सोमनिंग कनपवडीयार, राजशेखर भरले, बपा वाले, बापू पाटील, गुरप्पा कुलकर्णी, बाबू उपासे, बिळेणी कनपवडीयार, गुरप्पा पटवडीयार, रेवणसिध्द डोळे, मल्लिनाथ अजनाळे, संगप्था निंबर्गी, सोमनिंग कोळी, बंदप्पा पाटील, केदार डोळे, सोमनिंग नायकोडे, ईरप्पा म्हेत्रे, सूर्यकांत नायकोडे , शिवानंद पाटील, अप्पू पाटील, बप्पा वाले, बनसिध्द भिंगे, नीलप्पा उपासे, ज्योतप्पा सिनेवडीयार, बंदेनवाज मुल्ला आदी उपस्थित होते.



# 'भाजपा'मध्ये उमेदवारीसाठी रस्सीखेच; आ.सुभाष देशमुख समर्थकांची घालमेल

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.१८ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीपूर्वी दक्षिणमध्ये आमदार सुभाष देशमुख यांची एकहाती वर्चस्व होते. मात्र माजी आमदार दिलीप माने यांच्या भाजप प्रवेशामुळे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीत उमेदवारीसाठी चुरस दिसून येत आहे. माजी आमदार माने हे निवडणूकीत कार्यकर्त्यांना संधी देण्यासाठी पालकमंत्र्यांकडे ताकद लावत असल्याने आमदार सुभाष देशमुख समर्थक इच्छुकांची घालमेल सुरू झाली आहे.

सोलापूर महानगरपालिकेमध्ये भाजपाने ८७ जागा जिंकून सत्ता मिळविल्याने पालकमंत्र्यांसह तीनही आमदारांचा विश्वास दुणावला आहे. सोलापूर दक्षिण मतदारसंघातील जुळे सोलापूरातील राष्ट्रवादी काँग्रेसचे वैभव हत्तुरे वगळता भाजपाचे सर्व नगरसेवक निवडून आले आहेत. त्यामुळे आमदार सुभाष देशमुख व माजी आमदार दिलीप माने यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत आपल्या कार्यकर्त्यांना संधी देण्यासाठी प्रयत्नशील आहेत. दक्षिण सोलापूरमधील सहा मतदारसंघापैकी तीन मतदारसंघ अक्कलकोट विधानसभा तर तीन मतदारसंघ दक्षिण विधानसभा क्षेत्रात आहे.

दक्षिणच्या तीन मतदारसंघापैकी आमदार सुभाष देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी व माजी आमदार दिलीप माने यांनी प्रत्येकी एक मतदारसंघावर दावा केल्याचे सांगण्यात येत आहे.

दक्षिणमधील हत्तूर, मंद्रुप व भंडारकवठे हे तीन जिल्हा परिषद मतदारसंघ आहेत. तीनही गट ताब्यात ठेवण्यासाठी आमदार देशमुख यांनी ताकद पणाला लावली असून पक्षाच्या वरिष्ठांकडे प्रस्ताव पाठविला असल्याची चर्चा सुरू आहे. नुकतेच भाजपात प्रवेश करून जुळे सोलापूरात चारपैकी तीन नगरसेवक निवडून आणणारे माजी आमदार माने यांनीही जिल्हा परिषद गटात कार्यकर्त्यांना उमेदवारी देण्यासाठी तयारी सुरु ठेवली आहे. माने समर्थकांना निवडणुकीसाठी सज्ज राहण्याचे आदेश देण्यात आले आहे.

दुसरीकडे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी त्यांच्या समर्थकांना उमेदवारी देण्याचा शब्द दिला असून कार्यकर्तेही तयारीला लागली आहेत. त्यामुळे कोणत्या मतदारसंघात कुणाला उमेदवारी मिळणार? हे सांगणे कठीण आहे. मात्र प्रत्येक जण आपल्या समर्थकांसाठी सर्व शक्ती खर्च करीत असल्याचे दिसून येत आहे.

### उमेदवारी देण्यात पालकमंत्री, आ. सचिनदादांचे वर्चस्व

दक्षिण सोलापूरमधील निवडणुकीसाठी उमेदवारी देण्याचा अधिकार पालकमंत्र्यांकडे आहे. अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी हे पालकमंत्र्यांचे निकटवर्तीय आहेत. त्यामुळे उमेदवारी देण्यात पालकमंत्री व सचिनदादांचे वर्चस्व राहणार असल्याचे बोलले जात आहे.

# सामाजिक सलोखा, पारदर्शकता, प्रामाणिकपणा जपा : तडवळकर

## बीबीएनसह समस्त ब्राह्मण संस्थांतर्फे नूतन नगरसेवकांचा केला सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.१७ जानेवारी-**

नगरसेवक हे केवळ प्रतिनिधी नसून शहराच्या विकासाचे शिल्पकार असतात. जनतेच्या अपेक्षा पूर्ण करताना सामाजिक सलोखा, पारदर्शकता आणि प्रामाणिकपणा जपण्याचे आवाहन भाजपा शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी केले. एसपीएम इंग्लिश स्कूलच्या सभागृहात ब्राह्मण ब्रिझ नेटवर्क असोसिएशन (बीबीएन), समस्त ब्राह्मण संस्थांतर्फे सोलापूर महापालिकेच्या निवडणूकीत विजयी झालेल्या ब्राह्मण नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर पंचांगकर्ते मोहन दाते, मीनाताई चाटी व नूतन नगरसवेक उपस्थित होते.




कार्यक्रमाची सुरुवात वेद प्रतिष्ठानचे मुकुंद मुळेगावकर, वैभव कामतकर, अगिन्होत्री,प्रसाद देशमुख यांनी सादर केलेल्या मंत्रोच्चारासह भगवान परशुराम यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. यावेळी देऋब्रा शिक्षणोत्तेजक संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांच्या हस्ते नगरसेविका गीता गवई (प्रभाग ८ ब) यांचा, बी. जी. कुलकर्णी यांच्या हस्ते नगरसेवक सात्विक बडवे (प्रभाग २१), सीमा किणीकर यांच्या हस्ते नगरसेविका मंजिरी किल्लेदार (प्रभाग २१) यांचा गौरव करण्यात आला.

चाटी यांच्या हस्ते शहराध्यक्षा तडवळकर यांचा सन्मान करण्यात आला. पू. ना. गाडगीळ ज्वेलर्सचे जितेंद्र जोशी यांनी विशेष फ्रेम देऊन नूतन नगरसेवकांचा सत्कार केला. यावेळी नगरसेविका गवई यांनी प्रभागातील मूलभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि महिलांसाठी उपयुक्त उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त केला. नगरसेवक सात्विक बडवे यांनी तरुणांच्या सहभागातून शहर विकासासाठी सकारात्मक आणि पारदर्शक कामकाज करण्याचा संकल्प मांडला.नगरसेविका मंजिरी किल्लेदार यांनी नागरिकांच्या विश्वासास पात्र ठरून सामाजिक बांधिलकी जपत प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करण्याची ग्वाही दिली. पंचांगकर्ते दाते यांनीही आपल्या मार्गदर्शनपर भाषणात समाजातील विविध घटकांना सोबत घेऊन काम करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. याच समारंभात देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था, विश्व मध्व परिषद आणि द्वारकाधीश मंदिर यांच्या वतीनेही नूतन नगरसेवकांचा विशेष सत्कार करण्यात आला. अमित कामतकर यांनी सूत्रसंचालन केले. दत्तराज कुलकर्णी यांनी आभार मानले.

# शेतात जळण आणण्यास गेलेल्या विवाहितेचा विनयभंग; एकाविरुध्द गुन्हा

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि.१८ जानेवारी-**

मंगळवेढयाच्या ग्रामीण भागात ३३ वर्षीय विवाहित महिला डाळिंबाची लाकडे जळण आणण्यासाठी शेतात गेल्या होत्या. तेव्हा बांधलेले जळण उचलण्यासाठी एकास बोलावले असता त्याने पाठीमागून मिठी मारुन तु मला खूप आवडते, असे म्हणून तिचा विनयभंग केल्याची घटना घडली. याप्रकरणी दिगंबर माने याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील पिडीत महिला ही ३३ वर्षाची असून तिचे पती शुगरच्या त्रासाने त्रस्त असल्याने ते घरीच असतात. सदर पिडीता ही दि.१७ जानेवारी रोजी दुपारी २.३० वाजता एका शेतात डाळिंबाची वाळलेली लाकडे घरगुती वापरासाठी आणावयास गेली होती. त्या लाकडाची मोळी बांधल्यावर ती उचलत नसल्याने शेतात काम करीत असलेला आरोपी दिगंबर माने यास हाक मारली. तो आरोपी तेथे आला लाकडाची मोळी पिडीतेच्या डोक्यावर उचलून दिली. व अचानक त्याने पिडीतेला पाठीमागून मिठी मारुन तु मला खूप आवडतेस म्हणत विनयभंग केला. तो सदर पिडीतेशी झोंबाझोंबी केल्याने तिच्या हाताला बांगडी लागून जखम झाली. तिने आरडाओरडा करताच तो तेथून पळ काढला. तिने घडलेला प्रकार घरात सांगून पोलिसात तक्रार दाखल केली.

# सोलापुरात बुधवारपासून 'इनर इंजिनीअरिंग' कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

सोलापूरकरांसाठी मकर संक्रांतीच्या शुभ पर्वावर मन, शरीर, भावना व ऊर्जा आनंद, आरोग्य आणि अंतर्गत संतुलन प्राप्त करण्याची एक अनोखी संधी उपलब्ध झाली आहे. ईशा फाउंडेशन व सद्गुरू जग्गी बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली जगभरातील लाखो लोकांचे आयुष्य सकारात्मकरीत्या बदलणारा सात दिवसीय इनर इंजिनीअरिंग कार्यक्रम आता सोलापुरात आयोजित करण्यात आला आहे.

हा सात दिवसीय 'इनर इंजिनीअरिंग' कार्यक्रम येत्या २१ ते २७ जानेवारी या दरम्यान जुळे सोलापुरातील प्रणव नगरीतील बॉम्बे पार्कजवळच्या विवेकानंद केंद्रात हा कार्यक्रम होणार आहे. आजच्या वेगवान व स्पर्धात्मक जीवनशैलीत ताणतणाव हा प्रत्येकाच्या आयुष्याचा भाग बनला आहे. अशा परिस्थितीत यांचा समतोल साधून आनंदी व निरोगी जीवन जगण्यासाठी इनर इंजिनीअरिंग हे एक प्रभावी आणि शाश्वत साधन ठरत आहे.

हा कार्यक्रम १५ वर्षे व त्यापुढील वयोगटातील सर्वांसाठी खुला असून, योगाचा कोणताही पूर्वानुभव आवश्यक नाही. इच्छुकांनी नोंदणीसाठी https://isha.co/IE-qH$dm Solapur या संकेतस्थळाला भेट द्यावी. अधिक माहितीसाठी ८७९९८८२२७२ ९६६५५३०२८५ या क्रमांकांवर संपर्क साधता येईल. जीवनाच्या प्रत्येक अनुभवात गोडवा निर्माण करण्यासाठी ईशा फाउंडेशनने सोलापूरकरांना या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# आले किती अन् गेले किती याचा विचार न करता पूर्ण ताकदीने उतरले पाहिजे : खासदार प्रणिती शिंदे



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ जानेवारी-**

सोलापूरसह राज्यभरातील जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका लागल्या आहेत. आपापल्या स्वार्थासाठी काहीजण या पक्षातून त्या पक्षात त्या पक्षातून या पक्षात प्रवेश केलेले आहेत. परंतु 'काँग्रेस'ची विचारधारा ही तळागाळातील लोकांशी जोडलेली आहे. संघटनेची ताकद, कार्यकर्त्यांचा उत्साह आणि एकजूट हेच काँग्रेसचे खरे सामर्थ्य आहे. त्यामुळे आले किती अन् गेले किती याचा विचार न करता प्रत्येक कार्यकर्ता जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत पूर्ण ताकदीने उतरले पाहिजे, असे प्रतिपादन खासदार प्रणिती शिंदे यांनी केले.

जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीच्या अनुषंगाने 'काँग्रेस'च्या वतीने घेण्यात येत इच्छुकांच्या मुलाखतीच्या वेळी बोलताना त्या पुढे म्हणाल्या, सोलापूर जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने संघटनात्मक तयारीला वेग दिला आहे. दक्षिण व उत्तर सोलापूर तालुक्यातील इच्छुकांच्या मुलाखती काँग्रेस भवन येथे तर अन्य ठिकाणच्या इच्छुकांच्या मुलाखती ह्या ज्या-त्या तालुक्याच्या ठिकाणी घेण्यात आल्या. काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

याप्रसंगी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा डॉ.सुवर्णा मलगोंडा, माजी आमदार विश्वनाथ चाकोते, माजी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब शेळके, प्रदेश चिटणीस सुरेश हावळे, मल्लिकार्जून पाटील, अश्पाक बळोरगी, अरुण जाधव, निशांत कवडे, ॲड.नंदकुमार पवार, ॲड.अर्जुनराव पाटील, सुरेश कोळेकर, प्रशांत साळे, संदीप पवार, दत्तात्रय जाधव, संदीप पाटील, आदित्य फत्तेपूरकर, सुलेमान तांबोळी, राजेश पवार, किशोर पवार, सुरेश हावळे, बाळासाहेब डुबे-पाटील, राजेंद्र लांडे, ज्ञानेश्वर कदम, आरिफ पठाण, गजेंद्र खरात, सिद्राम पवार, सुरेश शिवपूजे, भीमाशंकर जमादार, भारत जाधव, संजय पाटील, गिरीश शेटे, सतीश पाचकुडवे, अजय इंगोले, राजकुमार पवार, विजय साळुंखे, बाळासाहेब मगर आदी उपस्थित होते.

**-इच्छुक उमेदवारांनी मांडल्या मागण्या**

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाकडून इच्छुक असलेल्या उमेदवारांनी मांडलेल्या मागण्या, सूचना आणि त्यांनी केलेल्या कार्याचा संपूर्ण अहवाल पक्षश्रेष्ठींकडे पाठविण्यात येईल. वरिष्ठ नेतेमंडळी सर्वांना विश्वासात घेवून आघाडीसंदर्भातचा निर्णय घेणार आहेत, असे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी सांगितले.

# 'जलपरी'सह आकाश पाळण्यांनी वेधले लक्ष

## श्री सिध्देश्वर गड्डा यात्रेत खाद्यपदार्थांची रेलचेल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ जानेवारी-**

सोलापूरचे ग्रामदैवत श्रीशिवयोगी सिध्दरामेश्वर यात्रेच्या अनुषंगाने विविध धार्मिक विधी थाटात पार पाडण्यात आले. पंचकट्टा ते होम मैदान आणि पंचकट्टा ते जिल्हा परिषद या मार्गावर विविध दुकाने थाटण्यात आलेले आहेत. दरम्यान, 'जलपरी'सह आकाश पाळण्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेत आहेत. या यात्रेत खाद्यपदार्थांची रेलचेल असल्याचे दिसून येत आहे.

'जलपरी'विषयी बोलताना चालक इम्रान खान यांनी सांगितले की, जलपरी इंडोनेशिया देशातील आहे. दररोज सायंकाळी ५ ते रात्री १० पर्यंत जलपरींना पाण्यात राहून विविध कलाकृती सादर करत आहेत. सलग ५ ते ६ तास पाण्यात राहिल्याने त्यांच्या त्वचेला इजा होऊ नये, यासाठी पहिल्यांदा संपूर्ण शरीरावर एक प्रकारचे द्रव्य लावले जाते. ज्यामुळे अधिक काळ पाण्यात राहिल्या तरीही त्वचा सुरक्षित राहते.



विशेष म्हणजे, या जलपरींना अशा पाण्यातील कसरती करण्यापूर्वी पाण्याखाली राहण्याची स्कुबा डायव्हिंगचे प्रशिक्षण घ्यावे लागते. त्याचे प्रमाणपत्र असल्याशिवाय अशा प्रात्यक्षिकांच्या दालनामध्ये त्यांना नोकरीची संधी मिळत नाही. सोलापूर शहरात हे दालन पहिल्यांदाच आले आहे.

येथे केवळ जलपरीच नाही तर जम्मू काश्मीर येथील निसर्गरम्य वातावरण, डॉल्फिन, शार्क, स्नो फॉल, स्नो मॅन यांचे देखावे लक्ष वेधून घेत आहेत. वेगळे सेल्फी पॉईंट उभारण्यात आला आहे.

जलपरींच्या सुरक्षासाठी स्वतंत्र संरक्षक यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे. हे पाणी दररोज बदलावे लागते. जलपरींना कोणतीही इजा होऊ नये यासाठी पाण्यात मिश्रण घालून ते पाण्यात टाकावे लागते. त्यातून पाण्याचा टँक तयार केला जातो, असेही त्यांनी सांगितले. दरम्यान, दरवर्षी गड्डायात्रा सुरु होण्यापूर्वी बच्चेकंपनीत आनंद मेळ्याचे विशेष आकर्षण असायचे. या आनंद मेळाव्यात बच्चेकंपनीला आनंद घेण्यास वाव मिळत असे. परंतु यंदाच्यावर्षी मेला नसल्याने बच्चेकंपनीसह महिलांमध्ये नाराजी असल्याचे दिसून येत आहे.

# तिसंगी येथे झालेल्या दरोड्यातील आरोपींना केले जेरबंद

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१८ जानेवारी-**

पंढरपूर तालुक्यातील तिसंगी या गावात झालेल्या जबरी दरोड्यातील आरोपीला जेरबंद करून सोने, चांदी रोख एक लाख रुपये जप्त करण्यात आले. तिरंगी येथे १२ नोव्हेंबर २०२५ रोजी हा दरोडा टाकण्यात आला होता.

फिर्यादीचे स्वतःचे तिसंगी या गावी सोन्याचे दुकान असुन तो दुकानामध्ये झोपलेला असताना दुकानाचे शटर तोडुन चार अनोळखी इसमांनी ६० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, ०२ किलो चांदीचे दागिने व एक लाख रूपये रोख रक्कम फिर्यादीस मारहाण करून चोरुन नेले.

दोन ते तीन इसम दोन ते तीन वेळा येवुन गेले आहेत. त्यातील एक आरोपी हा सध्या त्याचे राहते घरी (देवापुर, पोस्ट म्हसवड ता.माण, जि.सातारा) येथे आहे अशी माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून विक्रम आनंदा बाबर या आरोपीस ताब्यात घेतले. तीन साथीदारासह गुन्हा केल्याचे त्याने कबूल केले



पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलिस अधीक्षक प्रितम यावलकर, सहायक पोलिस अधीक्षक प्रशांत डगळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक आशिष कांबळे, प्रसाद औटी, कृष्णा पकाले, कपिल माने, शहाजी मंडले, बजरंग बिचुकले, दीपक नवले, हर्षद ठाकर, पवार यांनी ही कामगिरी पार पाडली.

## खडी क्रशर बसविण्यास गोणेवाडीकरांचा विरोध

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा दि. १८ जानेवारी-**

गोणेवाडी येथे खडी क्रशर बसविण्याचे काम सुरु आहे. जवळच जि.प.शाळा व शेतकऱ्यांच्या वस्त्या असल्याने भविष्यात या खडी क्रशरचा त्रास होणार असल्यामुळे खडी क्रशर रद्द करण्यात यावा, असे सांगत गोणेवाडीकरांनी विरोध दर्शविला. दरम्यान, याबाबत नेताजी हजारे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार करण्यात आली.

गोणेवाडी हद्दीत शेत जमिन गट नं.२९४ व गट नंबर ४०२ मध्ये विनापरवाना, बेकायदेशीररित्या खडी क्रशर बसविण्याचे काम सुरु आहे. या परिसरात जिल्हा परिषद शाळा आणि शेतकऱ्यांच्या वस्त्या आहेत. लहान मुलाबाळांसह ते त्याठिकाणी राहत आहेत. खडी क्रशरच्या आवाजाचा विपरित परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही या तक्रारी अर्जात म्हटले आहे.

# मा.आ. नरसिंग मेंगजी : प्रेरणादायी व्यक्तिमत्व

'समाजात निकोप सामाजिक पर्यावरण निर्माण व्हायला पाहिजे'. या विचारांचे मंच निर्माण झाले पाहिजेत तरच मोठे कार्य करणाऱ्या व्यक्ती समाजासमोर येतील. कोणतेही क्षेत्र असो त्या क्षेत्रांमध्ये निकोप आणि सकारात्मक विचारांना प्राधान्य देणारी माणसे समाजात निर्माण होणे आणि त्यांचे अस्तित्व व त्यांचे कार्य समाजासाठी दीपस्तंभ प्रमाणे ठरते. सामाजिक स्तर उंचावणारी माणसे त्यांच्या कर्तृत्वामुळे त्यांच्या असामान्य माजी आमदार नरसिंग मेंगजी यांचा जीवन प्रवास असाच प्रेरणादायी आहे.

सुरुवातीचा काळ म्हणजे भारतीय जनता पक्षाच्या विस्ताराचा कालावधी त्याकाळी एक सामान्य कार्यकर्ता म्हणून संघटन वाढवून अतिशय नेटाने पक्ष वाढीसाठी अविरत प्रयत्न केले. पुढे नगरसेवक व आमदार झाले. परंतु या राजकीय प्रवासात त्यांना अनेक संकटांचा सामना करावा लागला.

राजकीय कारकिर्द आकारास येत असताना त्यांनी समाजकार्याचा देखील वसा घेतला होता. १९७६ ला रोट्रॅक्ट क्लबच्या माध्यमातून समाजसेवेला सुरुवात झाली. सोलापूर शहर मध्यवर्ती गणेश मंडळाच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम राबवत स्वतः त्यामध्ये कार्यमग्न राहिले. रक्तदानाची समाजाची गरज ओळखून रक्तदान शिबिरे आयोजित केली. स्वतः शतकवीर रक्तदाते बनले.



आपल्या राजकीय यशाच्या प्रवासाचा आलेख उंचावत असताना त्यांनी आपली तत्त्वापासून कधिच फारकत केली नाही. आपली सर्वसामान्य जनता आणि पक्षाचा सामान्य कार्यकर्ता यांच्याबरोबरची नाळ कधीच तुटू दिली नाही. जिल्ह्याच्या राजकारणातील एक स्वच्छ चारित्र्याचा, निर्मळ वाणी ओजस्वी वक्तृत्व व प्रसन्न व्यक्तिमत्व आणि आपल्या या बहुआयामी व्यक्तिमत्त्वामुळे व कर्तृत्वामुळे जिल्ह्याच्या राजकारणामध्ये त्यांचा आदराने नामोल्लेख केला जातो. त्यांच्या या व्यक्तिमत्त्वामुळे राजकिय व सामाजिक क्षेत्रात सर्वांबरोबर स्नेहाचे व मैत्रीचे नाते राहिले आहे. अगदी सामान्य कार्यकर्ता ते केंद्रीय स्तरावरील प्रमुख नेत्यांशी स्नेहाचे व मैत्रीचे नाते निर्माण केले आहे. त्यामुळे संपूर्ण भारत वर्षांमध्ये आपल्या मैत्रीच्या धाग्याने माणसे जोडणारा सरदयी व संवेदनशील मनाच्या या कर्तृत्ववान नेत्याने नव्या पिढीसाठी मोठा आदर्श निर्माण केला आहे. आज ते हिंदुस्थान स्काउट्स अँड गाईड्स असोसिएशन नवी दिल्ली या संघटनेचे राष्ट्रीय चेअरमन व भारत-तिब्बत सहयोग मंचाचे राष्ट्रीय मंत्री म्हणून राष्ट्रीय स्तरावर कार्यरत आहेत. असा हा कर्तुत्ववान तेजस्वी व आदर्श नेता. सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणाला वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या या नेत्याला वाढदिवसाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा......

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे**.● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/**. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# शहरात ड्रोन उडवण्यास बंदी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ जानेवारी-**



शहर पोलीस आयुक्तालय हद्दीत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि सुरक्षेच्या कारणास्तव दि. १७ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत सर्व प्रकारचे ड्रोन आणि मानवरहित हवाई यंत्रे उडवण्यास पूर्णतः बंदी घालण्यात आली आहे. सोलापूरचे पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३, कलम १६३ (१) अन्वये हे मनाई आदेश जारी केले आहेत. हा आदेश ३१ जानेवारी २०२६ (२४:०० वा.) पर्यंत लागू असेल. समाजकंटकांकडून ड्रोनचा वापर करून राष्ट्रीय सुरक्षेच्या ठिकाणांना धोका निर्माण होऊ शकतो, अशी शक्यता गृहीत धरून खबरदारीचा उपाय म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीवर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ आणि इतर संबंधित कायद्यांनुसार कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा पोलीस प्रशासनाकडून देण्यात आला आहे.



# 'काँग्रेस'चा पराभव हा दीर्घकाळ चाललेल्या दुर्लक्षाचा परिणाम

## 'भाजपा'चा महाविजय : कारणे, परिणाम आणि पुढची दिशा

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी -**

सोलापूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने मिळवलेला ८७ जागांचा अभूतपूर्व विजय आणि काँग्रेससारख्या राष्ट्रीय पारंपरिक पक्षाची ऐतिहासिक घसरण यामुळे सोलापूरच्या राजकारणाला नवे वळण मिळाले आहे. 'काँग्रेस'च्या शीर्षस्थ नेत्यांकडून दीर्घकाळ चाललेल्या दुर्लक्षामुळे 'काँग्रेस'ला पराभवाला सामोरे जावे लागले. तर इकडे 'भाजपा'च्या महाविजयच्या मागे अनेक कारणे असून त्याचा परिणाम निकालावर झाला आहे. आता भाजपाला पक्षांतर्गत कुरघोड्याऐवजी लोकहिताच्या कामांना प्राधान्य देत पुढची दिशा ठरविण्याची गरज आहे. दरम्यान, या निकालाच्या अनुषंगाने सोलापूरकरांच्या मनात निर्माण झालेले काही प्रश्न आणि त्यासंदर्भातची उत्तरे खास दैनिक 'सोलापूर तरुण भारत'च्या वाचकांसाठी...

**प्रश्न १ : सोलापूर महापालिकेतील भाजपाचा ८७ जागांचा विजय कसा पाहता?**

**उत्तर** हा विजय आकड्यांच्या पलीकडचा आहे. हा केवळ सत्ता टिकवण्याचा नाही, तर जनतेने भाजपाच्या राजकारणावर टाकलेला विश्वास आहे. २९ वर्षांत २६ जागांवरून ८७ जागांपर्यंतची झेप म्हणजे संघटन, नेतृत्व आणि सातत्याचा परिपाक आहे.

**प्रश्न २ : काँग्रेसची २९ वर्षात ३२ वरुन २ जागांपर्यंत घसरण का झाली?**

**उत्तर** काँग्रेसचा पराभव हा एका निवडणुकीचा नाही, तर दीर्घकाळ चाललेल्या दुर्लक्षाचा परिणाम आहे. संघटनात्मक मरगळ, नव्या मतदारांशी संवादाचा अभाव आणि बदलत्या सामाजिक वास्तवाचा अंदाज न आल्याने काँग्रेस राजकीयदृष्ट्या मागे पडली.

**प्रश्न ३ : प्रशासकीय राजवटीचा या निकालावर किती प्रभाव पडला?**

**उत्तर** तीन वर्षे दहा महिन्यांची प्रशासकीय राजवट हा निर्णायक मुद्दा ठरला. 'निवडून दिलेली सत्ता हवी' ही भावना मतदारांत तीव्र होती. उशिरा का होईना भाजपाने ही भावना अचूक हेरली तर विरोधक तेवढे प्रभावी ठरले नाहीत.

**प्रश्न ४ : भाजपाच्या विजयामागील प्रमुख सूत्रे कोणती?**

**उत्तर** बूथस्तरावरील संघटन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मार्गदर्शन, स्थानिक नेतृत्वातील एकसूत्रता, पालकमंत्री जयकुमार गोरे यांची रणनीती, आ.देवेंद्र कोठे, आ.सचिन कल्याणशेट्टी यांचे परफेक्ट टाइमिंग, आ.विजयकुमार देशमुख, आ.सुभाष देशमुख यांची सावध भूमिका, स्पष्ट अजेंडा या गोष्टी महत्वाच्या ठरल्या.

**प्रश्न ५ : एमआयएम दुसऱ्या क्रमांकावर येणे कसे पाहता?**

**उत्तर** एमआयएमचा उदय हा सोलापूरच्या सामाजिक, राजकीय बदलांचा आरसा आहे. मात्र, भाजपाच्या तुलनेत तो मर्यादित प्रभाव आहे. काँग्रेसच्या पारंपरिक मतपेढ्यांवर एमआयएमने घातलेली धडक आहे.

**प्रश्न ६ : हा निकाल 'लाट' आहे की 'स्थायी बदल'?**

**उत्तर** हा निकाल लाटेचा नाही, तर मतदारांच्या मानसिकतेतील स्थायी बदलाचा आहे. सलग दोन निवडणुकांतील भाजपाचा वाढता आलेख हेच सिध्द करतो.

**प्रश्न ७ : काँग्रेस आणि अन्य विरोधकांसाठी हा निकाल काय संदेश देतो?**

**उत्तर** हा निकाल आत्मपरीक्षणाचा आहे. संघटना मजबूत करणे, स्थानिक प्रश्नांवर ठोस भूमिका घेणे आणि नव्या पिढीशी संवाद साधणे.... हे न केल्यास विरोधकांसमोर अस्तित्वाचा प्रश्न उभा राहू शकतो.

**प्रश्न ८ : भाजपासाठी पुढचे आव्हान काय आहे?**

**उत्तर** आव्हान सत्ता मिळवण्याचे नाही, तर विश्वास टिकवण्याचे आहे. अपेक्षा मोठ्या आहेत. कारभार पारदर्शक, लोकाभिमुख आणि विकासाभिमुख राहिला तरच हा जनादेश दीर्घकाळ टिकू शकतो.

**प्रश्न ९ : सोलापूरच्या राजकारणाचे पुढील पाच वर्षांचे चित्र कसे दिसते?**

**उत्तर** भाजपाचे वर्चस्व स्पष्ट आहे. मात्र, विरोधक पुन्हा उभे राहतात का? यावर राजकारणाची पुढील दिशा ठरेल. सध्या तरी सोलापूर भाजपाच्या प्रभावाखाली आहे.

**प्रश्न १० : हा निकाल एका ओळीत कसा मांडाल?**

**उत्तर** सोलापूरचा कौल म्हणजे राजकारणाची दिशा बदल आहे.

### निवडणूक निकाल अन्वयार्थ :

सोलापूर महापालिका निवडणुकीचा हा निकाल केवळ राजकीय बदलाचा नसून, शहराच्या राजकीय विचारसरणीतील बदल दर्शवणारा आहे. भाजपाला मिळालेला प्रचंड जनादेश हा संघटन, नेतृत्व, विकासाच्या अजेंड्याला मिळालेली मान्यता आहे. काँग्रेससह विरोधकांसाठी हा निकाल गंभीर आत्मपरीक्षणाचा इशारा आहे. मतदारांनी अपेक्षा स्पष्ट केल्या असून, त्यानुसार कारभार झाला तरच हा विश्वास टिकून राहील. येणाऱ्या पाच वर्षांत सोलापूरचे राजकारण नव्या दिशेने जाण्याची चिन्हे या निकालातून स्पष्ट दिसतात.

# सुट्टीनंतर कांद्याची आवक निम्म्याने घटली

## दरात सुधारणा नाही; शेतकरी चिंताग्रस्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ जानेवारी-**



मकर संक्रांती आणि ग्रामदैवत श्री शिवयोगी सिध्दरामेश्वर महाराजांच्या गड्डा यात्रेच्या पार्श्वभूमीवर सलग पाच दिवसांच्या सुट्टीनंतर सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत कांदा बाजार सुरु झाला. मात्र सुट्टीपूर्वीच्या तुलनेने कांद्याची आवक निम्म्याने घटली. दरम्यान, दरात सुधारणा नसल्याने शेतकरी चिंताग्रस्त असल्याचे दिसून आले. कांद्याचे कमाल दर २३०० रुपये प्रतिक्विंटलपर्यंत आहे. चांगल्या प्रतीचा लाल कांदा १७०० ते १८०० रुपये इतक्या कमी दराने विक्री होत आहे.

सोलापूरचे ग्रामदैवत श्रीशिवयोगी सिध्दरामेश्वर यात्रा आणि मकर संक्रांतीच्या अनुषंगाने सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथील कांदा बाजार सलग पाच दिवस बंद होता. शुक्रवारपासून परत एकदा कांदा लिलावाला सुरवात झाली. यावेळी ३६२ ट्रक कांद्याची आवक झाली होती. शनिवारी ३६७ ट्रक कांद्याची आवक झाली.

सुट्टीपूर्वी बाजारात दररोज ७०० ट्रक जवळपास आवक सुरु होती. सुट्टीनंतर आवक जवळपास निम्म्यावर आली आहे. आवक घटल्यानंतरही कांदा बाजारात मंदीचे सावट कायम आहे. गतआठवड्यात बाजार समितीच्या आवारात ६८१ ट्रक कांद्याची आवक झाली होती. यावेळी कमाल २४०० रुपये इतका दर मिळाला होता. आठवड्यानंतरही हाच दर मिळत आहे. सरासरी दरात मात्र शंभर रुपयांची सुधारणा झाली आहे.

### हरण्या कांदयाची आवक

पुढील महिन्यात बाजारात हरण्या कांद्याची आवक सुरु होणार आहे. यावेळी दरात आणखी घसरण होण्याची भीती आहे. कोलमडलेली कांद्याची निर्यात, देशांतर्गत बाजारातील घडलेली मागणी यामुळे चालू वर्षात कांदा उत्पादक मोठ्या नुकसानीत गेले आहे. दरम्यान, कांदा निर्यातीच्या बाबतीत सरकारने ठोस उपाययोजना न केल्यास परिस्थिती बिकट होणार असल्याचे तज्ज्ञांकडून सांगण्यात येत आहे.

# प्रभाग क्रमांक २२ मध्ये भाजपाचे पहिल्यांदाच चारही उमेदवार मोठ्या मताधिक्यांने विजयी

## किसन जाधव ठरले विजयाचे शिल्पकार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१८ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक २२ मध्ये भाजपाचे पहिल्यांदाच चारही उमेदवार मोठ्या मताधिक्यांनी विजयी झाले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा बालेकिल्ला म्हणून हा प्रभाग ओळखला जायचा. मात्र, किसन जाधव यांनी आपले सहकारी व समर्थकांसह भाजपात प्रवेश करुन याठिकाणी कमळ फुलविले. किसन जाधव हे विजयाचे शिल्पकार ठरले.

सोलापूर महापालिकेच्या एकूण २६ प्रभागातील एकूण १०२ जागांसाठी गुरुवार, दि.१५ जानेवारी रोजी मतदान तर शुक्रवार, दि.१६ जानेवारी रोजी मतमोजणी झाली. तब्बल नऊ वर्षांनी झालेल्या या निवडणुकीकडे अनेकांचे लक्ष लागून राहिले होते. निवडणूक जाहीर झाल्यापासून अनेक राजकीय घडामोडी घडत गेल्या. यादरम्यान किसन जाधव हे राष्ट्रवादीतून भाजपात डेरेदाखल झाले होते.



भारतीय जनता पार्टीने प्रभाग क्रमांक २२ मधून किसन जाधव, अंबिका गायकवाड, चैताली गायकवाड, दत्तात्रय नडगिरी यांना उमेदवारी दिली. भाजपाने टाकलेला विश्वास सार्थ ठरवित किसन जाधव व नागेश गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली या प्रभागातील पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिकांनी एकदिलाने निवडणुकीला सामोरे जात यश संपादन केले. याकामी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदारद्वय देवेंद्र कोठे, सचिन कल्याणशेट्टी यांची भरीव साथ लाभली.

# साहेबांच्या राष्ट्रवादीच्या तुतारीचा आवाज घुमलाच नाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ जानेवारी-**

लोकसभा व विधानसभा निवडणुकीत साहेबांच्या राष्ट्रवादीच्या तुतारीचा आवाज ज्याप्रमाणे घुमला त्याप्रमाणे सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत घुमलाच नाही. याकडे लक्ष वेधताना या पक्षाचे जिल्ह्यात खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या रुपाने एक खासदार तर आ.नारायण पाटील, आ.अभिजित पाटील, आ.उत्तमराव जानकर, आ.राजू खरे यांच्या रुपाने चार आमदार असून काहीच उपयोग झाला नाही का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांची अहिल्यादेवी होळकर घराण्याचे वंशज असलेले भुषणसिंह होळकर यांच्यासोबत काही सभा झाल्या. मात्र, पक्षाच्या चार आमदारांपैकी एकाही आमदारांचा शहरातील प्रचारात सहभाग दिसला नाही. भारतीय जनता पार्टीनंतर ताकदीचा पक्ष म्हणून राष्ट्रवादी शरद पवार गटाकडे पाहिले जाते. पण, सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत या पक्षाला भोपळाही फोडता आला नाही.

एक खासदार, चार आमदार यांनी पूर्ण ताकदीने या निवडणुकीत लक्ष दिले असते तर पक्षाच्या मोजक्याच का होईना उमेदवारांना विजय मिळविता आला असता. वास्तविक, मोहिते-पाटील यांना मानणारा वर्ग शहरात असतांना त्याचा वापर या निवडणुकीत का केला नाही? पक्षाच्या जेमतेम दहा उमेदवारांच्या विजयासाठी जिल्ह्यातीलच प्रमुखांनी जर योगदान दिले नाही. तर कोण देणार, असा सवाल कार्यकर्त्यांमधून उपस्थित केला जात आहे.

भाजपने साम, दाम, दंड व भेद या पैशांचा मोठ्या प्रमाणावर वापर झाल्याची चर्चा नागरिकांतून उघडपणे करण्यात येत आहे. वास्तविक पाहता भाजपावर जनतेत रोष असतांनाही त्यांचा प्रचंड विजय झाला आहे. निवडून येण्याच्या दृष्टीने सेटींगही लावले होते. लागलेल्या निकालावर शंका घेण्यासारखे आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे शहराध्यक्ष महेश गादेकर यांनी सांगितले.

# बी.पी.एड. प्रवेशासाठी ऑनलाईन नोंदणी सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील शारीरिक शिक्षण पदवी (बी.पी.एड.) अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ऑनलाईन सीईटी परीक्षेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.

या प्रक्रियेअंतर्गत १६ जानेवारीपासून ऑनलाईन अर्ज नोंदणीला सुरुवात झाली असून, इच्छुकांना दि. २ फेब्रुवारीपर्यंत अर्ज सादर करता येणार आहेत. एमएएच-बी.पी.एड. ऑनलाईन सीईटी परीक्षा ४ एप्रिल रोजी वि राज्यातील विविध केंद्रांवर घेतली जाणार आहे. यानंतर ५ ते ७ एप्रिल या कालावधीत उमेदवारांची शारीरिक क्षमता चाचणी ऑफलाईन पद्धतीने पार पडणार आहे. यंदा नोंदणीसाठी अपार आयडी अनिवार्य करण्यात आला आहे. ज्या उमेदवारांकडे हा आयडी नाही, त्यांनी तो डिजिलॉकरद्वारे त्वरित तयार करावा, असे आवाहन करण्यात आले.



# बालनाट्य स्पर्धेत ३९ संस्थांचा सहभाग

**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

सोलापूरः प्रौढ रंगभूमी जर भविष्यात सशक्त करायची असेल तर तिचा पाया भक्कम असावा लागतो आणि तो पाया म्हणजे 'बालरंगभूमी'. याच उदात्त विचाराने आणि बालकलाकारांच्या किलबिलाटाने सोलापूरचे हुतात्मा स्मृती मंदिर गजबजून गेले. २२ व्या महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन झाले.

पाखर संकुलच्या शुभांगी बुवा प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या, तर ज्येष्ठ कौतुक रंगकर्मी वनिता म्हैसकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने स्पर्धेचा शुभारंभ झाला. यावेळी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद उपनगरीय शाखेचे अध्यक्ष विजय साळुंके, परीक्षक देवेंद्र भिडे, अमृता जोगदेव व हेमंत संस्थांचे यांनी केले. गव्हाणे उपस्थित होते. उद्घाटक वनिता म्हैसकर यांनी, बालरंगभूमी अशीच वृद्धिंगत होत राहो, अशा शब्दांत बालरंगकर्मींना शुभेच्छा दिल्या. दादा साळुंके यांनी सहभागी ३९ शाळा व संस्थांचे कौतुक करत प्रौढ रंगभूमीचा खरा पाया बालरंगभूमी असून, ती सशक्त होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन केले.

या बालनाट्य स्पर्धेच्या निमित्ताने बालकांच्या अंगभूत कलागुणांचे दर्शन घडत आहे. बालकांनी सादर करीत असलेले नाट्य पाहताना पालकांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत असल्याचे दिसून येत आहे. कार्यक्रमांचे सूत्रसंचालन व समन्वय अमोल धाबळे यांनी केले. त्यांनी बालप्रेक्षकांसाठी प्रश्नमंजूषा घेत भेटवस्तू देण्याचा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. २१ जानेवारीपर्यंत चालणार असल्याचे सांगण्यात आले.

# दिग्गज नेत्यांचे वर्चस्व निघाले मोडीत

## कन्या, सून, मुलगा, नातलगांचा दारुण पराभव

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी -**

सोलापूर महापालिका निवडणुकीच्या रिंगणात आजी माजी नगरसेवकांसह मातब्बर आणि दिग्गज नेत्यांचे नातलग उभे ठाकले होते. मात्र महापालिकेत अनेक वर्षांपासून नगरसेवक राहिलेल्या नेत्यांची मक्तेदारी जनतेने मोडीत काढली आहे. राजकारणातून बाहेर फेकलेली आणि राजकारणात असतानाही यशाची खात्री नसलेले नेतेमंडळी निवडणुकीच्या तोंडावर पक्षप्रवेश केले. सत्तेचे वाटेकरी झाले. भाजपच्या यशाच्या लाटेत सहभागी होऊन विजय पदरी पाडण्यासाठी पक्ष बदलले. तरी पाटील, कोल्हे, बरडे, शेख, काळे, सपाटे, चंदनशिवे, यलगुलवार, पटेल, ताकमोगे या नेत्यांना जनतेने पराभवाची धूळ चारत महापालिकेतील यांची मक्तेदारीच मोडीत काढल्याचे चित्र या निवडणुकीत दिसून येत आहे.

महापालिका निवडणुकीत माजी महापौर संजय हेमगड्डी, अलका राठोड, मनोहर सपाटे, यु.एन. बेरिया, आरिफ शेख हे पाच माजी महापौर तर माजी उपमहापौर राजेश काळे, राजेंद्र कलंत्री, दिलीप कोल्हे, नाना काळे तसेच माजी सभागृहनेते सुरेश पाटील, श्रीनिवास करली यांचा पराभव झाला आहे. प्रभाग सातमध्ये पुरुषोत्तम बरडे यांच्या कन्येच्या पदरी अपयश. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राहिलेले बरडे यांचे नगरसेवकपदाचे स्वप्न साकार होऊ शकले नाही. यावेळी त्यांनी मुलगी उत्तरा बरडे भाजपमधून संधी घेत निवडणूक लढवली. अटीतटीच्या झालेल्या लढतीत उत्तरा बरडे हिचा ९१ मतांनी पराभव झाला.

माजी महापौर आरिफ शेख, माजी नगरसेवक तौफिक शेख व तौफिक शेख यांची पत्नी रोमेसा शेख यांना पराभवास सामोरे जावे लागले. काँग्रेसमधून आरिफ शेख तर शेख पती-पत्नी राष्ट्रवादी काँग्रेसमधून नशीब आजमावले. पण त्यांना यश आले नाही. यापूर्वी एमआयएमचे गटनेते असलेल्या तौफिक शेख यांचा पराभव एमआयएमच्या उमेदवारांकडूनच झाला आहे. उपमहापौर राजेश काळे व त्यांच्या पत्नी उषा काळे या दोघांनाही पराभवाचा झटका बसला आहे. शिवसेनेतून राजेश काळे हे प्रभाग २४ मधून तर उषा काळे या प्रभाग २६ मधून रिंगणात होत्या. पर दोघांनाही पराभवाला सामोरे जावे लागले.





सपाटे कुटुंबात माजी महापौर मनोहर सपाटे यांचा अपमानजनक पराभव पत्करावा लागला. तर प्रभाग सातमधून कडवी झुंज देत मनोरमा सपाटे या विजयी झाल्या आहेत. माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे व त्यांच्या पत्नी कविता चंदनशिवे या दोघांनाही पराभवा झटका बसला आहे. प्रभाग पाचमधून सलग तीनवेळा नगरसेवक असलेले आनंद चंदनशिवे पक्ष बदलून निवडणूक लढविली. प्रभाग चारमधून पत्नी कविता रिंगणात होत्या. पण दोघांच्या पदरी अपयश आले.

काँग्रेसचे माजी आमदार प्रकाश यलगुलवार यांची सून सीमा यलगुलवार प्रभाग १६ मधून तर त्यांचे दीर रवी यलगुलवार यांचा प्रभाग २६ मधून वैभव हत्तुरे आणि नागेश ताकमोगे यांच्यामध्ये लढत झाली. ताकमोगे शेवटच्या क्षणापर्यंत साम, दाम, दंड, भेद चा वापर करून जनतेने मने वळविण्याचा प्रयत्न केले. मात्र भाजपच्या लाटेमध्येही पराभवाला सामोरे जावे लागले. माजी आमदार दिलीप माने यांचे कट्टर समर्थक आणि विधानसभेपासून आमदार सुभाष देशमुख यांच्या जवळ गेलेले नागेश ताकमोगे यांचा पराभवविषयी तर्कवितर्क लढविले जात आहेत. सोलापुरात एमआयएम पक्षाचे नेतृत्व करणारे शौकत पठाण यांची मेव्हणी फिरदोस पटेल ह्या एमआयएम पक्षाकडून प्रभाग १६ मधून निवडणूक लढविले. भाजपचे कल्पना कदम यांनी त्यांचा पराभव केला. घरातच पक्षाचे नेतृत्व असताना त्यांच्या पदरी पराभव पडले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी १३३१

**येर कलशींचें येरी । रिचविजे जयापरी ।**
**आपणपें तया हरी । दिधलें तैसें ।।**

भगवान श्रीकृष्णा अर्जुनाला क्षेत्र-क्षेत्रज्ञ, ज्ञान-अज्ञान, ज्ञेय अशा विविध संज्ञा काळजीपुर्वक समजावून सांगत आहेत. अर्जुनही सर्व मन लावुन ऐकत आहे. दोघांतील हा संवाद संजय ऐकुन राजा धृतराष्ट्राला सांगत आहे. भगवंतांनी आतापर्यंत आपल्याकडील ज्ञान अर्जुनाला किती सुलभपणे व पुर्णपणे दिले हे सांगतांना संजय म्हणतो, येर कलशींचें येरी । रिचविजे जयापरी । आपणपें तया हरी । दिधलें तैसें ।। अर्थात, एका माठातील भरलेले पाणी दुसऱ्या रिक्त माठात जसे रिचविले जाते, तसे भगवंत आपल्यातील ज्ञान अर्जुनाच्या डोक्यात, मनात रिचवित आहेत, संजय अतीशय सोप्या शब्दात सांगुन गेला आहे कि, भरलेल्या माठातील पाणी दुसऱ्या रिकाम्या माठात रिचविले. तसे ज्ञान भगवंतांनी अर्जुनाला दिले. अर्जुन फार भाग्यशाली आहे, कारण एवढे अगाध ज्ञान, एवढ्या सहजतेने त्याला मिळत आहे. संजय स्वत:लाही भाग्यशाली समजतो आहे कारण घरबसल्या महर्षी व्यासांच्या कृपेने त्याला हे सर्व प्राप्त होत आहे. पण त्याला थोडे दु:खही वाटत आहे. आपण ज्या राजाचे नोकर आहोत तो राजा मात्र या सुखापासुन दुर आहे. त्याला हे सुख दिले तरी तो पुत्रमोहापोटी हे सुख स्विकारायला तयार नाही. एवढे ज्ञान मिळवुनही अर्जुन तृप्त झाल्याचे जाणवत नव्हता. दिव्यावरील काजळी काढल्यानंतर दिवा आणखी मोठा होतो, प्रकाशमान होतो, त्याप्रमाणे श्रवणाने अर्जुनाच्या अंत:करणावरील काजळी निघुन, ऐकण्याची त्याची मानसीकता आणखी वाढली होती.



संजय ही सर्व कथा जेवढ्या उत्सुकतेने राजा धृतराष्ट्राला सांगत आहे, अगदी त्याप्रमाणे माऊली ही कथा आपणाला सांगण्यास उत्सुक आहेत. आपण ही कथा ऐकतांना कोणत्याही परीस्थितीत धृतराष्ट्राची भुमिका न घेता, अर्जुनाची भुमीका घ्यायला हवी. माऊली आपल्या मातृभाषेत ही कथा अतीशय रसाळपणे संगण्याची हमी देत आहेत. माझे मराठी बोल कोणत्याही भाषेपेक्षा निश्चीतच रसाळ, अर्थभरीत असतील हा माऊलीचा विश्वास आहे. माऊलींप्रमाणे आम्हांलाही आमच्या मातृभाषेवर विश्वास व अभिमान असला पाहीजे. हा विश्वास व अभिमान आपल्यांत येण्यासाठी मातृभाषा परीपुर्णपणे आम्हांला शिकावी लागेल. माऊलींची ज्ञानेश्वरी, तुकोबारायांची गाथा, संत एकनाथांचे भागवत, समर्थांचा दासबोध आपणाला हा आत्मविश्वास मिळवुन देतील, यांत शंका नाही. या ग्रंथाच्या सहवासात राहण्याची, त्याचे वाचन करुन अनुभव घेण्याची आपली मानसीक तयारी असली पाहीजे. माऊली सारखा लडीवाळपणा, नम्रपणा, आपुलकी आपल्यात आली तर आमची मातृभाषा किती वजनदार आहे, याची प्रचीती आपणाला येईल. मराठी भाषेतुन हि कथा अंत्यत रसाळपणे सांगण्यासाठी माऊलींना त्यांच्या सद्गुरु निवृत्तीनाथांचा जसा आशीर्वाद आहे, तसा आपणांलाही कथा समजण्यासाठी माऊलींचा आशीर्वाद आहे, असे गृहीत धरुन मन:पुर्वक या ओव्यांचा सहवासात राहु या. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : सोमवार, दि. १९ जानेवारी २०२६
विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - माघ. शु. प्रतिपदा
ऋतु - हेमंत ।
नक्षत्र- उत्तरपाढा (११.५१)
योग - वज्र (२०.४४)
करण - किंस्तुघ्न (१३.५०)
राहू काल : सोमवार : स. ७.३० ते ९.००

दिनविशेष :
१९४२: दुसरे महायुद्ध - जपानी सैन्याने ब्रह्मदेशवर आक्रमण केले.
१९४९: पुणे नगरपालिका व उपनगरपालिका विसर्जित होऊन पुणे महानगरपालिका स्थापन झाली.
१९४९: क्यूबाने इस्त्रायला मान्यता दिली.
१९५४: कोयना धरणाच्या जलविद्युत प्रकल्पाचे भूमिपूजन.




## विद्यार्थ्यांनी स्पर्धा स्वत:शी करावी :डॉ.कांकरिया

**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

आजच्या वेगाने बदलणाऱ्या स्पर्धात्मक युगात यशस्वी होण्यासाठी आत्मविश्वास, परस्पर सहकार्य आणि सकारात्मक दृष्टिकोन अत्यावश्यक आहे. विद्यार्थ्यांनी इतरांशी नव्हे, तर स्वत:शी स्पर्धा करीत सातत्याने स्वत:चा विकास साधावा, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलसचिव व प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया यांनी केले.

वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् अँड सायन्सच्या ६२ व्या आणि ६३ व्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपप्राचार्य प्रा. डॉ. राजशेखर हिप्परगी यांनी प्रास्ताविक केले, तर उपप्राचार्य प्रा. डॉ. मनोहर जोशी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. वार्षिक अहवालाचे वाचन प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांनी केले. गणित विषयात प्रतिवर्षी प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला सुवर्णपदक देण्याची परंपरा जपल्याबद्दल डॉ. जयवंत अनंतपूर यांचा सत्कार करण्यात आला. उत्कृष्ट कलाकार म्हणून प्रणिती चांगभले, समृद्धी भोसले, अनिकेत गायकवाड आणि रोहन सर्वगोड, तर आदर्श विद्यार्थी म्हणून नंदिनी पाटील व नागेश सानसाखळे यांना गौरविण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. सत्यजित शहा, अश्विन बोंदार्डे, परीक्षा नियंत्रक प्रा. डॉ. सयाजीराव गायकवाड, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे उपस्थित होते. पारितोषिकांचे वाचन प्रा. निकिता पोटाबत्ती, प्रा .श्रद्धा जाधव, प्रा.संतोष रेळेकर, क्रीडा शिक्षण राहुल हजारे आणि डॉ. अभय जाधव यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. अर्चना इंजल व डॉ. अंजना गायकवाड यांनी केले, तर आभार प्रा. डॉ. आनंद महाजन यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता श्रद्धा रोडगे यांच्या पसायदानाने झाली.

# पत्नी, मुलीचा खून; प्रशांत वट्टमवार यास जन्मठेपेची शिक्षा

### सरकार पक्षातर्फे ॲड. सारंग वांगीकर यांनी पाहिले काम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१८ जानेवारी-**

तालुक्यातील मौजे रोपळे येथील आरोपी प्रशांत वट्टमवार याने त्याची पत्नी वृषाली व मुलगी ज्ञानेश्वरी यांचा खून केल्याप्रकरणी दोषी धरुन त्यास जन्मठेपेची तसेच दहा हजार रुपये दंडाची शिक्षा येथील अति.जिल्हा व सत्र न्यायाधीश ओंकार देशमुख यांनी सुनावली.

या खून खटल्याची थोडक्यात हकीकत अशी की, यातील आरोपी हा मौजे गेपळे, ता. पंढरपुर येथील रहिवाशी असून बचत गटाचे व फायनान्यचे कर्जफेड करण्याकरिता माहेरहून पैसे आणण्याकरिता पत्नी वृषाली हिला त्रास देत होता. तसेच तिच्या चरित्रावर संशय घेत होता. या कारणावरून २१ जुलै २०१६ रोजी राहते घरी पत्नी वृषाली झोपेत असताना आरोपीने लोखंडी पाईपने डोक्यात मारुन तिला गंभीर जखमी करुन तिचा खून केला व मुलगी ज्ञानेश्वरी (वय ५ ) हिने सदरची घटना पाहिलेली असल्याने तिचेही डोक्यात पाईपने मारुन तोंड दाबून तिला जीवे ठार मारले.

या बावत आरोपीविरुध्द पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आलेला होता. सदर गुन्हयाचा तपास पो. नि. के.के.खराडे यांनी करुन आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केलेले होते.

विशेष म्हणजे घटना घडल्यानंतर आरोपी जालना-पंढरपूर गाडीने पंढरपूर येथे येवून पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनला त्याने त्याचे पत्नी व मुलीचा खून केल्याचे सांगीतले होते. यात सरकारपक्षातर्फे एकुण १८ साक्षीदारांच्या साक्षी नोंदविण्यात आल्या. त्यामधील पंच साक्षीदार रोहिणी पाटील, फिर्यादी मयत वृषालीचा भाऊ मुकुंद पारसवार, विजय पारसवार, आरोपीचा चुलता दत्तात्रय वट्टम वार, कंडक्टर शिकुजी तोटेवाड, पो.ह. गणेश इंगोले, ए.एस.आय.धनाजी माळी, पो.नाईक अशोक भोसले, शरद कदम, सरपंच दिनकर कदम शवविच्छेदन करणा- या डॉ.स्वाती बोधले, तसेच तपासी अधिकारी पो.नि. कृष्णदेव खराडे यांच्या साक्षी महत्वपूर्ण ठरल्या.

आरोपीतर्फे झालेली घटना खोटी असून घटनेच्यावेळी आरोपीच्या घरी दरोडा पडलेला होता व त्यावेळी आरोपी फिरायला गेला होता. तसेच मयत वृपाली हिने माहेरील प्रॉपर्टीत हक्क सांगत होती त्याचा राग तिचे भावांना होता व याकारणावरुन तिचे भावांनी मारेकरी घालून खून केला आहे. तसेच घटनास्थळाजवळील साक्षीदार तपासले गेले नाहीत त्यामुळे घटनेबाबत संशय निर्माण होतो व त्याचा फायदा आरोपीला द्यावा असा युक्तीवाद आरोपी पक्षाने केला. परंतु, सरकारपक्षातर्फे सदर गुन्हयामध्ये आरोपीने पोलीस स्टेशनमध्ये जावून ठाणे अंमलदार याला त्याने त्याचे पत्नीचा व मुलीचा खून केल्याचे सांगीतले आहे. तो या केसमधील तपासी अधिकारी नसल्याने त्याचे सांगणे एकप्रकारे कबूली जवाव आहे. तसेच यातील जालना-पंढरपूर गाडीचा कंडक्टर याने घटनेच्या दिवशी दिलेले प्रवासाचे तिकीट व त्याने आरोपीला साक्षी दरम्यान ओळखली. तसेच घटनेच्या आदल्या दिवशी मयत वृषाली हिने चुलते दत्तात्रय यांना आरोपी तिचे सोबत वादविवाद करत आहे व घरी येण्याबाबत सांगीतले. या बरोबरच फिर्यादी व इतर पोलीस अधिकारी यांच्या साक्षी तसेच घटनेच्या आदल्यादिवशी आरोपीने पोलीस स्टेशनला फोन करुन त्याचे व पत्नीचा वाद होत असलेवावत केलेली फोनवरील तकार त्याप्रमाणे त्यांना समजावण्या करिता गेलेले पोलीस अधिकारी, वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वाती बोधले यांच्या झालेल्या साक्षीवरुन व एकंदरीत परिस्थितीजन्य पुराव्यावरुन आरोपी घटनास्थळी हजर होता ही बाब सरकारपक्षातर्फे न्यायालयासमोर मर्व संशयाचे पलीकडे जावून सिध्द करण्यात आली. यातील तोंडी पुरावा व वैदयकीय पुरावा एकमेकांशी सुसंगत आहे. त्यामुळे आरोपीस अशा केसमध्ये खोट्याने गुंतविण्याचे कारण नाही असा युक्तिवाद सरकारपक्षा तर्फे सरकारी वकील सारंग वांगीकर यांनी केला. त्याप्रमाणे झालेला एकंदरीत पुरावा व दोषारोपपत्रातील कागदपत्रे याचे अवलोकन करून आरोपीस भादवि ३०२ करीता दोषी धरून जन्मठेप व दहा हजार रूपये दंड अशी शिक्षा सुनावली. यात सरकारपक्षातर्फे ॲड. सारंग वांगीकर यांनी काम पाहिले तर पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनतर्फे पर्यवेक्षण अधिकारी म्हणुन पोलीस निरीक्षक तय्युब मुजावर, कोर्ट पैरवी म्हणून म. सहा. पोलीस फौजदार अनिता नागराळे या कार्यरत होत्या.



## अरुण धुमाळ संपादित 'श्यामची आई' पुस्तकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

अ.भा.साने गुरुजी कथामाला अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून बेळगाव येथे पार पडलेल्या ५८ व्या राष्ट्रीय वार्षिक अधिवेशनात, अरुण धुमाळ संपादित श्यामची आई पुस्तकाचा प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला.

या पुस्तकाचे पुनर्लेखन, सोलापूरच्या प्रबोधन भारती प्रकाशनने केले आहे.कथामालेचे राष्ट्रीय अध्यक्ष हसन देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या अधिवेशनासाठी, डॉ. प्रा.आनंद मेणसे, पी.एस्.आय. परशुराम पुजारी, राजाभाऊ पाटील, लालासाहेब पाटील, शामराव कराळे,डॉ. गजानन कोटेवार, राष्ट्रीय प्रमुख कार्यवाह सुनील पुजारी, कोषाध्यक्ष प्रा. अशोक म्हमाणे इ. मान्यवरांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थित होती.

'खरा तो एकची धर्म' प्रार्थना गायनानंतर, आकाश चौगुले (बेळगाव) यांच्या हस्ते मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले.डॉ.कोटेवार यांनी कथामालेचा उद्देश स्पष्ट करुन सांगितला. या कार्यक्रमासाठी सोलापूर कथामालेचे अध्यक्ष अशोक खानापुरे,सदस्य रंगसिद्ध दसाडे, गंगाधर घोंगडे, सुरेंद्र पत्की,राजू बिराजदार, महादेव बाळगी उपस्थित होते. सुनील पुजारी यांनी प्रास्ताविक केले. नीला आपटे, सूत्रसंचालन कृष्णा शहापूरक यांनी केले.

## ॲमेझॉन इंडियाचा ग्रेट रिपब्लीक सेल

**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

ॲमेझॉन इंडियाचा फार प्रतिक्षेत असणारा ग्रेट रिपब्लीक डे सेल २०२६, १६ जानेवारीपासून रात्री १२ वाजता लाईव्ह सुरु झाला आहे. ग्राहक ॲपल, सॅमसंग, वनप्लस, सोनी, एलजी, स्केचर्स, लॉरेल पॅरिस, आयक्यूओओ, शाओमी, क्युबा, टीसीएल, एचपी, आणि बोट यांसारख्या अनेक अग्रेसर ब्रँड्सची उत्पादने शोधू शकतात. ट्रेंडिंग डील्स, ८ पीएम डील्स, सर्वोत्तम ७७ रिपब्लिक डील्स आणि सर्वोत्तम १०० डील्स यांसारख्या निवडक डील फॉरमॅटमधूनही ग्राहक खरेदी करू शकतात. ॲमेझॉन इंडियाचे उपाध्यक्ष सौरभ श्रीवास्तव म्हणाले की, पीक कापणीच्या उत्सवाच्या आनंदापासून ते प्रजासत्ताक दिनाच्या अभिमानापर्यंत, अग्रेसर ब्रँड्सच्या उत्सवासाठी लागणाऱ्या आवश्यक वस्तूंची मोठ्या प्रमाणात निवड आणि आकर्षक नवीन उत्पादने एकाच ठिकाणी उपलब्ध करून देऊन, उत्सव अधिक अर्थपूर्ण बनवणे हे ॲमेझॉन इंडियाच ध्येय आहे.

## पद्मशाली पुरोहित संघ वेदपाठशाळेचा वर्धापन दिन उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

पूर्व भागातील पद्मशाली पुरोहित संघ वेदपाठशाळेचा ९१वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

वर्धापनदिनानिमित्त संघाच्यावतीने समाजात एकोपा नांदून सर्वांनी आनंदाने राहण्यासाठी संकल्प करून नवग्रह पूजा, होमहवन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना उत्तम ज्ञान प्राप्ती साठी व प्रज्ञाविवर्धनासठी सरस्वती यज्ञ करण्यात आले. याशिवाय खाऊ वाटपाचा कार्यक्रमदेखील झाला. कार्यक्रमाचे पौरोहित्य ब्रह्मश्री प्रभाकर गाजर्ला, सतीश पोला, राजू कोडम यांनी केले.

कार्यक्रमाचे यजमानपद अध्यक्ष ब्रह्मश्री श्रीनिवास म्याडम यांनी भुषविले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सचिव ब्रह्मश्री आत्मराम चिप्पा आणि सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले. संघाचे विश्वस्त वेणूगोपाळ म्याना, श्रीनिवास गाजूल, नरेंद्र श्रीमल आणि इतर मान्यवरांची मार्गदर्शनपर भाषणे झाली.

कार्यक्रमाच्या दिवशी शेकडो पुरोहितांनी मोठ्या संख्येने उपस्थित दर्शवून आपल्या पौरोहित्य परंपरा वृध्दिंगत होवून समाजात धर्म, परंपरा, धार्मिक, अध्यात्मिक ज्ञानाचा प्रसार करत धर्मकर्तव्य यथायोग्य करण्याचा निश्चय केला. संघाच्यावतीने उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ब्रह्मश्री हरी नल्ला, राघवेंद्र आरकाल, मनोहर जडल, नागदेव म्याना, नागशय्या वग्गू, भानुचंद्र चिप्पा यांचा विशेष सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन ब्रह्मश्री हरी नल्ला यांनी केले. सहसचिव व्यंकटेश श्रीनिवास जिल्ला यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी पुरोहित अविनाश श्रीमल, नागेश अंकम, व्यंकटेश वग्गू यांनी परिश्रम घेतले.

# सुशीला गायकवाड यांची पुण्यतिथी साजरी

### रक्तदान शिबिरास उत्फूर्त सहभाग

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि १८ जानेवारी-

केगाव येथील भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयात कै. सुशीलाताई गायकवाड यांची २५ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष रवींद्र डी. गायकवाड, सचिवा अनामिका रवींद्र गायकवाड आणि विश्वस्त निरज जरीवाला, सुष्मिता गायकवाड, नोहा गायकवाड तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल देशमाने यांचे हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.



या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. या रक्तदान शिबिर अश्विनी मेडिकल कॉलेज व रक्तपेढीला रक्तदान करण्यात आले. या शिबिरास महाविद्यालयाचे डॉ. संजीव भोसले प्रो. अझरुद्दीन फेरमपल्ली श्रीनिवास जोग, रजिस्टर निवास शिंदे, एन.एस.एस प्रमुख प्रो. जी. एस. होनमाने, प्रो. शेखर धनवले, प्रो.अमित वडवेराव, डॉ. सचिन गाडे, प्रो. प्रभाकर ढवळे, प्रो. विजयकुमार कोळकुरे, प्रकाश केसरी, प्रो. नीलम बंडा, प्रो. मीनल एबल आदी या कार्यक्रमास उपस्थित होते.

या कार्यक्रमाप्रसंगी अश्विनी मेडिकल कॉलेज व रक्तपेढी यांच्या जनसंपर्क अधिकारी जगदीश नलवार यांनी सध्या रक्ताची कमतरता असल्यामुळे कै. सुशीला गायकवाड यांच्या २५व्या.पुण्यतिथीनिमित्त गरजूंना रक्तपुरवठा होईल आणि जास्तीत जास्त लोकांना मदत होईल. त्यामुळे महाविद्यालयाचे आयोजनाबद्दल संस्थेचे रक्तदान शिबिराबद्दल आभार मानले. अश्विनी मेडिकल कॉलेज व रक्तपेढीचे डॉ. सायली निजवंती, विजय सारंगमठ, स्वराली, अब्बू बंडगर, वर्षा वाघमारे तसेच महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर, विद्यार्थी विद्यार्थिनी या कार्यक्रमात सहभागी नोंदवला.



## मास्टरमाईंड स्पर्धेत 'वालचंद'चे यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्सच्या व्यवस्थापन विभाग व श्री. विद्या इन्फोटेक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरमहाविद्यालयीन 'मास्टरमाईंड-२०२५' या स्पर्धेअंतर्गत १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या 'क्षमता चाचणी' परीक्षेत वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स कनिष्ठ महाविद्यालयाच्या विशांत विरकुमार गंधगे याने द्वितीय तर कांचन परशुराम जाधव हिने तृतीय स्थान पटकाविले. त्यांना रोख २ व ३ हजार व प्रमाणपत्र असे पारितोषिक मिळाले. या स्पर्धेत शहरातील विविध महाविद्यालयांतील २५२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. वस्तुनिष्ठ पद्धतीने घेण्यात आलेल्या या स्पर्धेत वालचंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या ६५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत उत्कृष्ट कामगिरी केली. प्राचार्य डॉ. संतोष कोटी, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे तसेच पर्यवेक्षक डॉ. जिवराज कस्तुरे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या स्पर्धे साठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे सह-समन्वयक विजय वाघमोडे व धनंजय जिडगीकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# हरिभाई देवकरण प्रशाला व महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

हरीभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे ९४ वे स्नेहसंमेलन व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ धनंजय माने व कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉक्टर विजय कानेटकर उपस्थित होते यांनी प्रथम विज्ञान व कला प्रदर्शनास येथे भेट दिली. त्यानंतर मुळे हॉल येथे सरस्वती पूजनाने तसेच राष्ट्रमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद व चार हुतात्मे यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड यांनी केले. प्रमुख पाहुण्यांच्या परिचय कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक अप्पासाहेब राऊत यांनी केला. प्रमुख पाहुणे ज्येष्ठ विधीज्ञ धनंजय माने यांचा सत्कार प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका दीपा फाटक यांनी केला. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. विजय कानेटकर यांचा सत्कार मुख्याध्यापिका दीपा फाटक यांनी केला.

प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे कार्याध्यक्ष तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचा सत्कार करण्यात आला. प्रशाला स्नेहसंमेलनचे कार्याध्यक्षा श्रीमती बोळकवठेकर तर कनिष्ठ महाविद्यालयाचा स्नेहसंमेलन अहवालचे वाचन कनिष्ठ महाविद्यालयाचे कार्याध्यक्ष चंद्रकांत जाधव यांनी केले.वार्षिक अहवाल प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्या तथा मुख्याध्यापिका दीपा पाटक यांनी सादर केला. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतातून शाळेमुळे आमचे जीवन घडले, शाळेने भरभरून दिले आहे या शाळेने मला घडवले तसेच शिक्षकांच्या आठवणींना उजाळा त्यांनी दिला तसेच शाळेतील सहली आठवतात.शिक्षकांचे महत्त्व एका उदाहरणावरून स्पष्ट केले. भरपूर शिका व मोठे व्हा मोबाईलचा उपवास करा, वाचन करा असा विद्यार्थ्यांना संदेश दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. विजय कानेटकर यांनी मी एक सर्व साधारण शाळेचा माजी विद्यार्थी म्हणून आहे.मंगळवेढेकर सरांचे एक उदाहरण देऊन आठवण जागी केली. मोबाईल पासून दूर रहा. असा संदेश दिला तसेच शिक्षकांना व आई वडीलांना विसरु नका. आशिर्वाद घ्या शाळेला विसरु नका असे मत व्यक्त केले. या नंतर पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी इंद्रधनुष्य म्हणजेच सप्तरंग हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाले. कार्यक्रमासाठी माजी मुख्याध्यापक, माझी माझी प्राचार्य उपप्राचार्य, माझी पर्यवेक्षक, शिक्षक, पालक हितचिंतक उपस्थित होते. कार्यक्रमासाठी मार्गदर्शक म्हणून शिक्षण प्रसारक मंडळी पुणे च्या सोलापूर येथील शाळा समिती अध्यक्ष माननीय राजेश पटवर्धन यांचे विशेष सहकार्य लाभले. सूत्रसंचालन वैभव दुध्याळ यांनी तर सूत्रसंचालन श्रीमती जगताप मॅडम यांनी केले उपस्थित सर्वांचे आभार उपमुख्याध्यापक रवींद्र पानसरे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता सावनी कुलकर्णी यांच्या पसायदानाने झाली.



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### सदाशिवनगर येथे सखी महिला मंडळाचा हळदी कुंकू

**माळशिरस, दि. १८ जानेवारी-**

सदाशिवनगर ता.माळशिरस येथील सखी महिला मंडळाचा मकर संक्रांतीच्या निमित्ताने हळदी कुंकू व वाण वाटपाचा कार्यक्रम सोलापूर जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या व शिवप्रसाद वुमन अर्बन बँकेच्या चेअरमन ऋतुजा शरद मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला यावेळी सखी महिला मंडळाच्या वंदना दीक्षित, सुनीता सोनटक्के, अनिता सुझे, सुजाता पंडित, सारिका भोसले, भाग्यश्री राजमाने, सुनीता राजमाने, अर्चना सूर्यवंशी, मीनाक्षी माने, जयश्री बाळगे, सुनंदा इनामदार, विद्या नाळे, नीता रणवरे, प्रिती रणवरे, अमृता सोनटक्के, साक्षी सुझे - ढवळसकर उपस्थित होत्या. संक्रांतीचा कार्यक्रम पंधरा दिवस सुरू असतो महिला एकमेकींना हळदीकुंकू व वाण भेट देत असतात भेटीगाटीतून एकमेकींच्या विचाराची देवाण-घेवाण होत असते महिलांना एकत्र आणणारा महिलांचा आवडता मकर संक्रांत सण असतो अशा सणाचे अवचित्य साधून महिला एकत्र येऊन साजरा करीत असतात.

### ज्ञानेश्वर दुधाणे यांचा राज्यस्तरीय वाद्यवादन स्पर्धेत प्रथम क्रमांक

**करकंब, दि. १८ जानेवारी-**




महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने शिक्षक अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा यासाठी सोलापूर जिल्हा परिषदेच्यावतीने तालुका जिल्हा विभागीय आणि राज्यस्तरावर विविध प्रकारच्या ४२ स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.त्यामध्ये वाद्य वादन (पखवाज) स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जळोली तालुका पंढरपूर व करकंब गावचे सुपुत्र आदर्श शिक्षक ज्ञानेश्वर दुधाणे यांनी विभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवल्याने त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली होती.त्यामध्ये महाराष्ट्रातून एकूण ४० स्पर्धक सहभागी झाले होते.ज्ञानेश्वर दुधाणे यांनी महाराष्ट्र राज्य स्तरीय पखवाज वादन स्पर्धेत पखवाजवादन करत प्रथम क्रमांक पटकावला.याबद्दल त्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरवीण्यात येणार असल्याचे प्रशासनाच्यावतीने सांगण्यात आले. त्यांना त्रिगुण पुजारी यांनी सुंदर लेहला साथ केली.ज्ञानेश्वर दुधाणे यांनी सामाजिक बांधिलकी म्हणून करकंब येथे पर्यावरण रक्षणासाठी करकंब गावच्या लेकीचं झाड अभियान टीमच्या माध्यमातून १००० वृक्षांचे संगोपन करत आहेत.स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करण्यासाठी एकलव्य अभ्यासिका सुरू आहे.भारतभर मोठमोठ्या संगीत महोत्सवामध्ये त्यांनी आंतरराष्ट्रीय किर्तीचे ख्यातनाम गायक पं.शौनक अभिषेकी व इतर सर्व प्रसिद्ध कलाकारांना पखवाज साथसंगत केली आहे.शैक्षणिक क्षेत्रातही उल्लेखनीय काम करत असून शाळेतही दर्जेदार शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहेत.या राज्यस्तरीय यशाबद्दल त्यांचे गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे,केंद्रप्रमुख पा.वा. जाधव तसेच शिक्षक, शिक्षिका शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले.



### सुलाखे हायस्कूल येथे गणित प्राविण्य परीक्षा

**बार्शी, दि. १८ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्य गणित अध्यापक मंडळामार्फत इयत्ता ५ वी व ८ वी मधील विद्यार्थ्यांसाठी घेतली जाणारी गणित प्राविण्य परीक्षा सुलाखे हायस्कूल बार्शी या केंद्रावर पार पडली. इयत्ता पाचवी व आठवीचे २७० विद्यार्थी तालुक्यातून प्राविण्य परीक्षेसाठी उपस्थित होते. सदर परीक्षा केंद्रास परीक्षा सुरु असताना बार्शी तालुका गणित अध्यापक मंडळाचे अध्यक्ष शंकर आगलावे, उपाध्यक्ष संदेश घाडगे, सचिव सचिन झाडबुके, सहसचिव जैनुद्दीन शेख, राजू शेख, विकास सुतार, पवार मॅडम तसेच सोलापूर जिल्हा गणित मंडळाचे उपाध्यक्ष संतोष साळुंखे यांनी भेट दिली. ही परीक्षा पार पाडण्यासाठी परीक्षा प्रमुख म्हणून सूर्यकांत चोरमले यांनी व्यवस्थित नियोजन केले. प्राविण्य परीक्षा केंद्रासाठी हायस्कूलचे प्राचार्य स्वामीराव हिरोळीकर यांचे सहकार्य लाभले. परीक्षा यशस्वी करण्यासाठी सर्व बार्शी तालुका गणित मंडळ सदस्यांनी परिश्रम घेतले.



### लोकमंगल नागरी पतसंस्थेला राज्यस्तरीय आदर्श सहकारी संस्था पुरस्कार

**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**

सहकार क्षेत्रात उत्कृष्ट, विश्वासार्ह व समाजोपयोगी कार्य केल्याबद्दल लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर यांना राज्यस्तरीय आदर्श सहकारी संस्था पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा सन्मान कोल्हापूर येथे मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या समारंभाला डॉ. विठ्ठल जाधव, डॉ. योगेशकुमार गुप्ता, पद्मश्री उदय देशपांडे, अशोक रोकडे, अ‍ॅड. अतुल वनारसे, डॉ. सदानंद सदाशिव, सुवर्णा पत्की आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आचार्य सी.ए. डॉ. शंकर अंदाणी, संचालक सीता-साई ट्रस्ट, मोहन गावकर-जाइंट सेक्रेटरी गोवा विधनभवण उपस्थित होते. सोहळ्यात लोकमंगल पतसंस्थेच्या वतीने पुरस्कार स्वीकारण्यासाठी तज्ञ संचालक विठ्ठल ढेकळे, वरिष्ठ अधिकारी अतुल जगदाळे, विभागीय अधिकारी रेवण सिद्धापुरे, शाखाधिकारी कुंदन ताकमोगे व अतुल काळे हे उपस्थित होते.

# ‘मी विधवा नव्हे, मी स्त्री’: संगमनेरमध्ये विधवा महिलांचाही ‘हळदी-कुंकू’ सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग,दि.१८ जानेवारी-**

ती विधवा आहे म्हणून तिने मंगल कार्यात सहभागी होऊ नये, या जुनाट आणि अनिष्ट प्रथेला संगमनेर (ता.बार्शी) येथे मूठमाती देण्यात आली. मकर संक्रांतीचे औचित्य साधून 'एकता महिला मंच' आयोजित मी विधवा नव्हे, मी स्त्री या क्रांतिकारी उपक्रमांतर्गत सुवासिनी आणि विधवा महिलांचा एकत्रित हळदी-कुंकू सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. समाजातील दुजाभाव संपवून विधवा भगिनींना सन्मानाने मुख्य प्रवाहात आणणारा हा सोहळा उपस्थित सर्वांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारा ठरला.



कार्यक्रमाची सुरुवात स्त्री शिक्षणाच्या जननी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. वैराग पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक प्रतापसिंह जाधव व अन्य मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी 'एकता महिला मंच'च्या वतीने उपस्थित पाहुण्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलताना पोलीस उपनिरीक्षक जाधव भावूक झाले. ते म्हणाले, विधवा महिलांना हीन वागणूक देणाऱ्या समाजाला एकता महिला मंचने चपराक दिली आहे. त्यांना मुख्य प्रवाहात आणून त्यांच्यात नवचैतन्य निर्माण करण्याचा हा प्रयत्न कौतुकास्पद आहे. तुमच्या या साहसी कार्याला माझा सलाम! सामाजिक कार्यकर्ते आनंद पाटील यांनी महिला सक्षमीकरणावर भर दिला, तर सीना भोसले यांनी मंचाच्या कार्याचा आढावा घेतला.

मंचाचे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर यांनी मी विधवा नव्हे, मी स्त्री या भूमिकेमागचा उद्देश स्पष्ट केला. यावेळी महिलांसाठी विशेष स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये संगीत खुर्ची स्पर्धेत प्रियांका जोशी (प्रथम), मोना मोरे(द्वितीय) आल्या. उखाणे स्पर्धेत अनिता पाटील(प्रथम) संगीता सावंत (द्वितीय), अश्विनी कळंब(तृतीय) यांनी क्रमांक पटाकावले.

यावेळी महिलांनी एकमेकींना तिळगुळ देऊन तिळगुळ घ्या, गोड गोड बोला म्हणत शुभेच्छा दिल्या. विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे 'सेल्फी पॉईंट'. तिथे महिलांनी आनंदाने फोटो काढत सोशल मीडियावर हा परिवर्तनाचा संदेश पोहोचवला. यावेळी एकता महिला मंचच्या तालुका कार्यकारणी सदस्या सानिया सय्यद, राजनंदिनी हाके, सीना भोसले, सत्यभामा माळी, नेहा बदे, सपना सावंत, माधुरी हाके, अश्विनी कळंब, विद्या पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. सिना भोसले यांनी सूत्रसंचालन केले. राजनंदिनी हाके यांनी प्रास्ताविक केले. सानिया सय्यद यांनी आभार मानले.

## उघडेवाडी चौकात गतीरोधकासाठीचे रास्ता रोको आंदोलन मागे

### राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांनी दिले लेखी आश्वासन

**तभा वृत्तसेवा**
**वेळापूर,दि.१८ जानेवारी-**

फलटण-पंढरपूर संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावर वेळापूर येथील उघडेवाडी चौकात गतीरोधक बसवण्याच्या मागणीसाठी उघडेवाडी (ता. माळशिरस) ग्रामस्थांचे रास्ता रोको आंदोलन राष्ट्रीय महामार्ग पंढरपूर विभागाचे अधिकारी राऊत यांच्या लेखी आश्वासनानंतर मागे घेण्यात आले.



वेळापूर येथील उघडेवाडी चौक येथून वेळापूर शहरात पालखी मार्ग ओलांडून शाळेसाठी मुलांना जावे लागते. पाच ते सहा वेळा या ठिकाणी अपघात झाल्याने पंढरपूर विभागाला येथे गतिरोधक बसवण्याची उघडेवाडी ग्रामस्थांनी मागणी केली होती. पाठपुरावा करूनही दुर्लक्ष केल्याने ग्रामस्थांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला होता. त्यानुसार दि.१७ जानेवारीला उघडेवाडी चौक येथे ग्रामस्थांनी हे आंदोलन आयोजीत केले होते. परंतू महाम ार्ग अधिकाऱ्यांनी पुढील काही दिवसांमध्येच गतिरोधक बसवला जाईल असे लेखी पत्र सरपंच जिजाबाई गवळी व ग्रामस्थांना आश्वासन दिले व आंदोलन करू नये अशी विनंती केली. त्यामुळे ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेतले.

यावेळी रवींद्र घोरपडे, तानाजी जगदाळे, नितीन चौगुले, दीपक माने देशमुख, भाऊसाहेब चोरमले, हनुमंत भगत, मल्लिकार्जुन कुरुडकर, सोमनाथ भोसले, प्रदीप शहा, बाबासाहेब कांबळे, मयूर जगदाळे ,सागर सस्ते, महादेव कोळेकर, महादेव वावरे, हनुमंत कदम, माधवराव कदम, देविदास जाधव, सोमनाथ भोसले, भोजनदास बाळापुरे, प्रभाकर भगत, आप्पा कोळेकर, ग्रामसेवक माने, भाऊसाहेब गोडसे, सुवास गोडसे, शिवराज देशमुख, रोहित थोरात, व ग्राम स्थ उपस्थित होते.

### बी.फार्मसी प्रवेशासाठी एमएचटी-सीईटीचे ऑनलाईन फॉर्म सुरु

**सांगोला, दि. १८ जानेवारी-**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ वर्षाकरिता प्रथम वर्ष बी.फार्मसी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी एमएचटी-सीईटी २०२६ या सामायिक प्रवेश परीक्षेचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने दि.१० जानेवारी पासून ते दि.१२ फेब्रुवारी दरम्यान www.mahacet.org या संकेतस्थळावर सुरु झाले आहे. यासाठी १२ वी विज्ञान शाखेतील विद्यार्थी परीक्षेचे अर्ज भरू शकतात.

या परीक्षा अर्जाचे शुल्क सर्वसाधारण प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी १३०० रुपये व राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यासाठी १००० रुपये शुल्क ऑनलाईन पद्धतीने स्वीकारले जाणार आहे. विद्यार्थी व पालकांच्या सोयीच्या दृष्टीने या परीक्षेसाठी मोफत रजिस्ट्रेशन करण्याची सोय सांगोला तालुक्यातील मेथवडे येथील सहयाद्री फार्मसी कॉलेज येथे करण्यात आली आहे अशी माहिती संस्थेच्या अध्यक्षा अनिता इंगवले यांनी दिली.

उपस्थित अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापक व कर्मचारी मार्फत विद्यार्थ्यांना ऑनलाईन रेजिस्ट्रेशन बाबत सर्व माहिती देऊन लागणारी कागदपत्रे व पुढील प्रवेश प्रक्रियेची संपूर्ण माहिती आणि मार्गदर्शन देणार आहेत तरी याचा सर्व विद्यार्थी व पालकांनी लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेचे विश्वस्त विश्वजित इंगवले यांनी केले आहे. या बाबतीत अधिक माहितीसाठी डॉ.एस.एम. मोरे (९७६६८१५१२३), डॉ.एन.ए.तांबोळी (९४२२६४४८७६), पी.एस.लोखंडे (९८२३१०७३७१) यांना संपर्क करावा असे आवाहन प्राचार्य डॉ. मनोजकुमार पाटील यांनी केले आहे.

## विष्णुपंत कुलकर्णी इंग्लिश स्कूल येथे आनंदी बाजार साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. १८ जानेवारी-**

विष्णुपंत कुलकर्णी इंग्लिश स्कूल आनंदी बाजार हा उपक्रम साजरा करण्यात आला.

या आनंदी बाजाराचे उद्घाटन श्री हनुमान शिक्षण प्रसारक मंडळाच्या संचालिका अनिषा कुलकर्णी व मानसी कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संचालक संतोष कुलकर्णी, संचालक धनंजय मस्के, इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या इनामदार, समीर गांधी कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गेजगे, गोपाळराव देव प्रशालेचे मुख्याध्यापक केसकर उपस्थित होते.



आनंदी बाजारामध्ये विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे सुमारे ७० ते ८० स्टॉल्स उभारले होते. यामध्ये पालेभाज्या, ताजी फळे, विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त शालेय साहित्य तसेच खवय्यांसाठी विविध प्रकारचे स्वादिष्ट खाद्यपदार्थांचे स्टॉल्स चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आकर्षक पद्धतीने सजवले होते.

### मोहोळ नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी खवळे

**मोहोळ, दि. १८ जानेवारी-**





मोहोळ नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी भाजपचे नगरसेवक दत्तात्रय खवळे यांची निवड करण्यात आली आहे. नुकत्याच झालेल्या नगरपरिषदेच्या निवडणुकीत खवळे हे प्रभाग ४ मधून भाजपातर्फे प्रभाग मधून निवडून आले आहेत. भाजपचे २० पैकी ११ सदस्य निवडून आले आहेत. पक्ष नेतृत्वाने उपनगराध्यक्ष पदासाठी खवळे यांना संधी देण्याचा निर्णय घेतला आहे. मोहोळ नगरपरिषदेच्या स्वीकृत नगरसेवक पदासाठी भारतीय जनता पक्षाने माजी नगरसेवक तथा निवडणूक प्रभारी सुशील क्षीरसागर यांना तर शिंदे सेनेने दौलतराव उर्फ बंडू देशमुख यांना संधी दिली आहे. नुकत्याच झालेल्या मोहोळ नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपने नगराध्यक्ष पदासाठी सुशील क्षीरसागर यांच्या पत्नी शीतल यांना उमेदवारी दिली होती. मात्र त्यांच्या अत्यल्प मतांनी पराभव झाला. या निवडणुकीत भाजपचे ११ नगरसेवक निवडून आले आहेत. दौलतराव उर्फ बंडू देशमुख यांनी प्रभाग नऊ मधून शिंदे सेनेतर्फे निवडणूक लढविली होती. मात्र त्यांचा निसटत्या मताने पराभव झाला होता. त्यामुळे त्यांना पक्षाने संधी दिली आहे. सुशील क्षीरसागर यापूर्वी नगरपरिषदेच्या निवडणुकीत निवडून आले होते. त्यांच्या कामाचा अनुभव लक्षात घेऊन पक्ष नेतृत्वाने त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे. त्यांच्या निवडीबद्दल पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी आमदार राजन पाटील, जेष्ठ नेते नागनाथ क्षीरसागर, गटनेते सतीश काळे यांनी अभिनंदन केले आहे.

## श्रीपूरच्या कर्मयोगी कारखान्याचे तीन हजार प्रमाणे ऊस बिल जमा

### ऊस उत्पादकांचे १७० कोटी बँकेत वर्ग

**तभा वृत्तसेवा-**
**श्रीपूर, दि. १८ जानेवारी-**

येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याने चालू गळीत हंगामात गाळपास आलेल्या ऊसाचे ३००० रु . प्रमाणे बील शेतकरी सभासदांचे खात्यावर जमा केले असल्याची माहिती चेअरमन प्रशांतराव परिचारक यांनी दिली.

पुढे बोलताना ते म्हणाले की कारखान्याचे संस्थापक कै . सुधाकरपंत परिचारक यांनी आखून दिलेल्या मार्गावरून आम्ही वाटचाल करीत असून शेतकरी व कामगार हिताची बांधिलकी जपली जात आहे. यावेळी उपाध्यक्ष कैलास खुळे, कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी उपस्थित होते . या वेळी कार्यकारी संचालक डॉ . यशवंत कुलकर्णी यांनी आम्ही अत्यंत कमी कालावधीत म्हणजे ७५ दिवसात ७ लाख मे.टन. ऊसाचे गाळप केले असून कमी दिवसात जास्त ऊस गाळप करण्याचा उच्चांक निर्माण केला असल्याचे सांगून कारखान्याचे चेअरम प्रशांतराव परिचारक, व्हा.चेअरमन कैलास खुळे संचालक मंडळातील सर्व सदस्य व अधिकारी, कामगार यांच्या सहकार्याने हे शक्य झाल्याचे सांगितले.





तसेच या गळीत हंगामा मध्ये कारखान्याकडे सुमारे ११ लाख मे.टन ऊस क्षेत्राच्या नोंदी झाल्या होत्या. त्यामधील कारखान्याने आजपर्यंत ७ लाख मे.टन ऊस गाळप केला असून उर्वरित ऊसाचे गाळप वेळेत पूर्ण करणार असल्याचे सांगत कारखान्याकडे तोडणी वाहतूक करणाऱ्या तोडणी वाहतूक ठेकेदारांचीही बिले दिली असून कारखाना सरासरी प्रतिदिन १० हजार मे.टन प्रमाणे चालत आहे. कारखान्याने ६ लाख ४० हजार क्विं. साखर उत्पादन करुन १० .७०% सरासरी साखर उतारा मिळविला आहे.

को-जनरेशन मधुनही ४. २२ कोटी विज निर्मीती करुन २ .२० कोटी विज निर्यात केली आहे. आसवणी प्रकल्पामधूनही ६७ लाख लिटर इतके उत्पादन घेतले आहे. अशी माहिती डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी दिली.

# जि. प. पंचायत समिती निवडणुकीची मतमोजणी माढ्यात घेण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि.१८ जानेवारी-**

जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीची मतमोजणी माढ्यातच घेतली पाहिजे ही मागणी पुढे आली असुन माढ्याच्या नगराध्यक्षा अ‍ॅड. मीनल साठे आणि संभाजी ब्रिगेडचे दिनेश जगदाळे यांनी दोन वेगवेगळ्या निवेदनाद्वारे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे केली आहे. याबाबतचे निवेदन तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार शिल्पा ठोकडे यांना देण्यात आले.

यावेळी नगराध्यक्षा अ‍ॅड मीनल साठे, उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे, संभाजी ब्रिगेडचे दिनेश जगदाळे, देविदास खरात, नाना साठे, उमेश साठे, वेदांत साठे, सचिन साबळे, सुधीर लंकेश्वर, मुन्ना बागवान, रमेश थोरात, रवी जगदाळे, प्रशांत जाधव आदी उपस्थित होते.



गेल्या दोन विधानसभा निवडणुकी पासून जागेची अडचण पुढे करून मतमोजणी ही पणन महामंडळाचे गोदामात कुर्डूवाडी येथे होत आहे. याठिकाणी होत असलेल्या मतमोजणीस माढेकरांचा विरोध आहे कारण या प्रकारातून माढ्याचे महत्त्व कमी करण्याचे प्रयत्न प्रशासन करत आहे अशी माढेकरांची भावना आहे. माढा हे तालुक्याचे ठिकाण असून या ठिकाणी पहिल्यापासूनच जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीची मतमोजणी होत आलेली आहे. परंतु या वेळी मतमोजणी इतरत्र होण्याचे संकेत मिळत असल्याने या गोष्टीचा तीव्र निषेध व्यक्त करत निवडणुकीची मतमोजणी माढ्यातच घेण्यासाठी म ाढा नगरपंचायतच्या नगराध्यक्षा अ‍ॅड. मीनलताई साठे व संभाजी ब्रिगेड यांच्या वतीने वेगवेगळी दोन निवेदन माढा करम ाळाच्या उपविभागीय अधिकारी जयश्री आव्हाड व तहसीलदार तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी शिल्पा ठोकडे यांना देण्यात आले आहे. त्या निवेदनात असे म्हटले आहे की. आगामी होत असलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीची मतमोजणी ही पहिल्यापासून माढा शहरातच होत आहे.परंतु आता ही मतमोजणी इतरत्र हलवण्याचा घाट प्रशासनाने घातला असल्याचे कळते आहे तरी माढा शहरासह परिसरातील जनतेच्या भावनांचा विचार करून ही मतमोजणी माढा येथे घेण्याची मागणी करण्यात आली आहे. आमची मागणी मान्य न झाल्यास या गोष्टीसाठी आम्ही रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करणारा इशारा देण्यात आला आहे.

### मोडनिंब सार्वजनिक स्वच्छतागृह कचऱ्याच्या ढिगाऱ्यांच्या विळख्यात

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १८ जानेवारी-**

मोडनिंब (ता. माढा) येथील प्रभाग क्रमांक दोन मधील एकमेव सार्वजनिक स्वच्छतागृह सध्या दुरवस्थेत असून अस्वच्छतेचे चित्र पाहायला मिळत आहे. स्वच्छतागृह परिसरात सर्वत्र प्लास्टिकचे कागद, कचरा व जळालेला कचरा पडलेला असून तीव्र दुर्गंधीमुळे नागरिक हैराण झाले आहेत.

शनिवारी आठवडा बाजार भरत असल्याने तसेच स्वच्छतागृहालगत रस्ता असल्यामुळे या परिसरात कायम वर्दळ असते.शिवाय शाळेचा परिसर जवळच असल्याने अनेक विद्यार्थी दररोज या रस्त्यावरून ये-जा करतात. दुर्गंधीमुळे विद्यार्थ्यांसह नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून महिला व ज्येष्ठ नागरिकांना नाकाला रुमाल बांधून जावे लागत आहे. आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. गावातील एकमेव सार्वजनिक स्वच्छतागृह असूनही नियमित स्वच्छतेचा अभाव व ग्रामपंचायतीकडून होत नसलेली देखभाल यामुळे परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे.या सार्वजनिक स्वच्छतागृहाची तातडीने स्वच्छता करून नियमित देखभाल करण्यात यावी, अशी जोरदार मागणी परिसरातील व्यापारी, स्थानिक नागरिकांडून करण्यात येत आहे.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## 'उमा'चे प्राचार्य पाटील यांना आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर



**मोडनिंब, दि. १८ जानेवारी-**

मोडनिंब (ता. माढा) येथील श्री उमा विद्यालयाचे प्राचार्य एस. आर. पाटील यांना त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील कार्याची दखल घेत 'आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार' जाहीर करण्यात आला. सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्था बाळे यांचेवतीने आदर्श क्रीडाशिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. विद्यार्थ्यांच्या शारीरिक, सर्वांगीण विकासासाठी त्यांनी सातत्याने केलेल्या प्रयत्नांमुळे हा गौरव मिळाल्याचे सहकारी, पालक व माजी विद्यार्थ्यांकडून सांगण्यात आले. या पुरस्कारामुळे मोडनिंब परिसरासह उमा विद्यालयाच्या शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील कार्याला नवी प्रेरणा मिळाली आहे. शिक्षकवृंद, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांनी प्राचार्य पाटील यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.



### महत्त्वाचे

## रस्त्याच्या वादातून वृद्ध शेतकऱ्याला मारहाण; चौघाजणांवर गुन्हा दाखल

**बार्शी, दि.१८ जानेवारी-**

तालुक्यातील व्हळे शेलगाव येथे शेतातून जाणाऱ्या रस्त्याच्या वादातून ७५ वर्षीय वृद्ध शेतकऱ्यावर लाथाबुक्क्याने व उसाने मारहाण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी चौघांविरोधात बार्शी ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. याबाबत बाबुराव आंबादास शिंदे (वय ७५, व्यवसाय शेती, रा. व्हळे शेलगाव, ता. बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार त्यांची गट क्रमांक १८४ मध्ये शेती असून त्या शेतात ये-जा करण्यासाठी रस्ता नसल्याने सदर वाटेचा दावा प्रांत कार्यालय, बार्शी येथे प्रलंबित आहे. शेजारील शेतकरी हरी चंद्रभान शिंदे यांची शेती त्यांच्या शेताला लागून आहे. दि. १६ जानेवारी रोजी दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास, हरी चंद्रभान शिंदे हे उसाने भरलेले वाहन फिर्यादीच्या शेतातून नेत असताना बाबुराव शिंदे यांनी त्यास विरोध केला. याच कारणावरुन चिडून हरी चंद्रभान शिंदे यांच्यासह मदन हरी शिंदे, अमृताबाई गणेश शिंदे व गणेश किसन शिंदे (सर्व रा. व्हळे शेलगाव) यांनी शेताच्या बांधावर येत शिवीगाळ करत लाथाबुक्क्याने मारहाण केली. यामध्ये गणेश किसन शिंदे यांनी उसाने मारहाण करुन बाबुराव शिंदे यांना जखमी केले तर इतर संशयित आरोपींनी तोंडावर हाताने मारहाण केल्याने फिर्यादीचा समोरचा एक दात पडून गंभीर दुखापत झाली. तसेच दमदाटी करुन संशयित आरोपी घटनास्थळावरुन निघून गेल्याचे फिर्यादीत नमूद आहे.



## छावा प्रतिष्ठानकडून ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्थेचा सन्मान

**बार्शी, दि. १८ जानेवारी -**

छावा प्रतिष्ठान यांच्याकडून बार्शी शहरातील व तालुक्यातील ज्या संस्था छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रम आयोजित करीत आहेत अशा संस्थेचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. तहसीलदार एफ.आर. शेख, बार्शी तालुका सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे, डॉ. सचिन मांजरे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराज यांच्या मूर्तीस दुग्ध अभिषेक, जल अभिषेक व पुष्पमाला अर्पण करुन संभाजीराजांच्या जयघोषात व तोफांची सलामी देऊन संपन्न झाला. यावेळी सर्व मान्यवरांचा व विविध संघटनेमधून छत्रपती संभाजी महाराज यांचे काम करणाऱ्याचा सन्मान करण्यात आला. ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्थेचा सन्मान संस्थेचे खजिनदार मानकोजी ताकभाते यांनी सर्वांच्यावतीने हा सन्मान स्वीकारला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष राहुल वाणी, सचिव अजय तिवारी, सहसचिव नागनाथ सोनवणे, माणकोजी ताकभाते, सुनील फल्ले हे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी छावा प्रतिष्ठानचे सुभाष तुपे, उपाध्यक्ष आकाश चव्हाण, सचिव शुभम चव्हाण व इतर सर्व शिवशंभोप्रेमी यांनी जो सन्मान केला त्याबद्दल राहुल वाणी यांनी सर्वांचे आभार मानले.

## बार्शी तालुक्यातील शिराळे येथे शेतकऱ्याची आत्महत्या

**बार्शी, दि. १८ जानेवारी -**

तालुक्यातील शिराळे येथे ४७ वर्षीय शेतकऱ्याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. जयंत महादेव गायकवाड (वय ४७, रा. शिराळे, ता. बार्शी) असे मृताचे नाव असून, या घटनेने परिसरात शोककळा पसरली आहे. याबाबत श्रीहरी नामदेव गायकवाड (वय ४९, व्यवसाय - शेती, रा. शिराळे) यांनी पांगरी पोलीस ठाण्यात दिलेल्या खबरी जबाबानुसार, जयंत गायकवाड हे कुटुंबातील आर्थिक अडचणींमुळे काही काळापासून मानसिक तणावात होते. दि. १६ जानेवारी रोजी सकाळी फिर्यादी शेतात कामासाठी गेले होते. दुपारी सुमारे ३.३० वाजता जेवणासाठी गावी परतल्यानंतर त्यांना महादेव नरहरी गायकवाड यांच्या घरासमोर लोकांची गर्दी दिसली. घरातील हॉललगत असलेल्या खोलीत पाहणी केली असता जयंत गायकवाड यांनी लोखंडी आडूला गमजाच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे निदर्शनास आले. शेजाऱ्यांच्या मदतीने त्यांना तात्काळ खाली उतरवून पांगरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेची माहिती नातेवाइकांनी पांगरी पोलीस ठाण्यात दिली असून, सदर प्रकरणाची नोंद अकस्मात मृत्यू म्हणून करण्यात आली आहे. पुढील तपास पांगरी पोलीस करीत आहेत.

## शिक्षिका आशा पवार यांना पोस्टर स्पर्धेत प्रथम क्रमांक

**सोलापूर, दि. १८ जानेवारी-**



इंचगाव केंद्रातील सरवळेवस्ती बेगमपूर शाळेच्या मुख्याध्यापिका तथा उपक्रमशील शिक्षिका आशा पवार यांनी तालुकास्तरीय किशोरी हितगुज मेळाव्यातील पोस्टर स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. त्यांच्या या यशाबद्दल शिक्षण विस्तार अधिकारी मल्लिनाथ स्वामी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कुरूल बीटचे विस्तार अधिकारी अतुल कुमार माने, कामती केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. बी. डी. राठोड, केंद्रप्रमुख बा. म. पाटील, शंकर माने उपस्थित होते.


## भालकेंच्या तीर्थक्षेत्र आघाडीचे सहा नगरसेवक फुटीच्या उंबरठ्यावर?

### लवकरच वेगळी चूल मांडण्याच्या तयारीत

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१८ जानेवारी -**

पंढरपूर नगरपालिका निवडणुकीत तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या डॉ.प्रणिता भालके नगराध्यक्षपदी निवडून आल्या तर भाजपचे २४ नगरसेवक निवडून आले. तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे अवघे ११ नगरसेवक निवडून आले. नुकत्याच उपनगराध्यक्षपद आणि स्वीकृत नगरसेवकांच्या निवडी देखील झाल्या. मात्र आता या स्वीकृत नगरसेवकाच्या निवडीवरूनच तीर्थक्षेत्र विकास आघाडीमध्ये दोन गट पडले आहेत. त्यापैकी सहा नगरसेवकांच्या एका गटाने आपली वेगळी चूल मांडण्याची तयारी केली असल्याची खात्रीलायक माहिती सूत्रांनी दिली आहे.

स्वीकृत नगरसेवक पदासाठी तीर्थक्षेत्र विकास आघाडी कडून अनेक जण इच्छुक होते. मात्र सर्व इच्छुकांना झुलवत ठेवत भालके गटाने शेवटच्या क्षणी अत्यंत गोपनीय पद्धतीने राहुल शिंदे-नाईक यांची उमेदवारी जाहीर केली. त्यावरून अनेक नगरसेवक नाराज झाले होते. कुठल्याही नगरसेवकांना विश्वासात न घेता, पार्टी मीटिंग न घेता स्वीकृत नगरसेवकाची निवड करण्यात आल्याने नगरसेवकांसह तिर्थक्षेत्र विकास आघाडीतील सहभागी अनेक नेते देखील नाराज होते. या नाराजीचे रूपांतर आता बंडखोरीमध्ये झाले आहे. पुढील आठवड्यात सहा नगरसेवक आपल्या वेगळ्या गटाला मान्यता मिळावी म्हणून जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव दाखल करणार आहेत. त्यामुळे भालके गटाला हा मोठा धक्का मानला जातोय.



### फुटीच्या उंबरठ्यावरील ते सहा नगरसेवक कोण

भालकेंच्या मनमानी कारभारा विरुध्द बंड करुन वेगळी चूल मांडण्याचा तिर्थक्षेत्र विकास आघाडीच्या सहा नगरसेवकांनी निर्णय घेतल्याची खात्रीशीर माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे. मात्र तिर्थक्षेत्र आघाडीतून बाहेर पडून वेगळी चूल मांडणारे फुटीच्या उंबरठ्यावरील हे सहा नगरसेवक कोण आहेत या बद्दल पालिकेच्या राजकीय वर्तुळात उत्सुकता शिगेला पोहचली आहे.

### भालकेंच्या सोबत अवघे पाच नगरसेवक राहणार

या सहा नगरसेवकांच्या बंडखोरीमुळे भाजपची ताकद पंढरपूर नगरपालिकेत वाढणार आहे. सहा नगरसेवकांनी वेगळीच चूल मांडल्यास नगराध्यक्षा डॉक्टर प्रणिता भालके यांना अवघ्या पाच नगरसेवकांना सोबत घेऊन नगरपालिकेचा कारभार चालवावा लागणार आहे. संख्याबळ अत्यंत कमी झाल्याने भालकेंना अनेक अडचणींचा सामना करावा लागणार आहे. भाजप आणि परिचारक गटाचे २४ नगरसेवक असताना आता भालके गटाचे सहा नगरसेवकांनी वेगळी चूल मांडल्याचा निर्णय घेतल्याने ३० नगरसेवक भालके यांच्या विरोधात असल्याचे स्पष्ट होत आहे.

## चिंचणीच्या मायक्कादेवी यात्रेमुळे मतदान दिवस बदलण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि १८ जानेवारी-**

### आमदार गोपीचंद पडळकर यांनी निवडणुक आयोगाला दिले निवेदन

जिल्हा परिषद पंचायत समितीसाठी मतदानादिवशीच महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र प्रदेशातील भक्तांचे आराध्य दैवत चिंचणी येथील मायाक्का देवी यात्रेचा मुख्य दिवस आहे. त्यामुळे निवडणुक आयोगाने याबाबत गांभीर्याने विचार करुन मतदानाची तारीख बदलावी अशी मागणी भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी निवडणुक आयोगाकडे केली आहे. निवडणुक आयोग याबाबत काय निर्णय घेतो याकडे मतदार तसेच भाविक भक्तांचे लक्ष लागले आहे.

सातारा, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, पुणे तसेच इतर जिल्ह्यातील अनेक गावातील भाविक मोठ्या संख्येने या यात्रेस जातात. यात्रेमुळे अनेक मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावु शकणार नाहीत. त्यामुळे याचा थेट मतदानावर मोठा परिणाम होणार आहे. अनेक जिल्ह्यातून हजारो बैलगाडयातुन भाविक चिंचणी येथील मायाक्का देवीच्या यात्रेस जातात. ही गेल्या अनेक वर्षांपासूनची परंपरा आहे. ही यात्रा धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिकदृष्ट्या महत्वाची आहे. या यात्रेस जाणाऱ्या भाविक भक्तांची संख्या खुपच मोठी आहे. याचा थेट मतदानावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मतदानाची तारीख बदलण्याची मागणी होत आहे.

## पीएनजीतर्फे 'चेन अँड बँगल्स महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ जानेवारी-**

भारतातील सर्वाधिक विश्वासार्ह वारसाहक्क लाभलेला दागिन्यांचा ब्रँड पीएनजी ज्वेलर्स पुन्हा एकदा आपल्या बहुप्रतिक्षित चेन अँड बँगल्स महोत्सवासह सज्ज झाला आहे.या महोत्सवात दैनंदिन वापरासाठी लागणारे दागिने, भेटवस्तू किंवा खास प्रसंगांसाठी अनुरूप अशा उत्तम दर्जाच्या सोन्याच्या चेन, आकर्षक बांगड्या तसेच अतिशय सुंदर अशा हिऱ्यांच्या बांगड्यांचा समावेश आहे. महोत्सवाच्या अंतर्गत, ग्राहकांना सोन्याच्या चेन आणि बांगड्यांवर प्रति ग्रॅम रुपये ५१५ इतकी थेट मेकिंग चार्ज सवलत मिळणार आहे. यासोबतच, हिऱ्याच्या बांगड्यांच्या मेकिंग चार्जवर थेट ५० टक्के सूट देण्यात येत आहे. ही ऑफर ५ जानेवारी ते ३१ जानेवारी या कालावधीत सर्व पीएनजी ज्वेलर्स शोरूम्समध्ये वैध असेल. यावेळी डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, भारतीय विवाह संस्कृतीत चेन आणि बांगड्यांना विशेष स्थान आहे.

## अक्कलकोट शहर-तालुक्यात अनेक राजकीय नेत्यांकडे बोगस जातीचे दाखले?

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १८ जानेवारी-**

अक्कलकोट शहर-तालुक्यात अनेक राजकीय नेत्यांकडे वेगवेगल्या जातीचे बोगस दाखले असल्याची चर्चा सध्या सर्वत्र रंगली आहे. अक्कलकोट तालुक्यातील जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणातील निवडणुकांचा बिगुल वाजला आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती साठी इच्छुक असणाऱ्या राजकीय नेत्यांनी विविध पक्षांकडे उमेदवारी मागणीचे अर्ज दाखल केले आहेत. सोयीप्रमाणे जातीचा दाखला वापर करण्याचा कल वाढत आहे. बोगस दाखल्यामुळे मुळ खऱ्या जातीच्या दाखलेधारक लाभार्थी यांच्यावर अन्याय होत असत्याची भावना व्यक्त होत आहे.

सध्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून उमेदवारी अर्ज विक्री सुरू झाली आहे. अक्कलकोट तालुक्यातील अनेक राजकीय नेत्यांकडे एससी, एसटी आणि ओबीसी चे बोगस जातीचे दाखले काढण्यात आले आहेत. त्यामुळे याची जोरदार चर्चा सर्वत्र सुरू आहे. सोलापूरच्या जिल्हाधिकारी यांनी तात्काळ याची दखल घेऊन अक्कलकोट तालुक्यातील सर्वच राजकीय नेत्यांचे जातीच्या दाखल्यांची चौकशी करून ज्यांनी बोगस जातीचे दाखले काढले आहेत त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांतून केली जात आहे.

अक्कलकोट तालुक्यातील बोगस जातीच्या दाखल्यामुळे एससी एसटी तसेच ओबीसी प्रवर्गातील जे मूळ लाभार्थी आहेत त्यांच्यावर राजकीय , सामाजिक अन्याय होत आहे. याची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे.यापूर्वी तालुक्यात जातीची बोगस दाखले वाटल्याचे प्रकरण घडले आहे. याबाबत अनेकांवर कारवाई झाली आहे. तालुक्यात बोगस जातीचे दाखले देणारी एक सोनेरी टोळी सक्रिय असून याची सखोल चौकशी प्रशासनाने करावी अशी मागणी नागरिकांतून जोर धरत आहे. या टोळीचा पर्दाफाश होणे गरजेचे आहे.

## दिव्यांगांच्या सन्मानाचा क्षितिज ग्रुपचा उपक्रम प्रेरणादायी : नगराध्यक्षा सावंत

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.१८ जानेवारी-**

समाजातील उपेक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणून त्यांना आत्मसन्मानाने जगण्याची संधी देणारा क्षितिज ग्रुपचा दिव्यांग सत्कार उपक्रम अत्यंत प्रेरणादायी असून सामाजिक बांधिलकी जपणारा असल्याचे प्रतिपादन नगराध्यक्षा मोहिनी सावंत यांनी केले.

क्षितिज ग्रुप, करमाळा यांच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंती व लुईस ब्रेल स्मृतिदिनानिमित्त दिव्यांग भगिनी व बंधूंचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला नगराध्यक्ष मोहिनी सावंत, नगरसेविका चैताली सावंत, डिजिटल मीडिया पत्रकार संपादक संघटनेचे तालुकाध्यक्ष दिनेश मडके, स्नेहालय इंग्लिश स्कूलचे संस्थापक अध्यक्ष जयंत दळवी यांची प्रमुख उपस्थिती होती. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. दिव्यांग बंधूंना ट्रॅव्हल बॅग व गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. दिव्यांग भगिनींचाही मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी दिव्यांग भगिनी स्वाती माने यांनी मनोगत व्यक्त करताना आम्हीही समाजाचा अविभाज्य घटक आहोत. परमेश्वराने आम्हाला बुद्धी व स्पर्शज्ञान दिले आहे. आम्ही कुठेही कमी नाही. मात्र आम्हाला हक्काचा रोजगार मिळणे अत्यंत गरजेचे असल्याचे मत मांडले.



नगराध्यक्षा सावंत व नगरसेविका सावंत यांचा ग्रुपच्या वतीने सत्कार करण्यात आला. नगराध्यक्ष सावंत यांनी करमाळा शहरातील सर्व प्रश्न नगरसेवक, प्रशासन व नागरिक यांच्या सहकार्याने सोडविण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. दिव्यांग बंधू-भगिनींसाठी तीन टक्के निधी प्रभावीपणे वापरण्याबरोबरच त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी तसेच उद्योग-व्यवसायासाठी गाळे उपलब्ध करून देण्यासाठी आपण प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन ज्येष्ठ साहित्यिका डॉ. सुनीता दोशी यांनी केले. क्षितिज ग्रुपच्या माधुरी साखरे, डॉ. सुनीता दोशी, स्वाती माने, सुप्रिया येवले, निलीमा पुंडे, मंजूताई देवी, पुष्पाताई फंड, कावेरी देशमुख, नलिनी जाधव यांच्यासह सर्व भगिनींनी विशेष परिश्रम घेतले. निलिमा पुंडे यांनी पसायदान सादर केले. नलिनी जाधव यांनी आभार मानले.

## एकाच्या मृत्यू प्रकरणी अटकेतील आरोपीस सशर्त जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१८ जानेवारी-**

मावा खाण्यावरून भांडण होऊन एकाच्या मृत्यू प्रकरणी अटकेत असलेल्या एका आरोपीस सोलापूर जिल्हा व सत्र न्यायाधीश जयदीप मोहिते यांनी सशर्त जामीन मंजूर केला.

याबाबत अधिक माहिती अशी, आरोपी सिद्धांत जगले यांच्याविरुद्ध सदर बाजार पोलीस स्टेशन सोलापूर येथे गुन्हा नोंदवण्यात आला होता. त्यानुसार आरोपी सिद्धांत जगले व मयत तिमन्ना या दोघांमध्ये मावा खाण्यावरून भांडण झाले होते. यातील आरोपीने रागाच्या भरात ढकलून दिल्याने तिमन्ना जमिनीवर पडून मयत झाला होता. यामुळे आरोपी सिद्धांत शंकर जगले यास दि.२१ एप्रिल २५ रोजी पोलिसांनी अटक केली होती. आरोपीने आपला जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायालयात दाखल केला होता.

दरम्यान आरोपीतर्फे ॲड. कदीर औटी यांनी न्यायालयात असा युक्तिवाद केला की, सदर घटना ही पूर्वनियोजित नसून अचानक उद्भवलेल्या क्षुल्लक वादातून घडलेली आहे. आरोपीचा मयतास ठार मारण्याचा कोणताही हेतू नव्हता. केवळ क्षणिक रागाच्या भरात झालेल्या ढकलण्यामुळे दुर्दैवी घटना घडली असून आरोपीने कोणतेही प्राणघातक शस्त्र वापरलेले नाही. आरोपी तरुण वयाचा असून त्याचा पूर्वी कोणताही गुन्हेगारी रेकॉर्ड नाही तसेच तो तपासात सहकार्य करण्यास तयार आहे. त्यामुळे त्यास जामिनावर सोडण्यात यावे, सदर युक्तीवाद मान्य करून सोलापूर जिल्हा व सत्र न्यायाधीश जयदीप मोहिते यांनी आरोपीचा जामीन अर्ज सशर्त मंजूर केला. सदर प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. दत्तात्रेय कापुरे, ॲड. वैभव बोंगे, ॲड. ओंकार फडतरे, ॲड. शिवरत्न वाघ, ॲड. मोहीम पठाण, ॲड. मनिष बाबरे, ॲड. रोहित थोरात, ड. अजय वाघमारे, ॲड. त्वरिता वाघ, ॲड. अभिषेक नागटिळक यांनी काम पाहिले.

## ई-केवायसीत तांत्रिक चुका; जिल्ह्यातील लाडक्या बहिणी नाराज

### नोव्हेंबर पाठोपाठ डिसेंबरचाही हप्ता मिळाला नाही

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.१८ जानेवारी-**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत ई-केवायसी प्रक्रियेदरम्यान अपुऱ्या माहितीमुळे जिल्ह्यातील हजारो महिला लाभार्थी थेट योजनेतून बाद झाल्याची गंभीर बाब समोर आली आहे. परिणामी पात्र असुनही या महिलांना नोव्हेंबरनंतर डिसेंबर महिन्याचा सुध्दा लाभ मिळालाच नसल्याने लाडक्या बहिणीतून नाराजी व्यक्त होत आहे.

लाडकी बहीण योजनेअंतर्गत ई-केवायसी करताना अनेक महिलांकडून अनवधानाने चुकीची माहीती नोंदविण्यात आली आहे.

विशेषत कुटुंबात कोणतीही व्यक्ती सरकारी सेवेत नसताना संबंधित पर्यायावर चुकुन होय अशी नोंद झाल्यामुळे महीला अपात्र ठरविण्यात आल्या आहेत.




### लाभ बंद झाल्यामुळे महीला मध्ये संताप

खरेतर आर्थिक दृष्ट्या सक्षम नसणाऱ्या महिलांसाठी ही योजना अतिशय महत्त्वपूर्ण आहे. दोन महिन्यापासून हप्ता थांबल्यामुळे घरखर्च, औषधोपचार व दैनंदिन गरजांसाठी याचा मोठा आधार होता. पण लाभ बंद झाल्यामुळे अनेक महीला संकटात आल्या आहेत.

### ३१ डिसेंबरपासून ई-केवायसी बंद

शासनाने ई केवायसी करण्यासाठी मुदत ३१ डिसेंबर पर्यंत दिलेली संपली आहे. त्यामुळे पुन्हा ई केवायसी करणे शक्य नाही. ई केवायसी प्रक्रीया पुन्हा राबविणे आवश्यक आहे. जेणेकरून वंचित महीलांचा यामध्ये पुन्हा समावेश होऊन लाभ सुरू होईल. जिल्हा महीला व बालकल्याण विभागाने याबाबत शासनाकडे पत्रव्यवहार केल्याचे सांगितले जात आहे. चुकीच्या ई-केवायसी मुळे महिला अपात्र झाल्या आहेत. याची खात्री झाल्यानंतर याबाबत महाराष्ट्र शासनाकडे चुका दुरूस्त करण्यासाठी पुन्हा ई केवायसी प्रक्रीया राबवावी अशी मागणी महीला व बालकल्याण विभागाने शासनाकडे केली असल्याचे समजते.

### महिलांची, महीला व बालकल्याण विभागाकडे धावपळ

ई-केवायसी करुनही नोव्हेंबर व डिसेंबर महिन्याचा हप्ता जमा न झाल्यामुळे लाडक्या बहिणी खातरजमा करणयासाठी महीला व बालकल्याण विभागाकडे हेलपाटे मारीत आहेत. आधारकार्ड वरुन त्या महीला अपात्र असल्याचे सांगितले जात आहे. तर महिला म्हणत आहेत आम्ही चुक काय मुद्दाम केलेली नाही.